येक राजागुरु येक देवगुरु । येक बोलिजे जगद्गुरु । सकळकळा ॥ ६८ ॥ ऐसे हे सत्रा गुरु । याहिवेगळे आणीक गुरु । ऐक तयांचा विचारु । सांगिजेल ॥ ६९ ॥ येक स्वप्नगुरु येक दीक्षागुरु । येक म्हणती प्रतिमागुरु । येक म्हणती स्वयें गुरु । आपला आपण ॥ ७० ॥ जे जे यातीचा जो व्यापारु । ते ते त्याचे तितुके गुरु । याचा पाहातां विचारु । उदंड आहे ॥ ७१ ॥ असो ऐसे उदंड गुरु । नाना मतांचा विचारु । परी जो मोक्षदाता सद्गुरु । तो वेगळाचि असे ॥ ७२ ॥ नाना सद्विद्येचे गुण । याहीवरी कृपाळूपण । हें सद्गुरूचें लक्षण । जाणिजे श्रोतीं ॥ ७३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे गुरुलक्षणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ मागां सद्गुरूचें लक्षण । विशद केलें निरूपण । आतां सच्छिष्याची वोळखण । सावध ऐका ॥ १ ॥ सद्गुरुविण सच्छिष्य । तो वायां जाय निशेष । कां सच्छिष्येंविण विशेष । सद्गुरु सिणे ॥ २ ॥ उत्तम भूमि शोधिली शुद्ध । तेथें बीज पेरिलें किडखाद । कां तें उत्तम बीज परी समंध । खडकेंसी पडिला ॥ ३ ॥ तैसा सच्छिष्य तें सत्पात्र । आणि गुरु सांगे मंत्रतंत्र । तेथें अरत्र ना परत्र । कांहींच नाहीं ॥ ४ ॥ अथवा गुरु पूर्ण कृपा करी । परी शिष्य अनधिकारी । भाग्यपुरुषाचा भिकारी । पुत्र जैसा ॥ ५ ॥ तैसें येकाविण येक । होत असे निरर्थक । परलोकींचें सार्थक । तें दुरी दुरावे ॥ ६ ॥ म्हणोनि सद्गुरु आणी सच्छिष्य । तेथें न लगती सायास । त्या उभयतांचा हव्यास । पुरे येकसरा ॥ ७ ॥ सुभूमि आणी उत्तम कण । उगवेना पर्जन्येंविण । तसें अध्यात्मनिरूपण ।

यातिगुरु (जातिपंचायतीचा अध्यक्ष – सरपंच), एक मातागुरु, एक पितागुरु, एक राजागुरु (राजा हाच गुरु), एक देवगुरु, एक सकळकळाप्रवीण जगद्गुरु (शंकराचार्यासारखा), असे हे सतरा गुरु आहेत. ह्यांशिवायही स्वप्नगुरु (स्वप्नांचा अर्थ सांगणारा), दीक्षागुरु (दीक्षा देणारा), प्रतिमागुरु, आपला आपण गुरु, ज्या-ज्या जातीचा जो-जो व्यापार तो-तो व्यापार शिकविणारा गुरु – असा विचार पाहतां गुरु उदंड आहेत. नाना मतें प्रतिपादणारे हे सारे गुरुच आहेत. पण मोक्षदाता सद्गुरु ह्या सर्वांहून वेगळा आहे (६६–७२). ज्याच्या अंगीं सद्विद्येचे अनंत गुण असून जो शिष्यवत्सल आहे तोच सद्गुरु होय (७३). [द० ५, स० २]

सद्गुरूची वोळखण झाली. आतां सच्छिष्यांचीं लक्षणें ऐका. सच्छिष्य असून सद्गुरु भेटले नाहींत तर तो वायां जातो. तसेंच सद्गुरूला सच्छिष्य मिळाला नाहीं तर तोही शीण पावतो. भूमि उत्तम असून बीज किडखाद लागलें किंवा बीं उत्तम असून खडकावर पेरलें तर तें व्यर्थ होय; तसा शिष्य अधिकारी असून त्याला मंत्र-तंत्रावरच बोळवणारा गुरु भेटेल किंवा गुरु पूर्णबोध देणारा असून त्याला शिष्य अनधिकारी भेटला तर तेंही व्यर्थ होय. सद्गुरु व सच्छिष्य दोन्ही एकत्र मिळाल्यावांचून परमार्थाची मौज नाहीं, आतां भूमि उत्तम व कणही उत्तम असेल तरी पर्जन्याची अपेक्षा असतेच.

नस्तां होये ॥ ८ ॥ सेत पेरिलें आणी उगवलें । परंतु निगेविण गेलें । साधनेंविण तैसें जालें । साधकांसी ॥ ९ ॥ जंवरी पीक आपणास भोगे । तंवरी अवघेंचि करणें लागे । पीक आलियांहि उगें । राहोंचि नये ॥ १० ॥ तैसें आत्मज्ञान जालें । परी साधन पाहिजे केलें । येक वेळ उदंड जेविलें । तरी सामग्री पाहिजे ॥ ११ ॥ म्हणोनी साधन अभ्यास आणी सद्गुरु । सच्छिष्य आणी सच्छास्त्रविचारु । सत्कर्म आणी सद्वासना पारु । पाववी भवाचा ॥ १२ ॥ सदुपासना सत्कर्म । सत्क्रिया स्वधर्म । तत्संग आणी नित्य नेम । निरंतर ॥ १३ ॥ ऐसें हें अवघेंचि मिळे । तरीच विमळ ज्ञान निवळे । नाहीं तरी पाषांड संचरे बळें । समुदाईं ॥ १४ ॥ येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरुपासीं । सद्गुरु पालटी अवगुणासी । नाना यत्नेंकरूनी ॥ १५ ॥ सद्गुरुचेनि असच्छिष्य पालटे । परंतु सच्छिष्यें असद्गुरु न पालटे । कां जें थोरपण तुटे । म्हणोनियां ॥ १६ ॥ याकारणें सद्गुरु पाहिजे । तरीच सन्मार्ग लाहिजे । नाहीं तरी होइजे । पाषांडा वरपडे ॥ १७ ॥ येथें सद्गुरुचि कारण । येर सर्व निःकारण । तथापि सांगों वोळखण । सच्छिष्याची ॥ १८ ॥ मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण । अनन्यभावें शरण । त्या नांव सच्छिष्य ॥ १९ ॥ शिष्य पाहिजे निर्मळ । शिष्य पाहिजे आचारसीळ । शिष्य पाहिजे केवळ । विरक्त अनुतापी ॥ २० ॥ शिष्य पाहिजे निष्ठावंत । शिष्य पाहिजे शुचिष्मंत । शिष्य पाहिजे नेमस्त । सर्व प्रकारीं ॥ २१ ॥ शिष्य पाहिजे साक्षेपी विशेष । शिष्य पाहिजे परम दक्ष । शिष्य पाहिजे अलक्ष । लक्षी ऐसा ॥ २२ ॥ शिष्य पाहिजे अतिधीर । शिष्य पाहिजे

त्याप्रमाणें गुरु व शिष्य उत्तम भेटले तरी अध्यात्मनिरूपणाशिवाय कांहीं उपयोग होत नाहीं. चौथा विचार. उत्तम भूमि, उत्तम कण व उत्तम वृष्टि ह्यांचा संयोग होऊन धान्य उगवलें तरी पूर्ण पीक पडे तों निगा राखली गेली तरच उपयोग. तसें सच्छिष्य, सद्गुरु व अध्यात्मश्रवण ह्यांचा योग घडला तरी सिद्धवस्तु प्राप्त होईपर्यंत साधनें केलींच पाहिजेत. पीक एकवार पदरांत पडल्यावरही हयगय करितां येत नाहीं. त्याप्रमाणें आत्मज्ञान झाल्यावर साधनत्याग करितां येत नाहीं. एकवार जेवण झालें तरी सामग्रीचा त्याग उचित नाहीं. म्हणून सच्छिष्य, सद्गुरु, सच्छास्त्रविचार, साधनाभ्यास ह्या सर्वांचा समुच्चय झाला तरच भवतरणोपाय सांपडतो. मूळपुरुषाची उपासना, स्वधर्माचार, सदाचरण, सत्कर्म, सत्संग व नित्यनेम ह्या सहा गोष्टी एकत्र जमल्या म्हणजेच शुद्धज्ञानाचा उदय होतो ; नाहीं तर समाजांत पाखांडमत फैलावतें (१–१४). शिष्यापेक्षां गुरूची जबाबदारी अधिक आहे. शिष्याला सद्गुरु अनेक प्रयत्न करून सीधा करून देतात. गुरु योग्य असले तर ते असच्छिष्याला सुधारतात, पण असद्गुरूला चांगला शिष्यही पालटूं शकत नाहीं. कां कीं तो गुरूला सुधरूं पाहील तर गुरूच्या मोठेपणाला त्यानें कमीपणा येईल. म्हणून गुरु योग्य पाहिजेत म्हणजे ते शिष्याला पाखांडमताकडे झुकूं देत नाहींत. तात्पर्य, मुख्य गुरूच चांगले पाहिजेत (१५–१८). आतां सच्छिष्याचीं लक्षणें सांगतों. सच्छिष्याचें मुख्य लक्षण हें आहे कीं तो अनन्य असावा व त्याचा सद्गुरुवचनीं पूर्ण विश्वास असावा. त्याच्या अंगीं सद्विद्येचे सर्व गुण असले पाहिजेत. तो मनाचा व आचरणाचा निर्मळ असावा, तो विरक्त व अनुतापी असावा, तो नेमस्त म्ह. युक्त किंवा मर्यादेनें राहणारा असावा, तो साक्षेपी म्ह.

अतिउदार। शिष्य पाहिजे अतितत्पर। परमार्थविषईं ॥ २३ ॥ शिष्य पाहिजे परोपकारी। शिष्य पाहिजे निर्मत्सरी। शिष्य पाहिजे अर्थांतरीं। प्रवेशकर्ता ॥ २४ ॥ शिष्य पाहिजे परमशुद्ध। शिष्य पाहिजे परमसावध। शिष्य पाहिजे अगाध। उत्तम गुणाचा ॥ २५ ॥ शिष्य पाहिजे प्रज्ञावंत। शिष्य पाहिजे प्रेमळ भक्त। शिष्य पाहिजे नीतिवंत। मर्यादेचा ॥ २६ ॥ शिष्य पाहिजे युक्तिवंत। शिष्य पाहिजे बुद्धिवंत। शिष्य पाहिजे संतासंत। विचारघेता ॥ २७ ॥ शिष्य पाहिजे धारिष्टाचा। शिष्य पाहिजे दृढ व्रताचा। शिष्य पाहिजे उत्तम कुळीचा। पुण्यशीळ ॥ २८ ॥ शिष्य असावा सात्विक। शिष्य असावा भजक। शिष्य असावा साधक। साधनकर्ता ॥ २९ ॥ शिष्य असावा विश्वासी। शिष्य असावा कायाक्लेशी। शिष्य असावा परमार्थासी। वाढऊं जाणे ॥ ३० ॥ शिष्य असावा स्वतंत्र। शिष्य असावा जगमित्र। शिष्य असावा सत्पात्र। सर्व गुणें ॥ ३१ ॥ शिष्य असावा सद्विद्येचा। शिष्य असावा सद्भावाचा। शिष्य असावा अंतरींचा। परम शुद्ध ॥ ३२ ॥ शिष्य नसावा अविवेकी। शिष्य नसावा गर्भसुखी। शिष्य असावा संसारदुःखी। संतप्तदेही ॥ ३३ ॥ जो संसारदुःखें दुखवला। जो त्रिविधतापें पोळला। तोचि अधिकारी जाला। परमार्थासी ॥ ३४ ॥ बहु दुःख भोगिलें जेणें। तयासीच परमार्थ बाणे। संसारदुःखाचेनि गुणें। वैराग्य उपजे ॥ ३५ ॥ जया संसाराचा त्रास। तयासीच उपजे विश्वास। विश्वासबळें दृढ कास। धरिली सद्गुरूची ॥ ३६ ॥ अविश्वासें कास सोडिली। ऐसीं बहुतेक भवीं बुडालीं। नाना जळचरीं तोडिलीं। मध्येंचि सुखदुःखें ॥ ३७ ॥ या कारणें दृढविश्वास। तोचि जाणावा सच्छिष्य। मोक्षाधिकारी विशेष। अग्रगण्यु ॥ ३८ ॥ जो सद्गुरुवचनें निवाला। जो सायुज्यतेचा आंखिला। संसार-

---

साधनाभ्यास करणारा व दक्ष असावा, अलक्ष्य वस्तु म्ह. परब्रह्मलक्षी असा असावा, तो परमार्थाविषयीं समुत्सुक असावा, मनानें अर्थरहस्य काढणारा व निर्मत्सरी असावा, तो प्रज्ञावंत, प्रेमळ व विवेकी असावा, तो अंगीकारलेलें व्रत दृढ-निश्चयानें पाळणारा व कायाक्लेशी म्ह. शरीरकष्टाला न डगणारा असावा, तो स्वतंत्र असावा (गुरुहून दुसऱ्या कोणाचा ताबेदार नसावा), तो गर्भसुखी नसावा (सुखांत लोळावयाची संवय झालेला मनुष्य गुरुसेवेंत व नित्यनेमांत टिकावयाचा संभव कमी), तर संसारदुखानें गांजलेला असावा. जो संसारदुःखानें व त्रिविधतापानें पोळला असेल तोच परमार्थाचा अधिकारी होतो; कां कीं संसाराविषयीं तो विरक्त झालेला असतो. वैराग्यावांचून अनन्य शरणागति होत नाहीं व ज्ञान टिकत नाहीं. अविश्वासानें व संशयानें ग्रस्त होऊन गुरूचा त्याग करणारे व म्हणून भवार्णवांतील सुख-दुःखरूप जळचरांनीं तोडलेले अनेक लोक दिसून येतात. म्हणून 'सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण' हें सच्छिष्याचें मुख्य लक्षण सांगितलें आहे. सद्गुरूवर व त्याच्या वचनावर पूर्ण विश्वास असेल तरच तो सायुज्य मोक्षाचा अधिकारी होऊन संसारदुःखांपासून सुटेल (१९–३८). सद्गुरूपेक्षां देव मोठा असें ज्याला वाटेल तो शिष्य करंटा होय; कां कीं मग देवाच्या

पांगें पांगिला । न वचे कदा ॥ ३९ ॥ सद्गुरुहून देव मोठा । जयास वाटे तो करंटा । सुटला वैभवाचा फांटा । सामर्थ्यपिसें ॥ ४० ॥ सद्गुरुस्वरूप ते संत । आणी देवांस मांडेल कल्पांत । तेथें कैंचें उरेल सामर्थ्य । हरिहरांचें ॥ ४१ ॥ म्हणोनी सद्गुरुसामर्थ्य अधिक । जेथें आटती ब्रह्मादिक । अल्पबुद्धी मानवी रंक । तयांसि हें कळेना ॥ ४२ ॥ गुरुदेवास बरोबरी । करी तो शिष्य दुराचारी । भ्रांति बैसली अभ्यंतरीं । सिद्धांत नेणवे ॥ ४३ ॥ देव मनुषीं भाविला । मंत्रीं देवपणासि आला । सद्गुरु न वचे कल्पिला । ईश्वराचेनी ॥ ४४ ॥ म्हणोनि सद्गुरु पूर्णपणें । देवाहून अधिक कोटिगुणें । जयासी वर्णितां भांडणें । वेदशास्त्रीं लागलीं ॥ ४५ ॥ असो सद्गुरुपदापुढें । दुजें कांहींच न चढे । देवसामर्थ्य तें केवढें । मायाजनित ॥ ४६ ॥ अहो सद्गुरुकृपा जयासी । सामर्थ्य न चले तयापासीं । ज्ञानबळें वैभवासी । तृणतुल्य केलें ॥ ४७ ॥ सद्गुरुकृपेचेनि बळें । अपरोक्षज्ञानाचेनि उसाळें । मायेसहित ब्रह्मांड सगळें । दृष्टीस न ये ॥ ४८ ॥ ऐसें सच्छिष्याचें वैभव । सद्गुरुवचनीं दृढभाव । तेणें गुणें देवराव । स्वयेंचि होती ॥ ४९ ॥ अंतरीं अनुतापें तापले । तेणें अंतर शुद्ध जालें । पुढें सद्गुरुवचनें निवाले । सच्छिष्य ऐसे ॥ ५० ॥ लागतां सद्गुरुवचनपंथें । जालें ब्रह्मांड पालथें । तरी जयाच्या शुद्ध भावार्थें । पालट न धरिजे ॥ ५१ ॥ शरण सद्गुरूस गेले । सच्छिष्य ऐसे निवडले । क्रियापालटें जाले । पावन ईश्वरीं ॥ ५२ ॥ ऐसा सद्भाव अंतरीं । तेचि मुक्तीचे वाटेकरी । येर माईक वेषधारी । असच्छिष्य ॥ ५३ ॥ वाटे विषयांचें

सामर्थ्याचेंच वेड लागून तो तेंच मिळविण्याच्या मागें लागून गुरुसेवेला मुकेल. सद्गुरूचें स्वरूप शाश्वत आहे व हरिहरादि देव कल्पांतीं मूळ मायेंत लीन होणारे असल्यामुळें त्यांचें सामर्थ्यही अशाश्वत आहे ; म्हणून हरि-हर-ब्रह्मादि देवांपेक्षां सद्गुरूचें सामर्थ्य अधिक आहे. देव हे गुणमायेच्या पोटीं झालेले असल्यामुळें व गुणमाया मूळमायेंत व मूळमाया शुद्ध स्वरूपांत लीन होत असल्यामुळें शुद्ध स्वरूप अनादि शाश्वत आहे व तेंच सद्गुरूचें स्वरूप आहे. मतिमंदांस हें कळत नाहीं म्हणून ते गुरुदेवांची साम्यता करूं पाहतात ; त्यांचें चित्त भ्रांतिवश झाल्यामुळें त्यांना सत्यार्थाचें आकलन होत नाहीं. दुसऱ्या देवांची मनुष्यांनीं कल्पना केली असून मंत्रांनीं त्यांना देवपणा दिला आहे आणि सद्गुरूचें स्वरूप तर देवांचा देव जो ईश्वर (मूळमाया) त्यालाही कल्पितां येत नाहीं ; कां कीं तें निर्विकल्प आहे. म्हणून सद्गुरु देवांपेक्षां कोटिपटीनें श्रेष्ठ आहे, त्याचें स्वरूप वेदशास्त्रांसही वर्णवत नाहीं. देवांचें सामर्थ्य मायेंतलें आहे व सद्गुरूच्या सामर्थ्याशीं तर तुलनाच नाहीं. सद्गुरूची ज्यावर कृपा झाली त्यापुढें कोणाचेंच बळ चालत नाहीं. सच्छिष्य हा स्वरूपज्ञानाच्या बळानें सृष्टींतलीं सारीं वैभवें तुच्छ लेखतो. सद्गुरुकृपेच्या बळानें व स्वानुभवाच्या उल्हासानें सच्छिष्याचें ऐश्वर्य अपरंपार वाढतें कीं मूळ मायेसकट सारें ब्रह्मांड त्याच्या खातरेंत येत नाहीं. सद्गुरुवचनीं दृढभाव ठेविल्यानें सच्छिष्याचें वैभव एवढें वाढतें कीं तो स्वयेंच सद्गुरुस्वरूप (देवराव) होतो (३९–४९). प्रथम अनुताप होऊन चित्त शुद्ध झालें, मग सद्गुरूला शरण गेला, सद्गुरुवचनानें मार्गाला लागून ब्रह्मांड पालथें झालें, तरी विश्वास ढळत नाहीं इतका अचळ विश्वास सद्गुरुवचनावर धरिला, व क्रियापालट होऊन स्वरूपाकार पावन झाले व सायुज्यतेला भोगते झाले असे सच्छिष्य

सुख । परमार्थ संपादणें लौकिक । देखोवेखीं पढतमूर्ख । शरण गेले ॥ ५४ ॥ जाली विषईं वृत्ति अनावर । दृढ धरिला संसार । परमार्थचर्चेचा विचार । मळिण जाला ॥ ५५ ॥ मोड घेतला परमार्थाचा । हव्यास धरिला प्रपंचाचा । भार वाहिला कुटुंबाचा । काबाडी जाला ॥ ५६ ॥ मानिला प्रपंचीं आनंद । केला परमार्थीं विनोद । भ्रांत मूढ मतिमंद । लोधला कामीं ॥ ५७ ॥ सूकर पुजिलें विलेपनें । जैसा मर्दिला चंदनें । तैसा विषयी ब्रह्मज्ञानें । विवेकें बोधिला ॥ ५८ ॥ रासभ उकरडां लोळे । तयासि परिमळसोहळे । उलूक अंधारीं पळे । तया केंवी हंसपंगती ॥ ५९ ॥ तैसा विषयदारींचा बराडी । घाली अधःपतनीं उडी । तयास भगवंत आवडी । सत्संग कैंचा ॥ ६० ॥ वर्ती करून दांताळी । श्वानपुत्र हाडें चघळी । तैसा विषयी तळमळी । विषयसुखाकारणें ॥ ६१ ॥ तया श्वानमुखीं परमान्न । कीं मर्कटास सिंहासन । तैसें विषयासक्ता ज्ञान । जिरेल कैचें ॥ ६२ ॥ रासभें राखतां जन्म गेला । तो पंडितांमध्यें प्रतिष्ठिला । न वचे तैसा आसक्ताला । परमार्थ नाहीं ॥ ६३ ॥ मिळाला राजहंसाचा मेळा । तेथें आला डोंबकावळा । लक्षून विष्ठेचा गोळा । हंस म्हणवी ॥ ६४ ॥ तैसे सज्जनाचे संगतीं । विषयी सज्जन म्हणविती । विषय आमेध्य चित्तीं । गोळा लक्षिला ॥ ६५ ॥ काखे घेऊनियां दारा । म्हणे मज संन्यासी करा । तैसा विषयी सैरा वैरा । ज्ञान बडबडी ॥ ६६ ॥ असो ऐसे पडतमूर्ख । ते काय जाणती अद्वैतसुख । नारकी प्राणी नर्क । भोगती स्वइच्छा ॥ ६७ ॥ वेषेची करील सेवा । तो कैसा मंत्री म्हणावा । तैसा विषयदास मानावा । भक्तराज केंवी ॥ ६८ ॥ तैसे विषयी बापुडे । त्यांस ज्ञान कोणीकडे । वाचाळ शाब्दिक बडबडे । वरपडे जाले

परम दुर्लभ होतात (५०–५३). इतर देखोवेखीं नुसते वरचे रंग पाहून लौकिकार्थ शरण गेलेले शिष्य अमित आहेत. चित्तांतले विषय बलवत्तर असल्यामुळें त्यांचा परमार्थाचा मोड जळून जातो, परमार्थविचार दृढ होत नाहींत व प्रपंचाचे काबाड-कष्ट करीत एके दिवशीं ते मरून जातात. मनांत कामविषय अनावर, त्यांना परमार्थचर्चा हा एक विनोदाचा विषय होतो. डुकरांना गंधादिविलेपन लावावें, रेड्याला चंदनाचा लेप लावावा, उकिरड्यांत लोळणाऱ्या गाढवांना सुगंधी द्रव्यांनीं माखावें, तसा विषयासक्तांना ब्रह्मबोध निरुपयोगी होतो ! वर दांत करून कुत्रें हाड चघळीत बसतें त्याप्रमाणें मनांत विषयांचें चर्वण करणाऱ्या विषयलोलुपांना परमार्थ, सत्संग, देव हें कांहीं मनांत भरत नाहीं. गाढवें वळतांना ज्याचा जन्म गेला तो पंडितांच्या सभेंत शोभत नाहीं, तसा गुरुभक्त सज्जन राजहंसांच्या समाजांत विषयविष्ठेचा अपवित्र (अमेध्य) गोळा लक्षून शिरणारा विषयी डोमकावळा साजत नाहीं. बायको खाकेंत आणि म्हणतो मला संन्यास द्या, तसा विषय चित्तांत आणि बडबडतो ब्रह्मज्ञान ! काय उपयोग त्याचा ? नरकांतले किडे नरक भोगणारे हे पढतमूर्ख, ह्यांना अद्वैतसुख काय होय ? वेश्यासक्त पुरुष जसा मांत्रिक होणें नाहीं (मांत्रिक निर्मळ असावा लागतो) तसा विषयांचा दास आहे तो देवाचा दास केव्हांही होणें नाहीं. शाब्दिक ज्ञानाची बडबड करणारे विषयी त्यांस ज्ञानप्राप्ति कधींही व्हावयाची नाहीं. गुरूचा उपदेश

॥ ६९ ॥ ऐसे शिष्य परम नष्ट । कनिष्ठांमध्यें कनिष्ठ । हीन अविवेक आणी दुष्ट । खळ खोटे दुर्जन ॥ ७० ॥ ऐसे जे पापरूप । दीर्घदोषी वज्रलेप । तयांसी प्रायश्चित्त अनुताप । उद्धवतां आहे ॥ ७१ ॥ तेहीं पुन्हां शरण जावें । सद्गुरूस संतोषवावें । कृपादृष्टी जालियां व्हावें । पुन्हां शुद्ध ॥ ७२ ॥ स्वामिद्रोह जया घडे । तो यावचंद्र नरकीं पडे । तयास उपावचि न घडे । स्वामी तुष्टल्यावांचुनी ॥ ७३ ॥ स्मशानवैराग्य आलें । म्हणोन लोटांगण घातलें । तेणें गुणें उपतिष्ठलें । नाहीं ज्ञान ॥ ७४ ॥ भाव आणिला जायाचा । मंत्र घेतला गुरूचा । शिष्य जाला दो दिसांचा । मंत्राकारणें ॥ ७५ ॥ ऐसे केले गुरु उदंड । शब्द सिकला पाषांड । जाला तोंडाळ तमुंड । महापाषांडी ॥ ७६ ॥ घडी येक रडे आणि पडे । घडी येक वैराग्य चढे । घडी येक अहंभाव जडे । ज्ञातेपणाचा ॥ ७७ ॥ घडी येक विश्वास धरी । सवेंच घडी येक गुर्गुरी । ऐसे नाना छंद करी । पिसाट जैसा ॥ ७८ ॥ काम क्रोध मद मत्सर । लोभ मोह नाना विकार । अभिमान कापट्य तिरस्कार । हृदईं नांदती ॥ ७९ ॥ अहंकार आणी देहपांग । अनाचार आणी विषयसंग । संसार प्रपंच उद्वेग । अंतरीं वसे ॥ ८० ॥ दीर्घसूत्री कृतघ्न पापी । कुकर्मी कुतर्की विकल्पी । अभक्त अभाव शीघ्रकोपी । निष्ठुर परघातक ॥ ८१ ॥ हृदयशून्य आणि आळसी । अविवेकी आणि अविश्वासी । अधीर अविचार संदेहासी । दृढ धर्ता ॥ ८२ ॥ आशा ममता तृष्णा कल्पना । कुबुद्धी दुर्वृत्ति दुर्वासना । अल्पबुद्धि विषयकामना । हृदईं वसे ॥ ८३ ॥ ईषणा असूया तिरस्कारें । निंदेसी प्रवर्ते आदरें । देहाभिमानें हुंबरे । जाणपणें ॥ ८४ ॥ क्षुधा तृष्णा आवरेना । निद्रा सहसा धरेना । कुटुंबचिंता वोसरेना । भ्रांति पडिली ॥ ८५ ॥ शाब्दिक बोले उदंड वाचा । लेश नाहीं वैराग्याचा । अनुताप धारिष्ट साधनाचा । मार्ग न धरी ॥ ८६ ॥ भक्ति विरक्ति ना शांती । सद्वृत्ति लीनता ना दांती । कृपा दया ना तृप्ती । सुबुद्धि असेच ना ॥ ८७ ॥

शिष्य असा विषयलंपट, नष्ट-दुष्ट, पापी निघाला तर त्याचें पाप वज्रलेप आहे. मात्र तो खरा पश्चात्ताप होऊन पुन्हां गुरूस शरण जाईल व गुरु कृपा करतील तरच त्याला उद्धारगति आहे, नाहीं तर नाहीं. ज्याला स्वामिद्रोह घडतो तो सूर्य-चंद्र आहेत तोंवर नरकांत पडतो, स्वामी संतुष्ट झाल्यांवाचून दुसरा तरणोपाय नाहीं (५४–७३). क्षणैक वैराग्य वाटून शरण गेल्यानें ज्ञान पचत नाहीं. जायाचा (क्षणिक) भाव आणिला, गुरुमंत्र घेतला, दोन दिवस दुरदुर केली, पुन्हां दुसऱ्या गुरूच्या नादीं लागला, तेथें चार शब्द अधिक शिकला; पाषांडें बडबडूं लागला; क्षणभर गातो, रडतो, वैराग्य दाखवितो व पुन्हां लगेच अहंकाराचा बंदा होतो; काम-क्रोध, विषयसंग, संशय, आशा-ममता, ईषणा (कामना), देहाहंता, निद्रा, क्षुधा-तृष्णा, चिंता इ० कुविद्येचीं सर्व लक्षणें अंगीं भरपूर आहेत व सद्विद्येचीं व सच्छिष्याचीं लक्षणें (मागें सांगितलेलीं) कोणतींच

कायाक्लेशी शरीरहीन । धर्मविषईं परम कृपण । क्रिया पालटेना कठिण । हृदय जयाचें ॥ ८८ ॥ आर्जव नाहीं जनासी । जो अप्रिय सज्जनासी । जयाचे जिवीं अहर्निशीं । परन्यून वसे ॥ ८९ ॥ सदा सर्वकाळ लटिका । बोले माईक लापणिका । क्रिया विचार पाहातां येका । वचनीं सत्य नाहीं ॥ ९० ॥ परपीडेविषईं तत्पर । जैसे विंचु कां विखार । तैसा कुशब्दें जिव्हार । भेदी सकळांचें ॥ ९१ ॥ आपलें झांकी अवगुण । पुढिलांसी बोले कठिण । मिथ्या गुणदोषेंविण । गुणदोष लावी ॥ ९२ ॥ स्वयें पापात्मा अंतरीं । पुढिलांची कणव न करी । जैसा हिंसक दुराचारी । परदुःखें शिणेना ॥९३॥ दुःख पराव्याचें नेणती । दुर्जन गांजिलेचि गांजिती । श्रम पावतां आनंदती । आपुले मनीं ॥ ९४ ॥ स्वदुःखें झुरे अंतरीं । आणी परदुःखें हास्य करी । तयास प्राप्त यमपुरी । राजदूत झोडिती ॥ ९५ ॥ असो ऐसे मदांध बापुडे । तयांस भगवंत कैंचा जोडे । जयांस सुबुद्धि नावडे । पूर्वपातकेंकरूनी ॥ ९६ ॥ तयास देहाचे अंतीं । गात्रें क्षीणता पावती । आणि जिवलगें वोसंडिती । जाणवेल तेव्हां ॥ ९७ ॥ असो ऐसे गुणावेगळे । ते सच्छिष्य आगळे । दृढभावार्थें सोहळे । भोगिती स्वानंदाचे ॥ ९८ ॥ जये स्थळीं विकल्प जागे । कुळाभिमान पाठीं लागे । ते प्राणी प्रपंचसंगें । हिंपुटी होती ॥ ९९ ॥ जेणेंकरितां दुःख जालें । तेंचि मनीं दृढ धरिलें । तेणें गुणें प्राप्त जालें । पुन्हा दुःख ॥ १०० ॥ संसारसंगें सुख जालें । ऐसें देखिलें ना ऐकिलें । ऐसें जाणोन अनहित केलें । ते दुःखी होती स्वयें ॥ १०१ ॥ संसारीं सुख मानिती । ते प्राणी मूढमती । जाणोन डोळे झांकिती । पढतमूर्ख ॥ १०२ ॥ प्रपंच सुखें करावा । परी कांहीं परमार्थ वाढवावा । परमार्थ अवघाचि बुडवावा । हें विहित नव्हे ॥ १०३ ॥ मागां जालें निरूपण । गुरुशिष्यांची वोळखण । आतां उपदेशाचें लक्षण । सांगिजेल ॥ १०४ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे शिष्यलक्षणनाम समास तृतीय ॥ ३ ॥

अंगांत नाहींत, असा मूढ, चंचळ, पतित, विषयासक्त. परन्यून पाहणारा मनुष्य एखाद्या गुरूचा शिष्य झाला म्हणून काय उपयोग? संसाराचा फजिता व परमार्थाची हानि होऊन त्याला जिवलग सोडतात व भगवंत जोडत नाहीं (७४–९७). असो. कुशिष्यांची गोष्ट पुरी झाली. सत्त्वगुणसंपन्न सच्छिष्य वैराग्य व दृढ विश्वास ह्या निर्मळ गुणांनीं स्वानंदसोहळे भोगतात. जेथें विकल्प, कुळाभिमान विषयांचें (ते दुःखद आहेत असा अनुभव आला तरी) पुनःपुन्हां चर्वण इ० दोष आहेत, ते प्रपंचासक्त जन शेवटीं कष्टी (हिंपुटी) होतात. संसार हा आद्यंत इतका दुःखरूप आहे कीं त्याच्या संगतींत कोणाला सुख झालें असें आम्हीं ऐकिलें नाहीं व पाहिलेंही नाहीं व म्हणून ज्यानें हें संसारस्वरूप जाणून डोळेझांक केली त्याला दुःख झालें तर नवल काय? संसार करीत असतांही परमार्थ अगदींच विसरणें ह्यास काय म्हणावें? (९८–१०४). [द० ५, स० ३]

॥ श्रीराम ॥ ऐका उपदेशाचीं लक्षणें । बहुविध कोणकोणें । सांगतां तें असाधारणें । परी कांहीं येक सांगों ॥ १ ॥ बहुतेक मंत्र उपदेशिती । कोणी नाममात्र सांगती । येक ते जप करविती । वोंकाराचा ॥ २ ॥ शिवमंत्र भवानीमंत्र । विष्णुमंत्र महालक्ष्मीमंत्र । अवधूतमंत्र गणेशमंत्र । मार्तंडमंत्र सांगती ॥३॥ मत्स्यकूर्मवराहमंत्र । नृसिंहमंत्र वामनमंत्र । भार्गवमंत्र रघुनाथमंत्र । कृष्णमंत्र सांगती ॥ ४ ॥ भैरवमंत्र मल्लारीमंत्र । हनुमंतमंत्र यक्षिणीमंत्र । नारायणमंत्र पांडुरंगमंत्र । अघोरमंत्र सांगती ॥ ५ ॥ शेषमंत्र गरुडमंत्र । वायुमंत्र वेताळमंत्र । झोटिंगमंत्र बहुधामंत्र । किती म्हणोनि सांगावे ॥ ६ ॥ बाळामंत्र बगळामंत्र । काळिमंत्र कंकाळिमंत्र । बटुकमंत्र नाना मंत्र । नाना शक्तीचे ॥७॥ पृथकाकारें स्वतंत्र । जितुके देव तितुके मंत्र । सोपे अवघड विचित्र । खेचर दारुण बीजाचे ॥ ८ ॥ पाहों जातां पृथ्वीवरी । देवांची गणना कोण करी । तितुके मंत्र वैखरी । किती म्हणोनि वदवावी ॥ ९ ॥ असंख्यात मंत्रमाळा । येकाहूनि येक आगळा । विचित्र मायेची कळा कोण जाणे ॥१०॥ कित्येक मंत्रीं भूतें जातीं । कित्येक मंत्रीं व्यथा नासती । कित्येक मंत्रीं उतरती । सितें विंचू विखार ॥ ११ ॥ ऐसे नाना परीचे मंत्री । उपदेशिती कर्णपात्रीं । जप ध्यान पूजा यंत्री । विधानयुक्त सांगती ॥१२॥ येक शिव शिव सांगती । येक हरि हरि म्हणविती । येक उपदेशिती । विठ्ठल विठ्ठल म्हणोनी ॥ १३ ॥ येक सांगती कृष्ण कृष्ण । येक सांगती विष्ण विष्ण । येक नारायण नारायण । म्हणोन उपदेशिती ॥ १४ ॥ येक म्हणती अच्युत अच्युत । येक म्हणती अनंत अनंत । येक सांगती दत्त दत्त । म्हणत जावें ॥ १५ ॥ येक सांगती राम राम । येक सांगती ॐ ॐ । येक म्हणती मेघःशाम । बहुतां नामीं स्मरावा ॥ १६ ॥ येक सांगती गुरु गुरु । येक म्हणती परमेश्वरु । येक म्हणती विघ्नहरु । चिंतीत जावा ॥ १७ ॥ येक सांगती श्यामराज । येक सांगती गरुडध्वज । येक सांगती अधोक्षज । म्हणत जावें

नाना मंत्रांचे उपदेश देणारे गुरु अनेक सांपडतात. कोणी प्रणवाचा जप करवितात व कोणी शिव, भवानी, विष्णु, गणेश व सूर्य ह्यांचे मंत्र देतात (१–२). अनेक देवतांचे अनेक मंत्र आहेत, जितके देव तितके मंत्र आहेत, कांहीं मंत्र सोपे आहेत, कांहीं अवघड आहेत, कांहींचीं (अथर्ववेदांतील मंत्रांप्रमाणें) बीजें दारुण आहेत. पृथ्वीवर असंख्य देव आहेत व तितकेच असंख्य मंत्र आहेत (३–१०). कित्येक मंत्रांनीं भूतबाधा जाते, कांहीं मंत्र रोगनिवारक आहेत व कांहीं थंडी, विंचु, सर्प उतरविणारे आहेत (११). असे नाना प्रकारचे मंत्र आहेत. ते कानांत सांगतात व जपध्यानपूजादि विधानेंही करवितात (१२). हरि-हरांच्या नामांचे अनेक मंत्र सांगतात, शिव-शक्तींच्या अनेक नांवांचे अनेक मंत्र आहेत (१३–२१). कोणी

॥ १८ ॥ येक सांगती देव देव । येक म्हणती केशव केशव । येक म्हणती भार्गव भार्गव । म्हणत जावें ॥ १९ ॥ येक विश्वनाथ म्हणविती । येक मल्लारि सांगती । येक ते जप करविती । तुकाई तुकाई म्हणोनी ॥ २० ॥ हें किती म्हणौनि सांगावें । शिवशक्तीची अनंत नांवें । इच्छेसारिखीं स्वभावें । उपदेशिती ॥ २१ ॥ येक सांगती मुद्रा च्यारी । खेचरी भूचरी चाचरी अगोचरी । येक आसनें परोपरी । उपदेशिती ॥२२॥ येक दाखविती देखणीं । येक अनाहत ध्वनी । येक गुरु पिंडज्ञानं । पिंडज्ञान सांगती ॥ २३ ॥ येक सांगती कर्ममार्ग । येक उपासना मार्ग । येक सांगती अष्टांग योग । नाना चक्रें ॥ २४ ॥ येक तपें सांगती । येक अजपा निरोपिती । येक तत्वें विस्तारिती । तत्वज्ञानी ॥ २५ ॥ येक सांगती सगुण । येक निरोपिती निर्गुण । येक उपदेशिती तीर्थाटण । फिरावें म्हणूनी ॥ २६ ॥ येक महावाक्यें सांगती । त्यांचा जप करावा म्हणती । येक उपदेश करिती । सर्व ब्रह्म म्हणोनी ॥२७॥ येक शाक्तमार्ग सांगती । येक मुक्तमार्ग प्रतिष्ठिती । येक इंद्रियपूजन करविती । येका भावें ॥२८॥ येक सांगती वशीकरण । स्तंबनमोहनउच्चाटन । नाना चेटकें आपण । स्वयें निरोपिती ॥ २९ ॥ ऐसी उपदेशांची स्थिती । पुरे आतां सांगों किती । ऐसे हे उपदेश असती । असंख्यात ॥ ३० ॥ ऐसे उपदेश अनेक । परी ज्ञानेंविण निरर्थक । येविषयीं असे येक भगवद्वचन ॥३१॥

खेचरी, भूचरी, चाचरी व अगोचरी अशा चार मुद्रा आहेत त्या सांगतात. (मुद्रा म्हणजे बाह्य विषयांवरचें लक्ष उडविण्यासाठीं एकविषयीं दृष्टि लावणें. खेचरी म्ह० भ्रूमध्यावरून सतत आकाशाकडे पाहणें ; भूचरी म्ह० नासिकाग्रावरून भूमीकडे नजर लावणें ; चाचरी म्ह० पापण्यांच्या चलन-वलनानें भ्रूमध्यावर पाहणें ; अगोचरी म्ह० अंतरांत पाहण्याची मुद्रा, प्रत्यग्वृत्ति). कोणी देखणीं (अपूर्व दृश्य) दाखवितात. कोणी अनाहत ध्वनि सांगतात (बाहेरून ऐकूं येणारे ध्वनि आघातापासून उत्पन्न होतात व देहांतले ध्वनि आघातावांचून होतात म्हणून ह्यांना अनाहतध्वनि म्हणतात). कोणी पिंडज्ञानाचा उपदेश करितात (२२–२३). कोणी कर्ममार्ग व कोणी उपासनामार्ग सांगतात व कोणी अष्टांगयोग सांगतात. (योग म्ह० चित्तवृत्तिनिरोध. हा साधण्यासाठीं यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि ह्यांचा क्रमानें अभ्यास सांगतात) व त्यासाठीं नाना चक्रें सांगतात (शरीरांत गुदद्वारापासून तों ब्रह्मरंध्रापर्यंत मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपुर, अनाहत, विशुद्ध व अग्नि ऊर्फ आज्ञा अशीं सहा चक्रें आहेत); कोणी तप सांगतात, कोणी अजपाजप सांगतात (प्राण्याच्या श्वासोच्छ्वासाबरोबर सतत सोहं शब्द उत्पन्न होत असतो त्याला अजपा गायत्री म्हणतात. द. १७, स. ५ पाहा); कोणी सगुणोपासना देतात, कोणी निर्गुण सांगतात, कोणी तीर्थयात्रा करावयाला सांगतात. कोणी महावाक्यांचा उपदेश करितात (चार वेदांचीं 'प्रज्ञानं ब्रह्म'–ऋग्वेद, 'अहं ब्रह्मास्मि'–यजुर्वेद, 'तत्त्वमसि'–सामवेद व 'अयमात्मा ब्रह्म'–अथर्ववेद अशीं हीं चार महावाक्यें आहेत). कोणी सर्वब्रह्माचा उपदेश करितात ; कोणी शाक्तमार्ग (शक्ति-उपासना) सांगतात, कोणी मुक्तमार्ग सांगतात व कोणी आपलीच आपण पूजा करावयाचा इंद्रियपूजेचा मार्ग सांगतात. (हीं पाखांड मतें असून सर्वब्रह्ममतांत ह्यांचा समावेश होत असल्यामुळें सर्व ब्रह्ममताचें खंडण दासबोधांत पुढें येणार आहे.) कोणी वशीकरण, जारण-मारण, इ. सांगतात असे उपदेशाचे असंख्य प्रकार आहेत (२४–३०). तथापि शुद्ध ज्ञानावांचून हे सर्व निरर्थक होत असें स्वतः भगवंताचेंच सांगणें आहे. आत्मज्ञानासारखें पवित्र दुसरें कांहीं नाहीं म्हणून आधीं आत्मज्ञान

॥ श्लोक ॥ नानाशास्त्रं पठेल्लोको नानादैवतपूजनम् । आत्मज्ञानं विना पार्थ सर्वकर्म निरर्थकं ॥
शैवशाक्तागमाद्या ये अन्ये च बहवो मताः । अपभ्रंशसमास्तेऽपि जीवानां भ्रांतचेतसाम् ॥
न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिदमुत्तमम् ॥

या कारणें ज्ञानासमान । पवित्र उत्तम न दिसे आन । म्हणोनी आधीं आत्मज्ञान । साधिलें पाहिजे ॥३२॥ सकळ उपदेशीं विशेष । आत्मज्ञानाचा उपदेश । येविषईं जगदीश । बहुतां ठाईं बोलिला ॥ ३३ ॥

॥ श्लोक ॥ यस्य कस्य च वर्णस्य ज्ञानम् देहे प्रतिष्ठितम् । तस्य दासस्य दासोऽहं भवे जन्मनि जन्मनि ॥

आत्मज्ञानाचा महिमा । नेणे चतुर्मुख ब्रह्मा । प्राणी बापुडा जिवात्मा । काये जाणे ॥ ३४ ॥ सकळ तीर्थांची संगती । स्नानदानाची फळश्रुती । त्याहूनि ज्ञानाची स्थिती । विशेष कोटिगुणें ॥ ३५ ॥

पृथिव्यां यानि तीर्थानि स्नानदानेषु यत्फलम् । तत्फलम् कोटिगुणितं ब्रह्मज्ञानसमोपमम् ॥

म्हणोनी जें आत्मज्ञान । तें गहनाहूनि गहन । ऐक तयाचें लक्षण । निरोपिजेल ॥ ३६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उपदेशनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ जंव तें ज्ञान नाहीं प्रांजळ । तंव सर्व कांहीं निर्फळ । ज्ञानरहित तळमळ । जाणार नाहीं ॥ १ ॥ ज्ञान म्हणतां वाटे भ्रम । काय रे बा असेल वर्म । म्हणोनियां अनुक्रम । सांगिजेल आतां ॥ २ ॥ भूत भविष्य वर्तमान । ठाउकें आहे परिच्छिन्न । यासीहि म्हणिजेत ज्ञान । परी तें ज्ञान नव्हे ॥ ३ ॥ बहुत केलें विद्यापठण । संगीतशास्त्र रागज्ञान । वैदिक शास्त्र वेदाध्ययन । हेंहि ज्ञान नव्हे ॥ ४ ॥ नाना व्यवसायांचें ज्ञान । नाना दीक्षेचें ज्ञान । नाना परीक्षेचें ज्ञान । हें ज्ञान नव्हे ॥ ५ ॥ नाना वनितांची परीक्षा । नाना सरितांची परीक्षा । नाना मनुष्यांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥६॥

साधलें पाहिजे. सर्व उपदेशांत आत्मज्ञानाचा उपदेश मुख्य आहे. आत्मज्ञानाचा महिमा चतुर्मुख ब्रह्मदेवाला कळला नाहीं, मग सामान्य जीवात्मा काय जाणेल ? (चतुःश्लोकी भागवत पाहा.) सकल तीर्थांच्या स्नानापेक्षां आत्मज्ञानाच्या गंगेचें स्नान कोटपटीनें श्रेष्ठ आहे. आतां गहनांतलें गहन जें आत्मज्ञान त्याचें लक्षण सांगतों. पण तें सांगण्यापूर्वी बहुधा ज्ञानाचा निरास करणें अगत्य आहे (३१–३६). [द० ५, स० ४]

जोंवर स्वच्छ ज्ञान झालें नाहीं तोंवर सर्व व्यर्थ होय. ज्ञानावांचून तळमळ थांबावयाची नाहीं. 'ज्ञान' म्हणतांच हें काय गूढ आहे असें वाटून मनुष्य घोंटाळ्यांत पडण्याचा संभव आहे. ह्याकरितां ज्ञानांत कोणत्या गोष्टी येत नाहींत हें प्रथम सांगून मग ज्ञान कोणतें तें सांगूं (१-२). भूत-भविष्य-वर्तमान सांगतां येणें ह्याला ज्ञान म्हणतात पण तें ज्ञान नव्हे. पुष्कळ विद्या शिकला, संगीत साहित्य राग शिकला, वेदशास्त्र पढला, वैदिक कर्मांत निष्णात झाला, पण हें ज्ञान नव्हे (३–४). अनेकप्रकारच्या उद्योगधंद्यांचें ज्ञान, अनेक दीक्षांचें ज्ञान, स्त्रीपरीक्षा, पुरुषपरीक्षा, अश्व-गज-परीक्षा, पशु-पक्षिपरीक्षा, भूतपरीक्षा,

नाना अश्वांची परीक्षा । नाना गजांची परीक्षा । नाना श्वापदांची पराक्षी । हें ज्ञान नव्हे ॥ ७ ॥ नाना पशूंची परीक्षा । नाना पक्षांची परीक्षा । नाना भूतांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥८॥ नाना यानांची परीक्षा । नाना वस्त्रांची परीक्षा । नाना शस्त्रांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥९॥ नाना धातूंची परीक्षा। नाना नाण्यांची परीक्षा। नाना रत्नांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १० ॥ नाना पाषाणपरीक्षा। नाना काष्ठांची परीक्षा। नाना वाद्यांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ ११ ॥ नाना भूमींची परीक्षा । नाना जळांची परीक्षा । नाना सतेज परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १२ ॥ नाना रसांची परीक्षा । नाना बीजांची परीक्षा । नाना अंकुरपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १३ ॥ नाना पुष्पांची परीक्षा । नाना फळांची परीक्षा । नाना वल्लींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १४ ॥ नाना दुःखांची परीक्षा । नाना रोगांची परीक्षा । नाना चिन्हांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १५ ॥ नाना मंत्रांची परीक्षा । नाना यंत्रांची परीक्षा । नाना मुहूर्तांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १६ ॥ नाना क्षेत्रांची परीक्षा । नाना गृहांची परीक्षा। नाना पात्रांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १७ ॥ नाना होणार परीक्षा । नाना समयांची परीक्षा । नाना तर्कांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥१८॥ नाना अनुमान परीक्षा । नाना नेमस्त परीक्षा । नाना प्रकार परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ १९ ॥ नाना विद्येची परीक्षा । नाना कळेची परीक्षा । नाना चातुर्यपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥२०॥ नाना शब्दांची परीक्षा । नाना अर्थांची परीक्षा । नाना भाषांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २१ ॥ नाना स्वरांची परीक्षा । नाना वर्णांची परीक्षा । नाना लेखनपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥२२॥ नाना मतांची परीक्षा । नाना ज्ञानांची परीक्षा । नाना वृत्तींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २३ ॥ नाना रूपांची परीक्षा । नाना रसनेची परीक्षा । नाना सुगंधपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २४ ॥ नाना सृष्टींची परीक्षा । नाना विस्तार परीक्षा । नाना पदार्थ परीक्षा । हें ज्ञान नव्हे ॥ २५ ॥ नेमकचि बोलणें ।

यानांची (वाहनांची) परीक्षा, वस्त्र-शस्त्रपरीक्षा, नानाप्रकारच्या धातूंची, नाण्यांची, रत्नांची, पाषाणांची, काष्ठांची, वाद्यांची, भूमींची, जळांची, हिऱ्या-मोत्यांची, रसांची, बीजांकुरांची, फल-पुष्प-वल्लींची परीक्षा हें ज्ञान नव्हे (५–१४). दुःखांची, रोगांची व रोगचिन्हांची परीक्षा हें ज्ञान नव्हे, मंत्रयंत्रांची परीक्षा हें ज्ञान नव्हे. क्षेत्रांची, गृहांची व पात्रांची परीक्षा हें ज्ञान नव्हे. ज्योतिष, समयज्ञता, तर्कपटुत्व, नानाविद्या, कळा-कुसरी, चातुर्य हें ज्ञान नव्हे. शब्दवेध-नानाभाषांचें ज्ञान हें ज्ञान नव्हे. स्वर-परीक्षा, वर्णपरीक्षा, लेखनपरीक्षा, नानामतपरीक्षा, अनेक शास्त्रांच्या ज्ञानांची परीक्षा, वृत्तिपरीक्षा, रूप-रस-गंध ह्या विषयांची परीक्षा, जारज-अंडजादि चतुर्विध सृष्टींची परीक्षा, नाना पदार्थांची परीक्षा, समयसूचकता, शीघ्रकवित्व हें सर्व कांहीं

तत्काळचि प्रतिवचन देणें । शीघ्रचि कवित्व करणें । हें ज्ञान नव्हे ॥ २६ ॥ नेत्रपालवी नादकळा । करपालवी भेदकळा । स्वरपालवी संकेतकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २७ ॥ काव्यकुशळ संगीतकळा । गीत प्रबंध नृत्यकळा । सभाचातुर्य शब्दकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २८ ॥ वाग्विलास मोहनकळा । रम्य रसाळ गायनकळा । हास्य विनोद कामकळा । हें ज्ञान नव्हे ॥ २९ ॥ नाना लाघवें चित्रकळा । नाना वाद्यें संगीतकळा । नाना प्रकारें विचित्र कळा । हें ज्ञान नव्हे ॥३०॥ आदिकरूनि चौसष्ट कळा । याहि वेगळ्या नाना कळा । चौदा विद्या सिद्धि सकळा । हें ज्ञान नव्हे ॥ ३१ ॥ असो सकळ कळाप्रवीण । विद्यामात्र परिपूर्ण । तरी ते कौशल्यता परी ज्ञान । म्हणोंचि नये ॥ ३२ ॥ हें ज्ञान होयेसें भासे । परंतु मुख्य ज्ञान तें अनारिसें । जेथें प्रकृतीचें पिसें । समूळ वाव ॥ ३३ ॥ जाणावें दुसऱ्याचें जीवींचें । हें ज्ञान वाटे साचें । परंतु हें आत्मज्ञानाचें । लक्षण नव्हे ॥ ३४ ॥ माहानुभाव महाभला । मानसपूजा करितां चुकला । कोणी येकें पाचारिला । ऐसें नव्हे म्हणोनी ॥ ३५ ॥ ऐसी जाणे अंतरस्थिती । तयासि परम ज्ञाता म्हणती । परंतु जेणें मोक्षप्राप्ती । तें हें ज्ञान नव्हे ॥ ३६ ॥ बहुत प्रकारींचीं ज्ञानें । सांगों जातां असाधारणें । सायुज्यप्राप्ति होये जेणें । तें ज्ञान वेगळें ॥ ३७ ॥ तरी तें कैसें आहे ज्ञान । समाधानाचें लक्षण । ऐसें हें विशद करून । मज निरोपावें ॥ ३८ ॥ ऐसें शुद्ध ज्ञान पुसिलें । तें पुढिले समासीं निरोपिलें । श्रोतां अवधान दिधलें । पाहिजे पुढें ॥ ३९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बहुधाज्ञाननाम समास पंचम ॥ ५ ॥

खरें ज्ञान नाहीं (१५–२६). नेत्रपालवी, करपालवी, स्वरपालवी, नाना नादांचें, संकेतांचें व भेदांचें ज्ञान, काव्यकौशल्य, गीत-नृत्यादि कला, सभाचातुर्य, वाग्विलास, मोहनीशक्ति, गायनकला, हास्य-विनोदादि चतुरता, चित्रकला, नाना प्रकारचीं लाघवें – थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे चौदा विद्या व चौसष्ट कला व त्यांच्या सिद्धि हें कांहीं ज्ञान नाहीं. सकलकलाप्रवीण व सकलविद्यापारंगत होणें हें कौशल्य आहे, पण हें ज्ञान नव्हे (२७–३२). हें ज्ञान असें वाटतें. पण शुद्ध ज्ञान तें वेगळेंच आहे, जेथें प्रकृति व तिचें कार्य सारें लय पावतें तें खरें ज्ञान होय. दुसऱ्याचें मनोगत जाणणें हें आत्मज्ञानाचें लक्षण नाहीं (३३–३४). कोणी एक महात्मा मानसपूजा करितांना कोठें चुकला व दुसऱ्या कोणी एकानें तेथें येऊन अंतर्ज्ञानानें 'तुम्हीं येथें चुकलां' असें जाणून त्यास स्पष्ट सांगितलें तरी ह्या अंतर्ज्ञानाला आत्मज्ञान म्हणतां येत नाहीं. अशा पुरुषाला परमज्ञाता म्हणून लोक समजोत, पण हें ज्ञान कांहीं मोक्ष देणारें नाहीं. अशीं अनेक प्रकारचीं असाधारण ज्ञानें जगांत आहेत, पण सायुज्यता देणारें शुद्ध ज्ञान तें वेगळेंच आहे. अखंड समाधान देणारें तें शुद्धज्ञान कोणतें तें आतां सांगूं (३५–३९). [द० ५, स० ५]

॥ श्रीराम ॥ ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान । पाहावें आपणासि आपण । या नांव ज्ञान ॥ १ ॥ मुख्य देवास जाणावें । सत्यस्वरूप वोळखावें । नित्यानित्य विचारावें । या नांव ज्ञान ॥ २ ॥ जेथें दृश्य प्रकृति सरे । पंचभूतिक वोसरे । समूळ द्वैत निवारे । या नांव ज्ञान ॥ ३ ॥ मनबुद्धिअगोचर । न कळे तर्काचा विचार । उल्लेख परेहूनि पर । या नांव ज्ञान ॥ ४ ॥ जेथें नाहीं दृश्यभान । जेथें जाणीव हें अज्ञान । विमळ शुद्ध स्वरूपज्ञान । यासि बोलिजे ॥ ५ ॥ सर्वसाक्षिणी अवस्था तुर्या । ज्ञान ऐसें म्हणती तया । परी तें जाणिजे वायां । पदार्थज्ञान ॥ ६ ॥ दृश्य पदार्थ वोळखिजे । त्यास पदार्थज्ञान बोलिजे । शुद्ध स्वरूप जाणिजे । या नांव स्वरूपज्ञान ॥ ७ ॥ जेथें सर्वचि नाहीं ठाईंचें । तेथें सर्वसाक्षित्व कैंचें । म्हणौनि शुद्ध ज्ञान तुर्येचें । मानूंचि नये ॥ ८ ॥ ज्ञान म्हणिजे अद्वैत । तुर्या प्रत्यक्ष द्वैत । म्हणोनि शुद्ध ज्ञान तें सतंत । वेगळेंचि असे ॥ ९ ॥ ऐक शुद्ध ज्ञानाचें लक्षण । शुद्ध स्वरूपचि आपण । या नांव शुद्ध स्वरूप-ज्ञान । जाणिजे श्रोतीं ॥ १० ॥ महावाक्य-उपदेश भला । परी त्याचा जप नाहीं बोलिला । तेथींचा तो विचारचि केला । पाहिजे साधकें ॥ ११ ॥ महावाक्य-उपदेशसार । परी घेतला पाहिजे विचार । त्याच्या जपें अंधकार । न फिटे भ्रांतीचा ॥ १२ ॥ महावाक्याचा अर्थ घेतां । आपण वस्तुचि तत्वतां । त्याचा जप करितां वृथा । सीणचि होय ॥ १३ ॥ महावाक्याचें विवरण । हें मुख्य ज्ञानाचें लक्षण । शुद्ध लक्ष्यांशें आपण । वस्तुच आहे ॥ १४ ॥ आपला आपणासि लाभ । हें ज्ञान परम दुल्लभ । जें आदिअंतीं स्वयंभ ।

आतां शुद्ध ज्ञानाचें लक्षण ऐक. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान, आपणांस आपण पाहावें ह्याचें नांव ज्ञान. मुख्य देवास जाणावें, म्ह० नित्यानित्यविचारानें अनित्याचा त्याग करून नित्य शाश्वत स्वस्वरूप ओळखावें ह्याचें नांव ज्ञान. दृश्य प्रकृतीचा जेथें लय होतो, पंचभूतिक नाहींसें होतें व संपूर्ण द्वैत नष्ट होतें तें ज्ञान. मन-बुद्धि जेथें पोहोंचत नाहींत, तर्क जेथून मागें सरतो, व जें परावाणीच्या पलीकडे आहे असें म्हटलें जातें तें ज्ञान. जेथें दृश्याचें भानही उरत नाहीं, जेथें मी ब्रह्मरूप आहें ही जाणीवही अज्ञानाचें लक्षण म्हणून समजली जाते, त्या शुद्ध स्वरूपालाच 'ज्ञान' ही संज्ञा आहे (१–५). सर्वसाक्षिणी तुर्यावस्थेलाच ज्ञान म्हणतात, पण ही अवस्था अगर वृत्ति पदार्थज्ञानांत येते, तें शुद्ध ज्ञान नव्हे. दृश्य पदार्थ जाणणें ह्याचें नांव पदार्थज्ञान व शुद्ध स्वरूप जाणणें ह्याचें नांव स्वरूपज्ञान. जेथें कांहींच ठिकाणावर नाहीं (अरे जें झालेंचि नाहीं) तेथें 'सर्व' कोठचें व त्याचें 'साक्षित्व' कोठचें ? म्हणून तुर्येला ज्ञान म्हणतां नये. ज्ञान म्ह० अद्वैत व तुर्या तर प्रत्यक्ष द्वैत (कारण तेथें कांहीं दृश्य व त्याचा द्रष्टा असा भेदभाव असतो), म्हणजे शुद्ध ज्ञान साक्षित्वाहून वेगळें आहे. शुद्ध एक स्वरूप असल्यामुळें शुद्ध ज्ञान म्हणून स्वरूपज्ञान होय (६–१०). 'तत्त्वमसि' ह्या महावाक्याचा उपदेश योग्य आहे, पण त्याचा साधकानें विचार करावयाचा आहे, जप करावयास कोठें सांगितलें नाहीं. त्याचा अर्थ मनांत घेतां आपण वस्तुच आहोंत. त्याचा जप केल्यास वृथा शीण मात्र होतो. महावाक्याचें विवरण हें ज्ञानाचें मुख्य लक्षण आहे, व महावाक्याचा लक्ष्यांश पाहतां आपण परब्रह्मच आहोंत. स्वरूपाच्या लाभापेक्षां ज्ञान दुसरें कोणतें ? अनादि स्वयंसिद्धवस्तुच आपण

स्वरूपचि स्वयें ॥ १५ ॥ जेथून हें सर्वही प्रगटे । आणी सकळही जेथें आटे । तें ज्ञान जालियां फिटे । भ्रांति बंधनाची ॥ १६ ॥ मतें आणी मतांतरें । जेथें होती निर्विकारें । अति सूक्ष्म विचारें । पाहातां ऐक्य ॥१७॥ जें या चराचराचें मूळ । शुद्ध स्वरूप निर्मळ । या नांव ज्ञान केवळ । वेदांतमतें ॥ १८ ॥ शोधितां आपलें मूळ स्थान । सहजचि उडे अज्ञान । या नांव म्हणिजे ब्रह्मज्ञान । मोक्षदायेक ॥ १९ ॥ आपणासि वोळखों जातां । आंगीं बाणे सर्वज्ञता । तेणें येकदेसी वार्ता । निशेष उडे ॥ २० ॥ मी कोण ऐसा होत । धरून पाहातां देहातीत । अवलोकितां नेमस्त । स्वरूपचि होये ॥ २१ ॥ असो पूर्वीं थोर थोर । जेणें ज्ञानें पैलपार । पावले ते साचार । ऐक आतां ॥ २२ ॥ व्यास वसिष्ठ महामुनी । शुक नारद समाधानी । जनकादिक महाज्ञानी । येणेंचि ज्ञानें ॥ २३ ॥ वामदेवादिक योगेश्वर । वाल्मीक अत्रि ऋषीश्वर । शोनिकादि अध्यात्मसार । वेदांतमतें ॥ २४ ॥ सनकादिक मुख्यकरूनी । आदिनाथ मीन गोरक्षमुनी । आणीक बोलतां वचनीं । अगाध असती ॥ २५ ॥ सिद्ध मुनी महानुभाव । सकाळांचा जो अंतर्भाव । जेणें सुखें महादेव । डुलत सदा ॥ २६ ॥ जें वेदशास्त्रांचें सार । सिद्धांतधादांतविचार । ज्याची प्राप्ति भाग्यानुसार । भाविकांस होये ॥ २७ ॥ साधु संत आणी सज्जन । भूत भविष्य वर्तमान । सर्वत्रांचें गुह्य ज्ञान । तें सांगिजेल आतां ॥ २८ ॥ तीर्थें व्रतें तपें दानें । जें न जोडे धूम्रपानें । पंचाग्नी गोरांजनें । जें प्राप्त नव्हे ॥ २९ ॥ सकळ साधनांचें फळ । ज्ञानाची सीगचि केवळ । जेणें संशयाचें मूळ । निःशेष तुटे ॥ ३० ॥ छपन्न भाषा

आहेत. हा लाभ परम दुर्लभ होय. जेथून हा सारा विश्वाकार संभवतो व जेथें लय पावतो तें ज्ञान झाल्याबरोबर सकल बंध सुटतात, मतें मतांतरें तेथें निर्विकार होतात. अतिसूक्ष्म विचारानें पाहतां तेथें ऐक्यच आहे. ह्या चराचराचें मूळ विमल-ब्रह्म आहे, त्यालाच वेदांतांत ज्ञान म्हणतात. ह्या आपल्या मूळ स्थानाला (जुनें ठेवणें) शोधतां सहजच अज्ञान मावळतें व स्वस्वरूपाच्या लाभालाच ब्रह्मज्ञान म्हणतात. आपली आपणास पूर्ण ओळख झाली कीं सर्वज्ञता सहज आपण होऊन वरिते व त्यामुळें एकदेशीपणाच्या सर्व गोष्टी मागें पडतात. मी कोण म्हणून शोध घेतां-घेतां आत्मस्वरूपाची प्राप्ति होते (११–२१). पूर्वीं व्यास, वसिष्ठ, नारद, जनक, वामदेव, वाल्मीकि, अत्रि, शुक, शौनक, सनकादिक, आदिनाथ, मीन (मत्स्येंद्रनाथ), गोरक्षनाथ इ० अनेक थोर-थोर सिद्ध मुनि ह्याच ज्ञानानें धन्य झाले ; महादेव ह्याच ज्ञानानंदानें डोलत आहेत. वेद, शास्त्र, गुरुप्रचीति व आत्मानुभव ह्या सर्वांचें सार हेंच होय, भाविकांस भाग्यानुसार ह्याचा लाभ होत असतो, मागें झाले, आतां आहेत, पुढें होणार अशा त्रिकालींच्या संतमहंतांचें गुह्यज्ञान हेंच होय (२२–२८). तीर्थव्रत, तप, दान, धूम्रपान (धूर पिऊन तप करणें), पंचाग्निसाधन (चार बाजूला अग्नि पेटवून व मस्तकावर सूर्याचा ताप घेऊन केलेलें तप), गोरांजन (स्वतःस जाळून घेणें) इ० साधनांनीं जें प्राप्त होत नाहीं असें हें शुद्धज्ञान आहे. सर्व साधनांचें फळ व ज्ञानाचें अंतिम असें हें आत्मज्ञान आहे. हें झालें असतां सर्व संशय दूर होतात. छपन्न भाषांतील सर्व थोर ग्रंथ व वेदांतादि सकल

तितुके ग्रन्थ । आदिकरून वेदांत । या इतुकियांचा गहनार्थ । येकचि असे ॥ ३१ ॥ जें नेणवे पुराणीं । जेथें सिणल्या वेदवाणी । तेंचि आतां येचि क्षणीं । बोधीन गुरुकृपें ॥ ३२ ॥ पाहिलें नस्तां संस्कृतीं । रीग नाहीं मऱ्हाष्ट ग्रन्थीं । हृदईं वसल्यां कृपामूर्ती । सद्गुरु स्वामी ॥ ३३ ॥ आतां नलगे संस्कृत । अथवा ग्रन्थ प्राकृत । माझा स्वामी कृपेसहित । हृदईं वसे ॥ ३४ ॥ न करितां वेदाभ्यास । अथवा श्रवणसायास । प्रेत्नेंविण सौरस । सद्गुरुकृपा ॥ ३५ ॥ ग्रन्थ मात्र मऱ्हाष्ट । त्याहून संस्कृत श्रेष्ठ । त्या संस्कृतामध्यें स्पष्ट । थोर तो वेदांत ॥ ३६ ॥ त्या वेदांतापरतें कांहीं । सर्वथा श्रेष्ठ नाहीं । जेथें वेदगर्भ सर्वही । प्रगट जाला ॥ ३७ ॥ असो ऐसा जो वेदांत । त्या वेदांताचाहि मथितार्थ । अति गहन जो परमार्थ । तो तूं ऐक आतां ॥ ३८ ॥ अरे गहनाचेंही गहन । तें तूं जाण सद्गुरुवचन । सद्गुरुवचनें समाधान । नेमस्त आहे ॥ ३९ ॥ सद्गुरुवचन तोचि वेदांत । सद्गुरुवचन तोचि सिद्धांत । सद्गुरुवचन तोचि धादांत । सप्रचीत आतां ॥ ४० ॥ जें अत्यंत गहन । माझ्या स्वामींचें वचन । जेणें माझें समाधान । अत्यंत जालें ॥ ४१ ॥ तें हें माझें जीवींचें गुज । मी सांगेन म्हणतों तुज । जरी अवधान देसी मज । तरी आतां येचि क्षणीं ॥ ४२ ॥ शिष्य म्लानवदनें बोले । धरिलें सद्दढ पाउलें । मग बोलों आरंभिलें । गुरुदेवें ॥ ४३ ॥ अहं ब्रह्मास्मि महावाक्य । येथींचा अर्थ अतर्क्य । तोही सांगतों ऐक्य । गुरुशिष्य जेथें ॥ ४४ ॥ ऐक शिष्या येथींचें वर्म । स्वयें तूंचि आहेसि ब्रह्म । येविषईं संदेह भ्रम । धरूंचि नको ॥४५॥ नवविधा प्रकारें भजन । त्यांत मुख्य आत्मनिवेदन । तें समग्र प्रकारें कथन । कीजेल आतां ॥ ४६ ॥ निर्माण पंचभूतें इयें । कल्पांतीं नासतीं यथान्वयें । प्रकृतिपुरुष जियें । तेही ब्रह्म होती ॥ ४७ ॥

शास्त्रें ह्यांचें रहस्य हें एकच आहे. वेद-पुराणें जेथें थकलीं तें रहस्य मी गुरुकृपेनें सांगतों. संस्कृत ग्रंथांत माझा प्रवेश झाला नाहीं व मराठी ग्रंथ मीं पाहिले नाहींत, तथापि दयाळु श्रीगुरु माझ्या हृदयांत वसले आहेत. आतां संस्कृत प्राकृत कांहीं नको, स्वामी कृपावंत माझ्या हृदयांत आहे. मी वेदाभ्यास केला नाहीं, कोठें श्रवणाचे कष्ट घेतले नाहींत, माझ्या प्रयत्नावांचून गुरुप्रसाद जोडला आहे. मराठी ग्रंथ सरस आहेत. संस्कृतवाणी मराठीपेक्षां श्रेष्ठ आहे, संस्कृतांतही वेदांत श्रेष्ठ. वेदरहस्य ज्यांत प्रगट झालें आहे त्या वेदांतापेक्षां कोणतेंही शास्त्र श्रेष्ठ नाहीं. वेदांताचाही अर्क असा हा परमार्थ आहे. गहनांतही गहन असें सद्गुरुवचन आहे, व त्यानें माझें समाधान झालें आहे. वेदांत, सिद्धांत, धादांत सर्व कांहीं सद्गुरुवचन आहे. असें तें माझ्या जीवींचें गुज मी आतां सांगतों (२९–४३). 'अहं ब्रह्मास्मि' म्ह० मी ब्रह्म आहें ह्या महावाक्याचा विचार तर्कानें कळणें कठिण आहे. तो गुरु-शिष्यांच्या एकांतांतला प्रकार सांगतों. गुरु सांगतात — "शिष्या ! तूंच स्वतः ब्रह्मस्वरूप आहेस ह्याविषयीं संदेह धरूं नकोस. नवविधा भजनांतलें मुख्य भजन म्हणजे आत्मनिवेदन होय. हीं पंचभूतें कल्पांतीं यथान्वय (त्यांच्या संबंधाप्रमाणें अर्थात् उलट क्रमानें; पृथ्वी आपांत इ० प्रकारें) नष्ट होतात व तीं ज्यांपासून

दृश्य पदार्थ आटतां । आपणहि नुरे तत्वतां । ऐक्यरूपें ऐक्यता । मुळींच आहे ॥ ४८ ॥ सृष्टीची नाहीं वार्ता । तेथें मुळींच ऐक्यता । पिंडब्रह्मांड पाहों जातां । दिसेल कोठें ॥४९॥ ज्ञानवह्नी प्रगटे । तेणें दृश्यकेर आटे । तदाकारें मूळ तुटे । भिन्नत्वाचें ॥ ५० ॥ मिथ्यत्वें वृत्ति फिरे । तों दृश्य असतांच वोसरें । सहजचि येणें प्रकारें । जालें आत्मनिवेदन ॥ ५१ ॥ असो गुरूचे ठाईं अनन्यता । तरी तुज कायसी रे चिंता । वेगळेपणें अभक्ता । उरोंचि नको ॥ ५२ ॥ आतां हेंचि दृढीकरण । व्हावया करीं सद्गुरुभजन । सद्गुरुभजनें समाधान । नेमस्त आहे ॥ ५३ ॥ या नांव शिष्या आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान । भवभयाचें बंधन । समूळ मिथ्या ॥ ५४ ॥ देह मी वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा । देहाभिमानें येरझारा । भोगिल्याच भोगी ॥ ५५ ॥ असो चहू देहावेगळा । जन्मकर्मासी निराळा । सकळ आबाळगोबळा । सबाह्य तूं ॥ ५६ ॥ कोणासीच नाहीं बंधन । भ्रांतिस्तव भुलले जन । दृढ घेतला देहाभिमान । म्हणोनियां ॥ ५७ ॥ शिष्या एकांतीं बैसावें । स्वरूपीं विश्रांतीसि जावें । तेणें गुणें दृढावे । परमार्थ हा ॥ ५८ ॥ अखंड घडे श्रवण मनन । तरीच पाविजे समाधान । पूर्ण जालिया ब्रह्मज्ञान । वैराग्य भरे आंगीं ॥५९॥ शिष्या मुक्तपणें अनर्गळ । करिसी इंद्रियें बाष्कळ । तेणें तुझी तळमळ । जाणार नाहीं ॥ ६० ॥ विषई वैराग्य उपजलें । तयासीच पूर्ण ज्ञान जालें । मणी टाकितांचि लाधलें । राज्य जेवीं ॥ ६१ ॥ मणी होतां सीगटाचा । लोभ धरूनियां तयाचा । मूर्खपणें राज्याचा । अव्हेर केला ॥ ६२ ॥ ऐक

झालीं ते प्रकृति-पुरुषही ब्रह्मांत लीन होतात. सारें दृश्य विवेकानें आटलें कीं द्रष्टा 'अहं' ही उरत नाहीं. कां कीं ब्रह्माहून तो मुळींच भिन्न नाहीं, त्यांचें मूळचेंच ऐक्य आहे. सृष्टि म्ह. दृश्य उडालें कीं ऐक्य मूळचच आहे. त्या ऐक्याच्या बाजूनें पाहतां पिंड-ब्रह्मांड आहच कोठें ? ज्ञानाग्नि पेटला कीं दृश्याचा केर भस्म होऊन जातो. तात्पर्य, ब्रह्माशीं तदाकारता झाली कीं भिन्नत्व गेलें. दृश्य सृष्टि मिथ्या आहे, हें जाणून वृत्ति माघारली कीं दृश्य असूनही नसल्यासारखेंच आहे. शुद्ध स्वरूप हेंच गुरुपद आहे त्याशीं अनन्य हो, त्याहून वेगळा उरूं नकोस. हा निश्चय सद्गुरुभजनानें दृढ कर. आत्मज्ञान हें होय. तेथें भव कोठचा व बंधन कोठचें ? 'अहं ब्रह्मास्मि' ह्याचा अनुभव असा आहे." (४४–५४). गुरु आणखी म्हणतात :– "मी ब्रह्म' ह्या अनुभवानें जसें जीवाचें साफल्य होतें, तसें मी देह म्हटल्यानें त्याचें पतन होतें. देहाभिमानी जीव आत्मघातकी होय, तो जन्म-मृत्यु पुनःपुन्हां भोगतो. शिष्या ! तूं चारही देहांच्या पलीकडचा आहेस, जन्म-कर्मांचा तुझा संबंध नाहीं. तूं सर्वांच्या आंत-बाहेर भरलेलें ब्रह्मच आहेस. जीव भ्रांतीमुळें आपणांस बद्ध समजत आहत, तत्त्वतः कोणीच बद्ध नाहीं. तूं एकांतीं बसून स्वस्वरूपीं विश्रांतिसुख भोगूं लाग म्हणजे हा परमार्थ दृढ होत जाईल. अखंड श्रवण-मननानें समाधान होतें, व ब्रह्मज्ञान पूर्ण झाल्यावर नको म्हणतां वैराग्य अंगीं जडतें. तूं 'मी मुक्त आहें' असें समजून स्वेच्छ वागून इंद्रियें विषयांकडे सोडशील तर तुझी तळमळ जाणार नाहीं. एखाद्या शिंगाच्या क्षुद्र मण्याच्या लोभानें राजानें राज्य

शिष्या सावधान । आतां भविष्य मी सांगेन । जया पुरुषास जें ध्यान । तयासि तेंचि प्राप्त ॥ ६३ ॥ म्हणोनि जे अविद्या । सांडून धरावी सुविद्या । तेणें गुणें जगद्वंद्या । पाविजे सीघ्र ॥ ६४ ॥ सन्निपाताचेनि दुःखें । भयानक दृष्टीस देखे । औषध घेतांचि सुखें । आनंद पावे ॥ ६५ ॥ तैसें अज्ञानसन्निपातें । मिथ्या दृष्टीस दिसतें । ज्ञानऔषध घेतां तें । मुळींच नाहीं ॥ ६६ ॥ मिथ्या स्वप्नें वोसणाला । तो जागृतीस आणिला । तेणें पूर्वदशा पावला । निर्भय जे ॥ ६७ ॥ मिथ्याच परी सत्य वाटलें । तेणें गुणें दुःख जालें । मिथ्या आणी निरसलें । हें तों घडेना ॥ ६८ ॥ मिथ्या आहे जागृतासी । परी वेढा लाविलें निद्रिस्तासी । जागा जालियां तयासी । भयचि नाहीं ॥ ६९ ॥ परी अविद्याझोंप येते भरें । भरे सर्वांगीं काविरें । पूर्ण जागृती श्रवणद्वारें । मननें करावी ॥ ७० ॥ जागृतीची वोळखण । ऐका तयाचें लक्षण । जो विषईं विरक्त पूर्ण । अंतरापासुनी ॥ ७१ ॥ जेणें विरक्तीस न यावें । तो साधक ऐसें जाणावें । तेणें साधन करावें । थोरीव सांडुनी ॥ ७२ ॥ साधन न मने जयाला । तो सिद्धपणें बद्ध जाला । त्याहूनि मुमुक्षु भला । ज्ञानाधिकारी ॥ ७३ ॥ तंव शिष्यें केला प्रश्न । कैसें बद्धमुमुक्षाचें लक्षण । साधक सिद्ध वोळखण । कैसी जाणावी ॥ ७४ ॥ याचें उत्तर श्रोतयांसी । दिधलें पुढिलीये समासीं । सावध श्रोतीं कथेसी । अवधान द्यावें ॥ ७५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे शुद्धज्ञाननिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

गमवावें त्याप्रमाणें क्षुद्र विषयांच्या भरीं भरून आत्मसमाधान सोडूं नकोस. ज्याचें ध्यान करावें तेंच प्राप्त होतें असा नियम आहे, अविद्येचें (संसाराचें) ध्यान करावयाचें सोडून ब्रह्मविद्येचा संग करावा म्हणजे ब्रह्मपदप्राप्ति होईल (५५–६४). अंगांत फणफणून ताप भरला कीं दृष्टीला भयावह प्रकार दिसून मनुष्य भिऊन जातो, पण औषध पोहोंचून ताप उतरला कीं सुख पावतो, त्याप्रमाणें अज्ञानज्वरामुळें मिथ्या सृष्टि दृष्टीला दिसून खरोशी वाटते, पण ज्ञानाचें औषध मिळालें कीं सृष्टि दृष्टिसमोर ठरतच नाहीं. मिथ्य स्वप्नामुळें भ्यालेल्या मनुष्यास जागें केलें कीं पूर्ण निर्भय होतो. मिथ्या सृष्टि सत्य वाटल्यामुळेंच तिच्या संगानें दुःख होतें, ती सत्य वाटते तोंवर तिचा निरास होत नाहीं. जागृत झालेल्या पुरुषास स्वप्न मिथ्या वाटतें, पण निद्रितास तें भ्रमांत पाडतेंच, जागृति आल्यावर तो निर्भयता पावतो. तशी ही अविद्येच्या निद्रेची झांपड डोळ्यांवर आहे तोंवर जीव भयानें व्याप्त असतो, म्हणून श्रवण-मननद्वारानें जागृतीस यावें (६५–७०). जागृताचीं लक्षणें सांगतों. जागृत पुरुष मनापासून विषयांविषयीं विरक्त असतो. जो विरक्त झाला नाहीं त्यानें अभिमान सोडून साधन करावें. विरक्त नसून साधनही ज्याला करवत नाहीं तो स्वतःस सिद्ध समजत असला तरी त्याचें हें समजणेंच त्याला मोठें घातक असें बंधन होतें. ‘ सिद्धपणें बद्ध ’ अशापेक्षां मुमुक्षु बरा, कां कीं तो ज्ञानाचा अधिकारी असतो. आतां ओघानेंच आलें म्हणून बद्ध, मुमुक्षु, साधक, सिद्ध ह्यांना ओळखावयाच्या खुणा सांगतों (७१–७५). [द० ५, स० ६]

॥ श्रीराम ॥ सृष्टीं जे कां चराचर । जीव दाटले अपार । परी ते अवघे चत्वार । बोलीजेती ॥ १ ॥ ऐक तयांचें लक्षण । चत्वार ते कोण कोण । बद्ध मुमुक्ष साधक जाण । चौथा सिद्ध ॥ २ ॥ यां चौघांविरहित कांहीं । सचराचरीं पांचवा नाहीं । आतां असो हें सर्वही । विशद करूं ॥ ३ ॥ बद्ध म्हणिजे तो कोण । कैसें मुमुक्षाचें लक्षण । साधकसिद्धवोळखण । कैसी जाणावी ॥ ४ ॥ श्रोतीं व्हावें सावध । प्रस्तुत ऐका बद्ध । मुमुक्ष साधक आणि सिद्ध । पुढें निरोपिले ॥ ५ ॥ आतां बद्ध तो जाणिजे ऐसा । अंधारींचा अंध जैसा । चक्षुविण दाही दिशा । शून्याकार ॥ ६ ॥ भक्त ज्ञाते तापसी । योगी वीतरागी संन्यासी । पुढें देखतां दृष्टीसी । येणार नाहीं ॥ ७ ॥ न दिसे नेणे कर्माकर्म । न दिसे नेणे धर्माधर्म । न दिसे नेणे सुगम । परमार्थपंथ ॥ ८ ॥ तयास न दिसे सच्छास्त्र । सत्संगति सत्पात्र । सन्मार्ग जो कां पवित्र । तोही न दिसे ॥ ९ ॥ न कळे सारासारविचार । न कळे स्वधर्मआचार । न कळे कैसा परोपकार । दानपुण्य ॥ १० ॥ नाहीं पोटीं भूतदया । नाहीं शुचिष्मंत काया । नाहीं जनासि निववावया । वचन मृद ॥ ११ ॥ न कळे भक्ति न कळे ज्ञान । न कळे वैराग्य न कळे ध्यान । न कळे मोक्ष न कळे साधन । या नांव बद्ध ॥ १२ ॥ न कळे देव निश्चयात्मक । न कळे संतांचा विवेक । न कळे मायेचें कौतुक । या नांव बद्ध ॥ १३ ॥ न कळे परमार्थाची खूण । न कळे अध्यात्मनिरूपण । न कळे आपणासि आपण । या नांव बद्ध ॥ १४ ॥ न कळे जीवाचें जन्ममूळ । न कळे साधनाचें फळ । न कळे तत्वता केवळ । या नांव बद्ध ॥ १५ ॥ न कळे कैसें तें बंधन । न कळे मुक्तीचें लक्षण । न कळे वस्तु विलक्षण । या नांव बद्ध ॥ १६ ॥ न कळे शास्त्रार्थ बोलिला । न कळे निजस्वार्थ आपुला । न कळे संकल्पें बांधला ।

ह्या सृष्टीमध्यें अनंत जीव आहेत. त्यांचे बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध असे चार वर्ग होतात, पांचवा प्रकार नाहीं. आतां ह्या चौघांचीं लक्षणें क्रमानें सांगतों. आधीं बद्ध घेऊं (१–५). अंध असून अंधारांत चालणाऱ्या मनुष्याला दशदिशा जशा शून्य असतात तसा बद्ध असतो. भक्त, ज्ञाते, तापसी, योगी, विरक्त, संन्यासी हे त्याच्या डोळ्याला दिसतच नाहींत. कर्म व अकर्म, धर्म व अधर्म हे त्याला दिसत नाहींत. सुगम परमार्थ मार्गही त्याला दिसत नाहीं. सच्छास्त्र, सत्संग, सत्पात्र (सज्जन), सन्मार्ग ह्यांतलें त्याला कांहींच दिसत नाहीं. बद्धाला सारासारविचार कळत नाहीं, स्वधर्माचार ठाऊक नाहीं, दान, पुण्य, परोपकार हे तो कांहीं जाणत नाहीं. पोटीं भूतदया नाहीं, शुचिर्भूतता नाहीं, जनांस सुख होईल असें मृदु वचनही बद्धापाशीं नाहीं (६–११). न कळे भक्ति, न कळे ज्ञान. वैराग्य, ध्यान, मोक्ष व त्याचें साधन कांहीं नाहीं. निश्चयात्मक देव ठाऊक नाहीं, संतांचा विवेक माहिती नाहीं, मायेचें कौतुक पाहिलें नाहीं, परमार्थाची खूण कळत नाहीं, अध्यात्मनिरूपण ऐकिलें नाहीं, आपणास आपण ओळखत नाहीं, जीवाचें जन्ममूळ शोधलें नाहीं ह्याचें नांव बद्ध. बंध-मोक्षाचा विचार केलेला नाहीं. त्याहून निराळी अशी आत्मवस्तु काय आहे हें माहीत नाहीं, कळत नाहीं. कोणीं शास्त्र सांगितलें तर अवगत होत नाहीं,

या नांव बद्ध ॥ १७ ॥ जयासि नाहीं आत्मज्ञान । हें मुख्य बद्धाचें लक्षण । तीर्थ व्रत दान पुण्य । कांहींच नाहीं ॥ १८ ॥ दया नाहीं करुणा नाहीं । आर्जव नाहीं मित्री नाहीं । शांति नाहीं क्षमा नाहीं । या नांव बद्ध ॥ १९ ॥ जें ज्ञानविशिं उणें । तेथें कैचीं ज्ञानाचीं लक्षणें । बहुसाल कुलक्षणें । या नांव बद्ध ॥ २० ॥ नाना प्रकारींचे दोष । करितां वाटे परम संतोष । बाष्कळपणाचा हव्यास । या नांव बद्ध ॥ २१ ॥ बहु काम बहु क्रोध । बहु गर्व बहु मद । बहु द्वंद बहु खेद । या नांव बद्ध ॥ २२ ॥ बहु दर्प बहु दंभ । बहु विषये बहु लोभ । बहु कर्कश बहु अशुभ । या नांव बद्ध ॥ २३ ॥ बहु ग्रामणी बहु मत्सर । बहु असूया तिरस्कार । बहु पापी बहु विकार । या नांव बद्ध ॥ २४ ॥ बहु अभिमान बहु ताठा । बहु अहंकार बहु फांटा । बहु कुकर्माचा सांठा । या नांव बद्ध ॥ २५ ॥ बहु कापट्य वादवेवाद । बहु कुतर्क भेदाभेद । बहु क्रूर कृपामंद । या नांव बद्ध ॥ २६ ॥ बहु निंदा बहु द्वेष । बहु अधर्म बहु अभिलाष । बहु प्रकारींचे दोष । या नांव बद्ध ॥ २७ ॥ बहु भ्रष्ट अनाचार । बहु नष्ट येकंकार । बहु आनित्य अविचार । या नांव बद्ध ॥ २८ ॥ बहु निष्ठुर बहु घातकी । बहु हत्यारा बहु पातकी । तपीळ कुविद्या अनेकी । या नांव बद्ध ॥ २९ ॥ बहु दुराशा बहु स्वार्थी । बहु कळह बहु अनर्थी । बहु डाईक दुर्मती । या नांव बद्ध ॥ ३० ॥ बहु कल्पना बहु कामना । बहु तृष्णा बहु वासना । बहु ममता बहु भावना । या नांव बद्ध ॥ ३१ ॥ बहु विकल्पी बहु विषादी । बहु मूर्ख बहु समंधी । बहु प्रपंची बहु उपाधी । या नांव बद्ध ॥ ३२ ॥ बहु वाचाळ बहु पाषांडी । बहु दुर्जन बहु थोतांडी । बहु पैशून्य बहु खोडी । या बद्ध ॥ ३३ ॥ बहु अभाव बहु भ्रम । बहु भ्रांति बहु तम । बहु विक्षेप बहु विराम । या नांव बद्ध ॥ ३४ ॥ बहु कृपण बहु खंदस्ती । बहु अदेखणा बहु मस्ती । बहु असत्क्रिया व्यस्ती । या नांव बद्ध ॥ ३५ ॥ परमार्थविषईं अज्ञान । प्रपंचाचें उदंड ज्ञान । नेणें स्वयें समाधान । या नांव बद्ध ॥ ३६ ॥ परमार्थाचा अनादर । प्रपंचाचा अत्यादर । संसारभार जोजार । या नांव बद्ध ॥ ३७ ॥

तो आपल्याच संकल्पानें बांधलेला असतो. ज्याला आत्मज्ञान नाहीं, तो बद्ध (१२-१८). दया, क्षमा, करुणा, मैत्री, शांति बद्धाजवळ नाहीं; अज्ञानाचीं सर्व कुलक्षणें मात्र आहेत. दंभ, दर्प, अभिमान, काम, क्रोध, मत्सर, कृतघ्नता, कपट, कुतर्क, इ० अनेक दोष बद्धाच्या अंगीं असतात. भ्रष्ट, अनाचार, स्वार्थी, कुटिल, विषादी, मूर्ख, वाचाळ, पाखांडी, कठोर, कृपण,

सत्संगाची नाहीं गोडी । संतनिंदेची आवडी । देहेबुद्धीची घातली बेडी । या नांव बद्ध ॥ ३८ ॥ हातीं द्रव्याची जपमाळ । कांताध्यान सर्वकाळ । सत्संगाचा दुष्काळ । या नांव बद्ध ॥ ३९ ॥ नेत्रीं द्रव्यदारा पाहावी । श्रवणीं द्रव्यदारा ऐकावी । चिंतनीं द्रव्यदारा चिंतावी । या नांव बद्ध ॥ ४० ॥ काया वाचा आणि मन । चित्तवित्त जीव प्राण । द्रयव्दारेचें करी भजन । या नांव बद्ध ॥ ४१ ॥ इंद्रियें करून निश्चळ । चंचळ होऊं नेदी पळ । द्रव्यदारेसि लावी सकळ । या नांव बद्ध ॥ ४२ ॥ द्रव्यदारा तेंचि तीर्थ । द्रव्यदारा तोचि परमार्थ । द्रव्यदारा सकळ स्वार्थ । म्हणे तो बद्ध ॥ ४३ ॥ व्यर्थ जाऊं नेदी काळ । संसारचिंता सर्वकाळ । कथा वार्ता तेचि सकळ । या नांव बद्ध ॥ ४४ ॥ नाना चिंता नाना उद्वेग । नाना दुःखाचे संसर्ग । करी परमार्थाचा त्याग । या नांव बद्ध ॥४५॥ घटिका पळ निमिषभरी । दुश्चित नव्हतां अंतरीं । सर्वकाळ ध्यान करी । द्रव्यदाराप्रपंचाचें ॥ ४६ ॥ तीर्थ यात्रा दान पुण्य । भक्तिकथा निरूपण । मंत्र पूजा जप ध्यान । सर्वही द्रव्य दारा ॥ ४७ ॥ जागृति स्वप्न रात्रि दिवस । ऐसा लागला विषयध्यास । नाहीं क्षणाचा अवकाश । या नांव बद्ध ॥ ४८ ॥ ऐसें बद्धाचें लक्षण । मुमुक्षपणीं पालटे जाण । ऐक तेही वोळखण । पुढिलीये समासीं ॥ ४९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे बद्धलक्षणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ संसारमदाचेनिं गुणें । नाना हीनें कुलक्षणें । जयाचेनि मुखावलोकनें । दोषचि लागे ॥ १ ॥ ऐसा प्राणी जो कां बद्ध । संसारीं वर्ततां अबद्ध । तयास प्राप्त जाला खेद । काळांतरीं ॥ २ ॥ संसारदुःखें दुखवला । त्रिविधतापें पोळला । निरूपणें प्रस्तावला । अंतर्यामीं ॥ ३ ॥ जाला प्रपंचीं उदास । मनें घेतला विषयत्रास । म्हणे आतां पुरे सोस । संसारींचा ॥ ४ ॥ प्रपंच जाईल सकळ । येथील श्रम तों निर्फळ । आतां

किती म्हणून दोष सांगावे ? परमार्थाचा अनादर प्रपंचाचा अत्यादर, असा देहबुद्धीनें बांधलेला तो बद्ध (१९–३८). हातीं द्रव्याची जपमाळ, कांताध्यान सर्वकाळ हें बद्धाचें लक्षण. बद्ध काया-वाचा-मनानें द्रव्य-दारा ह्यांच्या भजनांत मग्न असतो. संसाराच्या कथा-वार्तांशिवाय त्याला कांहीं सुचत नाहीं. रात्रंदिवस विषयांचें ध्यान. असो. बद्धाचा पालट मुमुक्षुपणांत होतो (३९–४९). [द० ५, स० ७]

संसाराचा मद चढल्यानें अनेक हीन लक्षणें अंगीं जडतात. अशा कुलक्षणी मनुष्याचें तोंड पाहणेंही दोषावह होतें. असो. बद्ध कालगतीनें संसारदुःखांनीं होरपळून निघाला, त्याला कांहीं कथानिरूपणें ऐकावयाला मिळालीं, तो संसाराला पूर्ण

कांहीं आपुला काळ । सार्थक करूं ॥ ५ ॥ ऐसी बुद्धि प्रस्तावली । पोटीं अवस्था लागली । म्हणे माझी वयसा गेली । व्यर्थचि आवघी ॥ ६ ॥ पूर्वीं नाना दोष केले । ते अवघेचि आठवले । पुढें येऊनि उभे ठेले । अंतर्यामीं ॥ ७ ॥ आठवे यमाची यातना । तेणें भयचि वाटे मना । नाहीं पापासि गणना । म्हणोनियां ॥ ८ ॥ नाहीं पुण्याचा विचार । जाले पापाचे डोंगर । आतां दुस्तर हा संसार । कैसा तरों ॥ ९ ॥ आपले दोष आच्छादिले । भल्यांस गुणदोष लाविले । देवा म्यां व्यर्थच निंदिले । संत साधु सज्जन ॥ १० ॥ निंदेऐसे नाहीं दोष । ते मज घडले कीं विशेष । माझे अवगुणीं आकाश । बुडों पाहे ॥ ११ ॥ नाहीं वोळखिले संत । नाहीं अर्चिला भगवंत । नाहीं अतीत अभ्यागत । संतुष्ट केले ॥ १२ ॥ पूर्व पाप वोढवलें । मज कांहींच नाहीं घडलें । मन अव्हाटीं पडिलें । सर्वकाळ ॥ १३ ॥ नाहीं कष्टविलें शरीर । नाहीं केला परोपकार । नाहीं रक्षिला आचार । कामंमदें ॥ १४ ॥ भक्तिमाता हे बुडविली । शांतिविश्रांति मोडिली । मूर्खपणें म्यां विघडिली । सद्बुद्धि सद्वासना ॥ १५ ॥ आतां कैसें घडे सार्थक । दोष केले निरर्थक । पाहों जातां विवेक । उरला नाहीं ॥ १६ ॥ कोण उपाय करावा । कैसा परलोक पावावा । कोण्या गुणें देवाधिदेवा । पाविजेल ॥ १७ ॥ नाहीं सद्भाव उपजला । अवघा लोकिक संपादिला । दंभें वरपंग केला । खटाटोप कर्माचा ॥ १८ ॥ कीर्तन केलें पोटासाठीं । देव मांडिले हाटवटीं । आहा देवा बुद्धि खोटी । माझी मीच जाणे ॥ १९ ॥ पोटीं धरूनि अभिमान । शब्दीं बोले निरभिमान । अंतरीं वांछूनियां धन । ध्यानस्थ जालों ॥ २० ॥ व्युत्पत्तीनें लोक भोंदिले । पोटासाठीं संत निंदिले । माझे पोटीं दोष भरले । नाना प्रकारींचे ॥ २१ ॥ सत्य तेंचि उच्छेदिलें । मिथ्य तेंचि प्रतिपादिलें । ऐसें नाना कर्म केलें । उदरंभराकारणें

विटला, काळ सार्थकीं लावण्याची त्याला बुद्धि झाली, त्याला पूर्वकर्मस्मरणानें पुरा अनुताप झाला. केलेल्या पातकांची आठवण झाली व यमाच्या दरबारच्या शिक्षा मनांत आल्या. पुण्याची बाजू कोरी असल्यानें ह्या भवांतून कसे तरूं अशी थोर चिंता लागली. मागचे दोष आठवले. आजवर साधु-संतांची कशी निंदा केली, अतीत-अभ्यागत जाणले नाहींत, मन सर्व काळ आडमार्गींच कसें शिरत गेलें, काम-क्रोध-मद-मत्सरांला कस-कसे बळी पडत गेलों, परोपकाराचे सर्व प्रसंग कसे लाथाडले, धर्मलंडपणानें वागून भगवंताचें भजन-अर्चन कसें बिलकूल केलें नाहीं, निरर्थक अनेक पातकें केलीं—आतां उपाय काय करावा, आतां देव मला कसा पावेल असा विचार मनीं स्फुरूं लागला. कांहीं देवतार्चन केलें असलेंच तर तें केवळ दंभासाठीं व लौकिकासाठीं केलें, देव बाजारांत मांडून पोटासाठीं कीर्तन केलें, सर्वथा पोटीं खोटी बुद्धि ठेवून वागलों, आंत अहंकाराचा राक्षस उभा करून बाहेर निरभिमानाची भाषा बोलत आलों, अंतरीं द्रव्यार्जनाचा लोभ ठेवून ध्यान धरून बसलों, व्युत्पत्तीनें बाया-बापड्यांना भोंदलें, पोटासाठीं संत निंदिले, असे नाना दोष आंत असतांना उदरंभरणासाठीं अनेक वाईट कामें केलीं, सत्याचा उच्छेद करून असत्य प्रतिपादिलें—असा पूर्ण पश्चात्ताप होऊन कथानिरूपणं ऐकतां-ऐकतां

॥ २२ ॥ ऐसा पोटीं पस्तावला । निरूपणें पालटला तोचि मुमुक्षु बोलिला । ग्रन्थांतरीं ॥ २३ ॥ पुण्यमार्ग पोटीं धरी । सत्संगाची वांछा करी । विरक्त जाला संसारीं । या नांव मुमुक्षु ॥ २४ ॥ गेले राजे चक्रवर्ती । माझें वैभव तें किती । म्हणे धरूं सत्संगती । या नांव मुमुक्षु ॥ २५ ॥ आपुले अवगुण देखे । विरक्तिबळें वोळखे । आपणासि निंदी दुःखें । या नांव मुमुक्षु ॥ २६ ॥ म्हणे मी काय अनुपकारी । म्हणे मी काय दंभधारी । म्हणे मी काय अनाचारी । या नांव मुमुक्षु ॥ २७ ॥ म्हणे मी पतित चांडाळ । म्हणे मी दुराचारी खळ । म्हणे मी पापी केवळ । या नांव मुमुक्षु ॥ २८ ॥ म्हणे मी अभक्त दुर्जन । म्हणे मी हीनाहूनि हीन । म्हणे मी जन्मलों पाषाण । या नांव मुमुक्षु ॥ २९ ॥ म्हणे मी दुरभिमानी । म्हणे मी तपिळ जनीं । म्हणे मी नाना-व्यसनी । या नांव मुमुक्षु ॥ ३० ॥ म्हणे मी आळसी अंगचोर । म्हणे मी कपटी कातर । म्हणे मी मूर्ख अविचार । या नांव मुमुक्षु ॥ ३१ ॥ म्हणे मी निकामी वाचाळ । म्हणे मी पाषांडी तोंडाळ । म्हणे मी कुबुद्धि कुटिळ । या नांव मुमुक्षु ॥ ३२ ॥ म्हणे मी कांहींच नेणें । म्हणे मी सकळाहूनि उणें । आपलीं वर्णी कुलक्षणें । या नांव मुमुक्षु ॥ ३३ ॥ म्हणे मी अनधिकारी । म्हणे मी कुश्चिळ अघोरी । म्हणे मी नीच नानापरी । या नांव मुमुक्षु ॥ ३४ ॥ म्हणे मी काय आपस्वार्थी । म्हणे मी काय अनर्थी । म्हणे मी नव्हे परमार्थी । या नांव मुमुक्षु ॥ ३५ ॥ म्हणे मी अवगुणांची रासी । म्हणे मी व्यर्थ आलों जन्मासी । म्हणे मी भार जालों भूमीसी । या नांव मुमुक्षु ॥ ३६ ॥ आपणास निंदी सावकाश । पोटीं संसाराचा त्रास । धरी सत्संगाचा हव्यास । या नांव मुमुक्षु ॥ ३७ ॥ नाना तीर्थें धुंडाळिलीं । शमदमादि साधनें केलीं । नाना ग्रन्थांतरें पाहिलीं । शोधूनियां ॥ ३८ ॥ तेणें नव्हे समाधान । वाटे अवघाच अनुमान । म्हणे रिघों संतांस शरण । या नांव मुमुक्षु ॥ ३९ ॥ देहाभिमान कुळाभिमान ।

अंतर्यामी पुरा पालटला, त्यालाच मुमुक्षु असें म्हणतात (१–२३). जो संसाराला विटला व ज्याला सत्संगाची व पुण्यमार्गाची आवड उत्पन्न झाली तो मुमुक्षु. ज्याला आपले सारे अवगुण दिसतात व वैराग्यबळानें ते ओळखून त्यांची आपणच निंदा करतो तो मुमुक्षु. मी पतित, मी दांभिक, मी नानाव्यसनी, मी कुबुद्धि, कुटिळ व दुराचारी, मी अनधिकारी, मी स्वार्थी, मी अवगुणांची राशी व्यर्थ जन्मास आलों इ० प्रकारें अनुतापपूर्वक आपल्या अवगुणांची निंदा करितो तो मुमुक्षु (२४–३७). सत्संग घडावा, सन्मार्ग लागावा व जन्म सफळ व्हावा ह्याच हेतूनें तो तीर्थक्षेत्रांस जातो, शम-दमादि साधनें करितो, परमार्थग्रंथांचें मनन करितो, श्रवण-मननांत काळ घालवितो व इतकें करूनही समाधान न झाल्यानें जो संतांस शरण जातो व देहाचा, कुळाचा, द्रव्याचा सर्व अभिमान झाडून संतांना अनन्यभावें शरण जातो

द्रव्याभिमान नानाभिमान । सांडूनि संतचरणीं अनन्य । या नांव मुमुक्षु ॥ ४० ॥ अहंता सांडूनि दूरी । आपणास निंदी नानापरी । मोक्षाची अपेक्षा करी । या नांव मुमुक्षु ॥ ४१ ॥ ज्याचें थोरपण लाजे । परमार्थाकारणें झिजे । संतापाईं विश्वास उपजे । या नांव मुमुक्षु ॥ ४२ ॥ स्वार्थ सांडून प्रपंचाचा । हव्यास धरिला परमार्थाचा । अंकित होईन सज्जनाचा । म्हणे तो मुमुक्षु ॥ ४३ ॥ ऐसा मुमुक्षु जाणिजे । संकेतचिन्हें वोळखिजे । पुढें श्रोतीं अवधान दीजे । साधकलक्षणीं ॥ ४४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मुमुक्षुलक्षणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ मागां मुमुक्षूचें लक्षण । संकेतें केलें कथन । आतां परिसा सावधान । साधक तो कैसा ॥ १ ॥ अवगुणाचा करूनि त्याग । जेणें धरिला संतसंग । तयासी बोलिजे मग । साधक ऐसा ॥ २ ॥ जो संतांसी शरण गेला । संतजनीं आश्वासिला । मग तो साधक बोलिला । ग्रन्थांतरीं ॥ ३ ॥ उपदेशिलें आत्मज्ञान । तुटलें संसारबंधन । दृढतेकारणें करी साधन । या नांव साधक ॥ ४ ॥ धरी श्रवणाची आवडी । अद्वैतनिरूपणाची गोडी । मननें अर्थांतर काढी । या नांव साधक ॥ ५ ॥ होतां सारासारविचार । ऐके होऊनि तत्पर । संदेह छेदूनि दृढोत्तर । आत्मज्ञान पाहे ॥ ६ ॥ नाना संदेहनिवृत्ती । व्हावया धरी सत्संगती । आत्मशास्त्रगुरुप्रचीती । ऐक्यतेसि आणी ॥ ७ ॥ देहबुद्धि विवेकें वारी । आत्मबुद्धि सदृढ धरी । श्रवण मनन केलेंचि करी । या नांव साधक ॥ ८ ॥ विसंचूनि दृश्यभान । दृढ धरी आत्मज्ञान । विचारें राखे समाधान । या नांव साधक ॥ ९ ॥ तोडूनि द्वैताची उपाधी । अद्वैत वस्तु साधनें साधी । लावी ऐक्यतेची समाधी । या नांव साधक ॥१०॥ आत्मज्ञान जीर्ण जर्जर । त्याचा करी जीर्णोद्धार । विवेकें पावे पैलपार ।

तो मुमुक्षु. तात्पर्य, प्रपंचाचा स्वार्थ सोडून, ज्यानें परमार्थाचा हव्यास धरिला व त्यासाठीं सत्संग धरिला तो मुमुक्षु जाणावा (३८–४४). [द० ५, स० ८]

अनुतापतप्त होऊन अवगुणांचा त्याग केला, मग संतसंग धरिला, संतांना पूज्यभावानें शरण गेला, संतांनीं आश्वासन दिलें, संत-सद्गुरुमुखानें आत्मज्ञान झालें, संसारबंधन तुटलें व ह्या क्रमानें जाऊन प्राप्त झालेलें ज्ञान दृढ व्हावें ह्यासाठीं साधन करूं लागला म्हणजे त्याला साधक असें म्हणतात (१–४). सत्संगांत अद्वैतनिरूपणाची गोडी लागून मननानें लक्ष्यार्थ घेतो व देहबुद्धीची भ्रांति (संदेह) उडवून आत्मज्ञान पाहतो, शास्त्रप्रचीति, गुरुप्रचीति व आत्मप्रचीति म्ह० शास्त्रसिद्धांत, गुरूपदेश व स्वानुभव ह्या तिहींच्या ऐक्याचा स्वाद घेतो, विवेकानें देहबुद्धि उडवून आत्मबुद्धि जीवीं धरितो, श्रवण-मननाचा अभ्यास सोडीत नाहीं, दृश्याचें भान विसरून आत्मभाव सदृढ धरितो व येणें प्रकारें आत्मसाधन राखतो तो साधक (५–९). द्वैताची उपाधि तोडून अद्वैतवस्तुसाधनांत तो असतो, वस्तूशीं (परब्रह्माशीं) समाधि लावतो. आत्मज्ञा

या नांव साधक ॥ ११ ॥ उत्तमें साधूचीं लक्षणें । आंगिकारी निरूपणें । बळेंचि स्वरूपाकार होणें । या नांव साधक ॥ १२ ॥ असत्क्रिया ते सोडिली । आणी सत्क्रिया ते वाढविली । स्वरूपस्थिती बळावली । या नांव साधक ॥ १३ ॥ अवगुण त्यागी दिवसेंदिवस । करी उत्तम गुणांचा अभ्यास । स्वरूपीं लावी निजध्यास । या नांव साधक ॥ १४ ॥ दृढनिश्चयाचेनि बळें । दृश्य असतांच नाडळे । सदा स्वरूपीं मिसळे । या नांव साधक ॥ १५ ॥ प्रत्यक्ष माया अलक्ष करी । अलक्ष वस्तु लक्षी अंतरीं । आत्मस्थितीची धारणा धरी । या नांव साधक ॥ १६ ॥ जें या जनासि चोरलें । मनास न वचे अनुमानलें । तेंचि जेणें दृढ केलें । या नांव साधक ॥ १७ ॥ जें बोलतांचि वाचा धरी । जें पाहतांचि अंध करी । तें साधी नाना परी । या नांव साधक ॥ १८ ॥ जें साधूं जातां साधवेना । जें लक्षूं जातां लक्षवेना । तेंचि अनुभवें आणी मना । या नांव साधक ॥ १९ ॥ जेथें मनचि मावळे । जेथें तर्कचि पांगुळे । तेंचि अनुभवा आणी बळें । या नांव साधक ॥ २० ॥ स्वानुभवाचेनि योगें । वस्तु साधी लागवेगें । तेंचि वस्तु होये आंगें । या नांव साधक ॥ २१ ॥ अनुभवाचीं आंगें जाणे । योगियांचे खुणे बाणे । कांहींच नहोन असणें । या नांव साधक ॥ २२ ॥ परती सारून उपाधी । असाध्य वस्तु साधनें साधी । स्वरूपीं करी दृढ बुद्धि । या नांव साधक ॥ २३ ॥ देवाभक्ताचें मूळ । शोधून पाहे सकळ । साध्यचि होय तत्काळ । या नांव साधक ॥ २४ ॥ विवेकबळें गुप्त जाला । आपेंआप मावळला । दिसतो परी देखिला । नाहींच

जीर्णजर्जर झालेलें म्ह० अनंत जन्मीं तें विषयसंगतीनें विसरलेला त्याचा हा जीर्णोद्धार करितो म्ह० त्या स्वयंसिद्धज्ञानासही मदढ जीवीं धरितो, हा विवेकबळानें उगमाशीं जातो, निरूपणप्रसंगीं ऐकलेलीं सिद्ध लक्षणें आपल्या अंगीं आणूं पाहतो व हा 'बळेंचि स्वरूपाकार' होतो म्ह० जन्मोजन्मीं जडलेला विषयसंबंध तोडून प्रयत्नपूर्वक अट्टाहासानें हा स्वरूपीं लगटतो (साधकाला प्रयत्नसाध्य पण सिद्धाला सहजच सुलभ असा हा आत्मलाभ आहे). असत् (मिथ्या) कर्में टाकून हा सत्कर्माचरणांत मग्न असतो, सद्गुण वाढवितो व स्वरूपाचा निदिध्यास घेतो. ह्याचा आत्मनिश्चय (मी देह नसून आत्मा आहें हा निश्चय) दृढ असल्यामुळें हें दृश्य जगत् जगपणानें त्याला दिसत नाहीं (तर आत्मरूपच दिसतें) व हा स्वरूपीं मिळून जातो. माया म्ह० सृष्टि प्रत्यक्ष असून तो वृत्तीवर घेत नाहीं व परब्रह्म अलक्ष्य असून तो तें अंतरीं लक्षितो व ह्याप्रमाणें आत्मस्थितीची धारणा धरितो. जी वस्तु सामान्यांना गूढ वाटते, जी मनाला भासत नाहीं, जी हट्टानें साधूं जातां साधणें दुर्घट आहे, जेथें मन मावळतें व तर्क पांगुळतो, ती वस्तु स्वानुभवाच्या योगें हा स्वयेंच होतो (१०–२१). साधकाला योगाचीं अंगें माहीत असतात, तो 'कांहींच नसून असतो' म्ह० विशेषत्वाला न येतां आत्मरूपींच असतो. देहादि उपाधि दूर करून असाध्य वस्तु तो साधनांनीं साधून घेतो व स्वरूपीं स्थिर होतो. देवाभक्तांचें मूळ शोधीत-शोधीत तो सिद्ध वस्तु होऊन जातो. हें अनित्य व हें नित्य असें ओळखणारी शक्ति तिचें नांव विवेक; अशा विवेकानें अनित्य जे देहादिक त्यांचा त्याग करून नित्य स्वरूपीं हा बुडी देऊन राहतो, तेथेंच स्थिरता पावतो व स्थूल देहानें लोकांस

कोणीं ॥ २५ ॥ मीपण मागें सांडिलें । स्वयें आपणास धुंडिलें । तुर्येसहि वोलांडिलें । या नांव साधक ॥ २६ ॥ पुढें उन्मनीचे सेवटीं । आपली आपणा अखंड भेटी । अखंड अनुभवीं ज्याची दृष्टी । या नांव साधक ॥ २७ ॥ द्वैताचा तटका तोडिला । भासाचा भास मोडिला । देहीं असोनि विदेह झाला । या नांव साधक ॥ २८ ॥ जयास अखंड स्वरूपस्थिती । नाहीं देहाची अहंकृती । सकळ संदेहनिवृत्ती । या नांव साधक ॥ २९ ॥ पंच महाभूतांचा विस्तार । जयासि वाटे स्वप्नाकार । निर्गुणीं जयाचा निर्धार । या नांव साधक ॥ ३० ॥ स्वप्नीं भये जें वाटलें । तें जागृतीस नाहीं आलें । सकळ मिथ्या निर्धारिलें । या नांव साधक ॥ ३१ ॥ मायेचें जें प्रत्यक्षपण । जनास वाटे हें प्रमाण । स्वानुभवें अप्रमाण । साधकें केलें ॥ ३२ ॥ निद्रा सांडूनि चेइरा जाला । तो स्वप्नभयापासून सुटला । माया सांडून तैसा गेला । साधक स्वरूपीं ॥ ३३ ॥ ऐसी अंतरस्थिती बाणली । बाह्य निस्पृहता अवलंबिली । संसारउपाधी त्यागिली । या नांव साधक ॥ ३४ ॥ कामापासून सुटला । क्रोधापासूनि पळाला । मद मत्सर सांडिला । येकीकडे ॥ ३५ ॥ कुळाभिमानासि सांडिलें । लोकलाजेस लाजविलें । परमार्थास माजविलें । विरक्तिबळें ॥ ३६ ॥ अविद्येपासून फडकला । प्रपंचापासून निष्टला । लोभाचे हातींचा गेला । अकस्मात ॥ ३७ ॥ थोरपणासि पाडिलें । वैभवासि लिथाडिलें । महत्वासि झिंजाडिलें । विरक्तिबळें ॥ ३८ ॥ भेदाचा मडघा मोडिला । अहंकार सोडूनि पाडिला । पाईं धरूनि आपटिला । संदेहशत्रु ॥ ३९ ॥ विकल्पाचा केला वधु । थापें मारिला भवसिंधु । सकळ भूतांचा विरोधु । तोडून टाकिला ॥ ४० ॥ भवभयासि भडकाविलें । काळाचें टांगें मोडिलें । मस्तक हाणोनि फोडिलें । जन्ममृत्याचें ॥ ४१ ॥ देहसमंधा-

दिसला तरी त्याचें अंतःस्वरूप कोणांसही आकलन होत नाहीं.' अहंकार मागें टाकून तुर्येच्याही पलीकडे जातो व उन्मनीच्या शेवटीं निजस्वरूपाची भेट घेऊन त्या अखंडानंदाचा भोग घेत राहतो. द्वैतभासाचा संबंध तोडून तो देहींच विदेहस्थितीचा अनुभव घेतो. सवसंशयरहित होऊन अखंड स्वरूपानुभवांत निमग्न होऊन जातो. पांचभौतिक त्याला स्वप्नवत् होऊन जातें व तो निगुर्णीं अनन्य होतो. स्वप्नींचें भय जागृतींत उरत नाहीं. ह्याप्रमाणें ह्या आत्मजागृतीनें संसारभय नाहींसें होतें. सृष्टि प्रत्यक्ष दिसत असल्यामुळें जनांस खरीशी वाटते. पण हा स्वानुभवानें तिचें मिथ्यात्व प्रचीतीस आणतो. अशी अंतरस्थिति बाणून गेली, बाह्याचरणांत पूर्ण निःस्पृहता शखली व संसार-उपाधींतून सुटला म्हणजे त्याला साधक असें म्हणतात (२२–३४). काम-क्रोधांपासून व इतर सर्व विकारांपासून साधक सुटलेला असतो. कुळाभिमान व लोकलाज ह्यांना सांडून विरक्तिबळानें तो परमार्थ वाढवितो. अविद्येपासून फटकला, प्रपंचापासून निष्टला असा हा साधक, भेद, अहंकार, विकल्प, संकल्प-विकल्प, गर्व, स्वार्थ, अनर्थ, द्वेष, नास्तिकपणा (अभाव), कुतर्क, कोप, इ० परमार्थाच्या शत्रूंचा तो पुरा निःपात करितो. प्रवृत्तीचा त्याग करून सुहृदांचा संग सोडून निवृत्तिपंथानें जाऊन तो

वरी लोटला । संकल्पावरी उठावला । कल्पनेचा घात केला । अकस्मात ॥ ४२ ॥ अपधाकासि ताडिलें । लिंगदेहासि विभांडिलें । पाषांडास पच्याडिलें । विवकबळें ॥ ४३ ॥ गर्वावरी गर्व केला । स्वार्थ अनर्थी घातला । अनर्थ तोही निर्दाळिला । नीतिन्यायें ॥ ४४ ॥ मोहासी मध्येंचि तोडिलें । दुःखासि दुधडचि केलें । शोकास खंडून सांडिलें । येकीकडे ॥ ४५ ॥ द्वेष केला देशधडी । अभावाची घेतली नरडी । धाकें उदर तडाडी । कुतर्काचे ॥ ४६ ॥ ज्ञानविवेकें माजला । तेणें निश्चयो बळावला । अवगुणाचा संव्हार केला । वैराग्यबळें ॥ ४७ ॥ अधर्मास स्वधर्में लुटिलें । कुकर्मासि सत्कर्में झुगटिलें । लांटून वाटा लाविलें । विचारें अविचारासी ॥ ४८ ॥ तिरस्कार तो चिरडिला । द्वेष खिरडूनि सांडिला । विषाद अविषादें घातला । पायांतळीं ॥ ४९ ॥ कोपावरी घालणें घातलें । कापट्य अंतरीं कुटिलें । सख्य आपुलें मानिलें । विश्वजनीं ॥ ५० ॥ प्रवृत्तीचा केला त्याग । सुहृदांचा सोडिला संग । निवृत्तिपथें ज्ञानयोग । साधिता जाला ॥ ५१ ॥ विषयेमैंदास सिंतरिलें । कुविद्येसि वेढा लाविलें । आपणास सोडविलें । आप्त तस्करापासुनी ॥ ५२ ॥ पराधीनतेवरी कोपला । ममतेवरी संतापला । दुराशेचा त्याग केला । येकायेकी ॥ ५३ ॥ स्वरूपीं घातलें मना । यातनेसि केली यातना । साक्षेप आणि प्रेत्ना । प्रतिष्ठिलें ॥ ५४ ॥ अभ्यासाचा संग धरिला । साक्षेपासरिसा निघाला ॥ प्रेत्न सांगाती भला । साधनपंथें ॥ ५५ ॥ सावध दक्ष तो साधक । पाहे नित्यानित्यविवेक । संग त्यागूनि येक । सत्संग धरी ॥ ५६ ॥ बळेंचि सारिला संसार । विवेकें टाकिला जोजार । शुद्धाचारें अनाचार । भ्रष्टविला ॥ ५७ ॥ विसरास विसरला । आळसाचा आळस केला । सावध नाहीं दुश्चित जाला । दुश्चित-पणासी ॥ ५८ ॥ आतां असो हें बोलणें । अवगुण सांडी निरूपणें । तो साधक ऐसा येणें प्रमाणें । बुझावा ॥ ५९ ॥ बळेंचि अवघा त्याग कीजे । म्हणौनि साधक बोलिजे । आतां सिद्ध तो जाणिजे । पुढिले समासी ॥ ६० ॥ येथें संशय उठिला । निस्पृह तोचि साधक जाला । त्याग न घडे

ज्ञानयोग साधतो. माया-ममता, दुराशा त्याच्याजवळ येत नाहींत. अभ्यास व वैराग्य ह्यांचा अंतरीं व सज्जनांचा बाहेरी संग धरितो व बाकी सर्वांचा त्याग करितो. विसराळा (स्वरूपविस्मृतीला) तो विसरतो म्ह० स्मरणस्वरूपच होतो, आळसाचा आळस करितो म्ह० साधनाविषयीं नित्य तत्पर असतो, दुश्चितपणाविषयीं तो सावध नसून तो दुश्चित असतो म्ह० सुचित्त असतो, तात्पर्य बळेंच अवघ्यांचा त्याग करून तो स्वरूपीं रमतो (३५–६०). निःस्पृह म्ह० त्यागी तोच साधक होतो. ह्यावर अशी शंका कोणी घेईल कीं त्यागावांचून जर साधक होत नाहीं, तर अवघ्यांचा त्याग त्या संसारिकाला

संसारिकाला । तरी तो साधक नव्हे कीं ॥ ६१ ॥ ऐसें श्रोता बोले उत्तर । याचें कैसें प्रत्योत्तर । पुढिलिये समायीं तत्पर । होऊन ऐका ॥ ६२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे साधकलक्षणनिरूपणनाम समास नवम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥ मागें बोलिला संसारिक । त्यागेंविण नव्हे कीं साधक । ऐका हो याचा विवेक । ऐसा असे ॥ १ ॥ सन्मार्ग तो जीवीं धरणें । अनमार्गाचा त्याग करणें । संसारिकांत्याग येणें-। प्रकारें ऐसा ॥ २ ॥ कुबुद्धित्यागेंविण कांहीं । सुबुद्धि लागणार नाहीं । संसारिकां त्याग पाहीं । ऐसा असे ॥ ३ ॥ प्रपंची वीट मानिला । मनें विषयत्याग केला । तरीच पुढें अवलंबिला । परमार्थमार्ग ॥ ४ ॥ त्याग घडे अभावाचा । त्याग घडे संशयाचा । त्याग घडे अज्ञानाचा । शनैः शनैः ॥ ५ ॥ ऐसा सूक्ष्म अंतस्त्याग । उभयांस घडे सांग । निस्पृहास बाह्यत्याग । विशेष आहे ॥ ६ ॥ संसारिकां ठाईं ठाईं । बाह्यत्याग घडे कांहीं । नित्यनेमश्रवण नाहीं । त्यागेंविण ॥ ७ ॥ फिटली आशंका स्वभावें । त्यागेंविण साधक नव्हे । पुढें कथेचा अन्वय । सावध ऐका ॥ ८ ॥ मागां जालें निरूपण । साधकाची वोळखण । आतां सांगिजेल खूण । सिद्धलक्षणाची ॥ ९ ॥ साधु वस्तु होऊन ठेला । संशय ब्रह्मांडाबाहेरि गेला । निश्चये चळेना ऐसा जाला ।

घडणें शक्य नाहीं तो संसारिक साधक नाहीं काय ?' ह्याचें उत्तर पुढल्या समासांत प्रथम देऊन मग सिद्धलक्षणांचा विचार सांगूं (६१–६२). [द० ५, स० ९]

"त्याग घडल्यावांचून साधक होत नाहीं व संसारिकाला त्याग घडत नाहीं, मग संसारिक साधक होतो कीं नाहीं ?" ह्या प्रश्नाला उत्तर देतांना समर्थांनीं ' त्याग ' शब्दाचा अर्थ सांगून निःस्पृहाप्रमाणें संसारिकही साधक होतो असें सांगितलें आहे. निःस्पृहाला अंतस्त्याग व बहिस्त्याग दोन्ही घडतात, संसारिकाला अंतस्त्याग घडून बहिस्त्याग कांहीं-कांहीं व हळू-हळू घडतो. सन्मार्ग धरण्यासाठीं असन्मार्गाचा त्याग, सद्बुद्धीच्या जोपासनेसाठीं कुबुद्धीचा त्याग, नित्यनेमश्रवण-मननासाठीं कांहीं बाह्यसुखांचा व संसारांतल्या वेळेचा त्याग असा कांहीं त्याग संसारिकालाही घडत असतो. आतां बहिस्त्यागापेक्षां अंतस्त्याग मुख्य आहे व तो जर संसारिकाला घडत असेल व निःस्पृहाप्रमाणें तोही प्रपंचाला विटून मनानें विषयत्याग करीत असेल तर तोही साधकच होय असें म्हटलें पाहिजे. अंतस्त्यागावांचून परमार्थ नाहीं व तो जर उभयतांना घडत असेल तर दोघेही साधकच होत. अंतस्त्यागाचें वर्म असें आहे. अभावाचा, संशयाचा, अज्ञानाचा त्याग घडला पाहिजे व तो दोघांनाही शनैः शनैः हळू-हळू घडत असतो. आत्मा भावरूप आहे व माया किंवा देहादि संबंध अभावरूप आहेत, आत्मा नित्य शाश्वत वस्तु आहे व माया अभावरूप आहे. त्या मायेचा त्याग घडतो, तिच्याविषयींचे संशय उच्छिन्न होतात, अज्ञान हें तिचेंच रूप असल्यामुळें त्याचें निराकरण होतें. ढगाचा त्याग होतो, सूर्याचा होत नाहीं. आत्मा सूर्यासारखा स्वयंभु व भावरूप आहे. तर मायेचा, अज्ञानाचा, संशयाचा त्याग हा मुख्य आहे. ह्याला अंतस्त्याग म्हणतात व हा निःस्पृह व संसारिक ह्या दोघांनाही घडला तर दोघेही साधक आहेत ह्यांत संदेह नाहीं. तात्पर्य, त्यागावांचून साधक नाहीं ह्या सिद्धांताला कोणताच बाध येत नाहीं (१–८). असो. मागें साधकाचीं लक्षणें सांगितलीं, आतां सिद्धलक्षणाची खूण सांगतों. बद्धपणाचे अवगुण मुमुक्षुपणीं नाहींत, मुमुक्षुलक्षणें मागें टाकून

त्या नांव सिद्ध ॥ १० ॥ बद्धपणाचे अवगुण । मुमुक्षुपणीं नसती जाण । मुमुक्षुपणाचें लक्षण । साधकपणीं नाहीं ॥ ११ ॥ साधकासि संदेहवृत्ती । पुढें होतसे निवृत्ती । याकारणें निःसंदेह श्रोतीं । साधु वोळखावा ॥ १२ ॥ संशयरहित ज्ञान । तेंचि साधूचें लक्षण । सिद्धाआंगीं संशय हीन । लागेल कैसा ॥ १३ ॥ कर्ममार्ग संशयें भरला । साधनीं संशय कालवला । सर्वांमध्यें संशय भरला । साधु तो निःसंदेह ॥ १४ ॥ संशयाचें ज्ञान खोटें । संशयाचें वैराग्य पोरटें । संशयाचें भजन वोखटें । निर्फळ होय ॥ १५ ॥ व्यर्थ संशयाचा देव । व्यर्थ संशयाचा भाव । व्यर्थ संशयाचा स्वभाव । सर्व कांहीं ॥ १६ ॥ व्यर्थ संशयाचें व्रत । व्यर्थ संशयाचें तीर्थ । व्यर्थ संशयाचा परमार्थ । निश्चयेंविण ॥ १७ ॥ व्यर्थ संशयाची भक्ती । व्यर्थ संशयाची प्रीती । व्यर्थ संशयाची संगती । संशयो वाढवी ॥ १८ ॥ व्यर्थ संशयाचें जिणें । व्यर्थ संशयाचें धरणें । व्यर्थ संशयाचें करणें । सर्व कांहीं ॥ १९ ॥ व्यर्थ संशयाची पोथी । व्यर्थ संशयाची व्युत्पत्ती । व्यर्थ संशयाची गती । निश्चयेंविण ॥ २० ॥ व्यर्थ संशयाचा दक्ष । व्यर्थ संशयाचा पक्ष । व्यर्थ संशयाचा मोक्ष । होणार नाहीं ॥ २१ ॥ व्यर्थ संशयाचा संत । व्यर्थ संशयाचा पंडित । व्यर्थ संशयाचा बहुश्रुत । निश्चयेंविण ॥ २२ ॥ व्यर्थ संशयाची श्रेष्ठता । व्यर्थ संशयाची व्युत्पन्नता । व्यर्थ संशयाचा ज्ञाता । निश्चयेंविण ॥ २३ ॥ निश्चयेंविण सर्व कांहीं । अणुमात्र तें प्रमाण नाहीं । व्यर्थचि पडिले प्रवाहीं । संदेहाचे ॥ २४ ॥ निश्चयेंविण जें बोलणें । तें अवघेंचि कंटाळवाणें । बाष्कळ बोलिजे वाचाळपणें । निरर्थक ॥ २५ ॥ असो निश्चयेंविण जे वल्गना । ते अवघीच विटंबना । संशयें कांहीं समाधाना । उरी नाहीं ॥ २६ ॥ म्हणोनि संदेहरहित ज्ञान । निश्चयाचें समाधान । तेंचि सिद्धांचें लक्षण । निश्चयेंसी ॥ २७ ॥ तंव श्रोता करी प्रश्न । निश्चय करावा कवण । मुख्य निश्चयाचें लक्षण । मज निरोपावें ॥ २८ ॥ ऐक निश्चय तो

साधक पुढें गेलेला असतो व साधकाची संदेहवृत्ति पुढें-पुढें निवृत्त होते. तो निःसंदेह झाला कीं त्यालाच सिद्ध म्हणतात. तात्पर्य, संदेहरहित ज्ञान, निश्चळ वस्तुरूपता हें सिद्धाचें मुख्य लक्षण होय. निःसंदेह तो सिद्ध. कर्ममार्ग संशयांनीं भरला आहे, साधनमार्गांतही पदोपदीं संशय येतात, पण सिद्ध निःसंदेह असतो (९–१४). संशय सर्वस्वीं खोटा. संशयाचें ज्ञान खोटें, संशयाचें वैराग्य पोरटें, संशयाचें भजन वोखटें, देव, धर्म, व्रत, तीर्थ, भक्ति, ज्ञान, कर्म, विद्याव्युत्पत्ति, प्रीति, मोक्ष, संत, पंडित ह्या सर्वांत किंवा ह्या सर्वांविषयीं संशय असेल तर तें सर्व व्यर्थ होय. निश्चयावांचून बोलणें व्यर्थ, संशयाचें भाषण बाष्कळ होय, त्यानें कोणालाच समाधान होत नाहीं, उलट वक्त्याची विटंबना होते. म्हणून निःसंदेहता व समाधान हीं सिद्धाचीं मुख्य लक्षणें होत (१५–२७). आतां 'सिद्धापाशीं निश्चयात्मक ज्ञान असतें म्हणून म्हणतां तर निश्चय तरी कशाचा व कसा करावा' असा प्रश्न उद्भवतो तर त्यास समर्थ उत्तर देतात तें ऐका. अनेक देवांच्या व

ऐसा । मुख्य देव आहे कैसा । नाना देवांचा वळसा । करूंचि नये ॥ २९ ॥ जेणें निर्मिलें सचराचर । त्याचा करावा विचार । शुद्धविवेकें परमेश्वर । वोळखावा ॥ ३० ॥ मुख्यदेव तो कवण । भक्तांचें कैसें लक्षण । असत्य सांडून वोळखण । सत्याची धरावी ॥ ३१ ॥ आपुल्या देवास वोळखावें । मग मी कोण हें पाहावें । संग त्यागून राहावें । वस्तुरूप ॥ ३२ ॥ तोडावा बंधनाचा संशयो । करावा मोक्षाचा निश्चयो । पाहावा भूतांचा अन्वयो । व्यतिरेकेंसी ॥ ३३ ॥ पूर्वपक्षेंसीं सिद्धांत । पाहावा प्रकृतीचा अंत । मग पावावा निवांत । निश्चय देवाचा ॥ ३४ ॥ देहाचेनियोगें संशयो । करी समाधानाचा क्षयो । चळों नेदावा निश्चयो । आत्मत्वाचा ॥ ३५ ॥ सिद्ध असतां आत्मज्ञान । संदेह वाढवी देहाभिमान । याकारणें समाधान । आत्मनिश्चयें राखावें ॥ ३६ ॥ आठवतां देहबुद्धि । उडे विवेकाची शुद्धी । याकारणें आत्मबुद्धी । सदृढ करावी ॥ ३७ ॥ आत्मबुद्धी निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची । 'अहमात्मा' हें कधींचि । विसरों नये ॥ ३८ ॥ निरोपिलें निश्चयाचें लक्षण । परी हें न कळे सत्संगेंविण । संतांसि गेलिया शरण । संशयो तुटती ॥ ३९ ॥ आतां असो हें बोलणें । ऐका सिद्धांचीं लक्षणें । मुख्य निःसंदेहपणें । सिद्ध बोलिजे ॥ ४० ॥ सिद्धस्वरूपीं नाहीं देहो । तेथें कैचा हो संदेहो । याकारणें सिद्ध पाहा हो । निःसंदेही ॥ ४१ ॥ देहसमंधाचेनि गुणें । लक्षणांसी काय उणें । देहातीताचीं लक्षणें । काय म्हणोनि सांगावीं ॥ ४२ ॥ जें लक्षवेना चक्षूंसीं । त्याचीं लक्षणें सांगावीं कैसीं । निर्मळ वस्तु सिद्ध त्यासी । लक्षणें कैसीं ॥ ४३ ॥ लक्षणें म्हणिजे केवळ गुण । वस्तु ठाईंची निर्गुण । तेंचि सिद्धांचें लक्षण । वस्तुरूप ॥ ४४ ॥ तथापि

साधनांच्या गोंधळांत न पडतां मुख्य देवाचा व मुख्य साधनाचाच निश्चय करावा. जेथून हें चराचर विश्व निर्माण झालें त्या उगमाशीं जाऊन मुख्य देव पाहावा. मुख्य परमात्मा ओळखावा, मग मी कोण हें पाहावें (द० ४, स० ९ पाहा) व 'मी' चा संग टाकून वस्तुरूप होऊन राहावें. 'मी बद्ध' हा संशय टाकून 'मी मुक्त' हा निश्चय करावा. अन्वय-व्यतिरेकानें विचार करून भूतें नाशिवंत कशीं आहेत तें पाहावें, अष्टधाप्रकृतीचा (पूर्वपक्षाचा) निरास करून त्रिगुणपंचभूतातीत देव ओळखून तोच मी असा निश्चय करावा. देहाभिमानामुळें नाना संशय उत्पन्न होतात म्हणून आपल्या आत्मत्वाचा निश्चय करावा. आत्मज्ञान स्वतः सिद्ध आहे. संशयाचे मेघ वोसरले कीं निश्चयाची बुद्धि झळाळते. 'अहमात्मा' हें कधींच विसरूं नये व संशय तुटण्यासाठीं सत्संग धरावा. तात्पर्य, निःसंदेह तोच सिद्ध. सिद्धस्वरूपीं देह नाहीं तेथें संदेह कसा संचरेल? म्हणून सिद्ध निःसंदेहच असतो. त्याचीं लक्षणें काय सांगावींत ? सिद्ध देहातीत व लक्षणें देहाचीं ! देहाच्या बाजूनें पाहतां लक्षणें हवीं तितकीं देतां येतील व तीं पुढें ज्ञानदशकांत (द० ८, स० ९) सांगितलीं जातील, तथापि लक्षणें म्हणजे

ज्ञानदशकीं बोलिलें । म्हणोनि वग्तृत्व आटोपिलें । न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ॥ ४५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सिद्धलक्षणनाम समास दशम ॥ १० ॥

गुण व वस्तुरूप झालेला सिद्ध निर्गुण. त्याला लक्षणें कोणतीं व सांगावयाचीं कशीं ? अलक्ष्य, अनिर्वचनीय सिद्धवस्तु हेंच सिद्धाचें स्वरूप होय (२८–४५). [द० ५, स० १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ दशक षष्ठ देवशोधन नाम ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ चित्त सुचित करावें । बोलिलें तें जीवीं धरावें । सावध होऊन बैसावें । निमिष येक ॥ १ ॥ कोणी येके ग्रामीं अथवा देसीं । राहाणें आहे आपणासी । न भेटतां तेथिल्या प्रभूसी । सौख्य कैंचें ॥ २ ॥ म्हणोनि ज्यास जेथें राहाणें । तेणें त्या प्रभूची भेटी घेणें । म्हणिजे होय श्लाघ्यवाणें । सर्व कांहीं ॥ ३ ॥ प्रभूची भेटी न घेतां । तेथें कैंची मान्यता । आपुलें महत्व जातां । वेळ नाहीं ॥ ४ ॥ म्हणोनि रायापासूनि रंक । कोणी येक तरी नायेक । त्यास भेटणें हा विवेक । विवेकी जाणती ॥ ५ ॥ त्यास न भेटतां त्याचें नगरीं । राहातां धरितील बेगारी । तेथें न करितां चोरी । अंगीं लागे ॥ ६ ॥ या कारणें जो शहाण त्यानें प्रभूसी भेटावें जाणा । ऐसें न करितां दैन्यवाणा । संसार त्याचा ॥ ७ ॥ ग्रामीं थोर ग्रामाधिपती । त्याहूनि थोर देशाधिपती । देशाधिपतीहूनि नृपती । थोर जाणावा ॥ ८ ॥ राष्ट्राचा प्रभु तो राजा । बहुराष्ट्र तो महाराजा । महाराजाचाही राजा । तो चक्रवर्ती ॥ ९ ॥ येक नरपति येक गजपती । येक हयपति येक भूपती । सकळांमध्यें चक्रवर्ती । थोर राजा ॥ १० ॥ असो ऐसियां समस्तां । येक ब्रह्मा निर्माणकर्ता । त्या ब्रह्मासहि निर्मिता । कोण आहे ॥ ११ ॥ ब्रह्मा विष्णु आणि हर । त्यांसी निर्मिता तोचि थोर । तो वोळखावा परमेश्वर । नाना यत्नें करूनी ॥ १२ ॥ तो देव ठाईं पडेना । तरी यमयातना चुकेना ।

ह्यापुढें अध्यात्मनिरूपण व्हावयाचें असल्यामुळें चित्त सुचित म्ह० सावध करावें व सांगितलेलें जीवीं धरावें. ह्याप्रमाणें श्रोत्यांस सावध करून देवशोधनाच्या ह्या दशकास प्रारंभ करितात (१). कोणत्याही गांवांत अगर देशांत राहावयाचें असेल तर तेथल्या प्रभूची भेट घ्यावी म्हणजे सव कांहीं उत्तम होतें, नाहीं तर महत्त्व जाऊन अपमानाचा प्रसंग यावयाचा. त्याची भेट न घेतली तर खालचे कामगार वेठीला धरतील व चोरी न करितांही अंगीं लागेल. प्रभूची भेट न घेतली तर संसार दैन्यवाणा होतो. गांवांत पाटील मोठा, त्यापेक्षां सुभेदार मोठा, त्यापेक्षां राजा मोठा, त्यापेक्षां बहुराष्ट्रांचा अधिपति महाराजा मोठा, त्यापेक्षां चक्रवर्ती मोठा. हय, गज, नर व भूपति ह्या सर्वांवर अंमल सम्राटाचा चालतो. ह्या सर्वांचा निर्माणकर्ता ब्रह्मदेव ह्या सर्वांत मोठा. हरि-हर-ब्रह्मादिकांस निर्माण करणार परमेश्वर सर्वांत मोठा. त्या परमेश्वराची हरप्रयत्नानें ओळख करून घेतली पाहिजे. तो ब्रह्मांडनायक ओळखला नाहीं तर यमयातना चुकत नाहींत.

ब्रह्मांडनायक चोजवेना । हें बरें नव्हे ॥ १३ ॥ जेणें संसारीं घातलें । अवघें ब्रह्मांड निर्माण केलें । त्यासी नाहीं वोळखिलें । तोचि पतित ॥ १४ ॥ म्हणोनि देव वोळखावा । जन्म सार्थकचि करावा । न कळे तरी सत्संग धरावा । म्हणिजे कळे ॥ १५ ॥ जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे संत । जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ॥ १६ ॥ चळेना ढळेना देव । ऐसा ज्यांचा अंतर्भाव । तोचि जाणिजे महानुभाव । संत साधु ॥ १७ ॥ जो जनांमध्यें वागे । परी जनांवेगळी गोष्टी सांगे । ज्याचें अंतरीं ज्ञान जागे । तोचि साधु ॥ १८ ॥ जाणिजे परमात्मा निर्गुण । त्यासीच म्हणावें ज्ञान । त्यावेगळें तें अज्ञान । सर्व कांहीं ॥ १९ ॥ पोट भरावयाकारणें । नाना विद्या अभ्यास करणें । त्यासी ज्ञान म्हणती परी तेणें । सार्थक नव्हे ॥ २० ॥ देव वोळखावा येक । तेंचि ज्ञान तें सार्थक । येर अवघेंचि निरर्थक । पोटविद्या ॥ २१ ॥ जन्मभरी पोट भरिलें । देहाचें संरक्षण केलें । पुढें अवघेंचि व्यर्थ गेलें । अंतकाळीं ॥ २२ ॥ येवं पोट भरावयाची विद्या । तयेसी म्हणों नये सद्विद्या । सर्वव्यापक वस्तु सद्या । पाविजे तें ज्ञान ॥ २३ ॥ ऐसें जयापासीं ज्ञान । तोचि जाणावा सज्जन । तयापासीं समाधान । पुसिलें पाहिजे ॥ २४ ॥ अज्ञानास भेटतां अज्ञान । तेथें कैचें सांपडेल ज्ञान । करंट्यास करंट्याचें दर्शन । होतां भाग्य कैचें ? ॥ २५ ॥ रोग्यापासीं रोगी गेला । तेथें कैंचें आरोग्य त्याला । निर्बळापासीं निर्बळाला । पाठी कैंची ॥ २६ ॥ पिशाच्यापासीं पिशाच्य गेलें । तेथें कोण साथक जालें । उन्मत्तास उन्मत्त भेटलें । त्यास उमजवी कवणु ॥ २७ ॥ भिकाऱ्यापासीं मागतां भिक्षा ।

जेणें संसारीं घातलें त्या विश्वपतीस न जाणणारा पतितच होय. म्हणून देव ओळखून जन्मसाफल्य करावें, ओळखला नाहीं तर सत्संग करावा म्हणजे देवाची ओळख होते (२–१५). ‘ आतां संत कसा ओळखावा ? ’ देव जाणतो तोच संत. जो शाश्वत व अशाश्वत ह्यांचा निवाडा करून शाश्वत परब्रह्म म्ह० देव ओळखतो तोच संत. जो जनांत वागतो पण जनांस ठाऊक नाहीं अशी पलीकडची – देवाची गोष्ट सांगतो, ज्याचे अंतरीं आत्मज्ञान जागृत आहे, तात्पर्य निर्गुण परमात्म्याची ज्याला ओळख आहे तोच संत. निर्गुण परमात्मा ओळखणें ह्याचें नांव ज्ञान, ह्यावेगळें तें सर्व अज्ञान. पोटभरी विद्येला ज्ञान म्हणतात पण तें ज्ञान नाहीं, जन सफळ करणारें तें ज्ञान नाहीं. एक मुख्य देव आहे त्याची ओळखण तें ज्ञान, बाकी सारी पोटविद्या. देहरक्षणाची पोटविद्या अंतकाळच्या उपयोगाची नाहीं. पोट भरावयाची विद्या ती सद्विद्या नव्हे. तें ज्ञान नव्हे. सर्वव्यापक परमात्मवस्तूची तात्काळ (याचि जन्मीं येणेंचि काळें) प्राप्ति करून देतें तें ज्ञान. हें वस्तुज्ञान ज्यापाशीं आहे तो संत व त्याचा संग करावा म्हणजे देव भेटतो, समाधान मिळतें (१६–२४). नरकांच्या संगतीचा उपयोग नाहीं. अज्ञान्यापाशीं अज्ञानी गेला तर ज्ञान कोठचें मिळणार ? करंट्यास करंट्या (दैवहीन दरिद्री) भेटल्यानें भाग्य उदयास कसचें येतें ? रोग्यापाशीं रोगी गेला तर आरोग्यलाभ नाहीं. निर्बळाला निर्बळ काय पाठीशीं घालणार ? पिशाचापाशीं पिशाच गेलें किंवा मद्यादिकांचा अंमल करणारा एक अंमली दुसऱ्या अंमली मनुष्यापाशीं गेला तर त्यांना

दीक्षाहीनापासीं दीक्षा । उजेड पाहतां कृष्णपक्षा । पाविजे कैंचा ॥ २८ ॥ अबद्धापासीं गेला अबद्ध । तो कैंसेनि होईल सुबद्ध । बद्धास भेटतां बद्ध । सिद्ध नव्हे ॥ २९ ॥ देहापासीं गेला देही । तो कैसेनि होईल विदेही । म्हणोनि ज्ञात्यावांचून नाहीं । ज्ञान प्राप्त ॥ ३० ॥ याकारणें ज्ञाता पाहावा । त्याचा अनुग्रह घ्यावा । सारासार विचारें जीवा । मोक्ष प्राप्त ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देवशोधननाम समास प्रथम ॥ १ ॥

श्रीराम ॥ ऐका उपदेशाचीं लक्षणें । सायुज्यप्राप्ती होय जेणें । नाना मतांचें पेखणें । कामा नये सर्वथा ॥ १ ॥ ब्रह्मज्ञानेंविण उपदेश । तो म्हणों नये विशेष । धान्येंविण जैसें भूंस । खातां नये ॥ २ ॥ नाना काबाड बडविलें । नातरी तक्रचि घुसळिलें । अथवा धुवणचि सेविलें । सावकास ॥ ३ ॥ नाना साली भक्षिल्या । अथवा चोइट्या चोखिल्या । खोबरें सांडून खादल्या । नरोट्या जैश्या ॥ ४ ॥ तैंसें ब्रह्मज्ञानेंविण । नाना उपदेशाचा सिण । सार सांडून असार कोण । शाहाणा सेवी ॥ ५ ॥ आतां ब्रह्म जें कां निर्गुण । तेंचि केलें निरूपण । सुचित करावें अंतःकरण । श्रोतेजनीं ॥ ६ ॥ सकळ सृष्टीची रचना । ते हे पंचभूतिक जाणा । परंतु हे तगेना । सर्वकाळ ॥ ७ ॥ आदि अंतीं ब्रह्म निर्गुण । तेचि शाश्वताची खूण । येर पंचभूतिक सगुण । नासिवंत ॥ ८ ॥ येऱ्हवीं हें पाहातां भूतें । देव कैसें म्हणावें त्यातें । भूत म्हणतां मनुष्यातें । विषाद वाटे ॥ ९ ॥ मां तो जगजनक परमात्मा । त्यास आणि भूतउपमा । ज्याची कळेना महिमा । ब्रह्मादिकांसीं ॥ १० ॥ भूतांऐसा जगदीश । म्हणतां उत्पन्न होतो दोष । याकारणें महापुरुष । सर्वही जाणती

शुद्धीवर आणणें कसें होईल ? भिकाऱ्यापाशीं भिकाऱ्यानें भिक्षा मागणें, दीक्षाहीनाजवळ दीक्षा घेण्यास जाणें, अव्यवस्थित (अबद्ध) मनुष्याकडून अव्यवस्थित मनुष्याच्या कामाची शिस्त लागणें, हें जसें निरुपयोगी होय ('अंधेनैव नीयमाना यथांधाः'–कठोपनिषत्), तसें बद्धापाशीं बद्ध गेला तर तो मुक्त होणार नाहीं, देहबुद्धीच्या मनुष्यापाशीं दुसरा देही जाऊन तो विदेही होणार नाहीं (२५–३०). ह्यासाठीं ज्ञाता पाहावा व त्याचा अनुग्रह घ्यावा म्ह० सत्संग करावा म्हणजे सारासार विचार होऊन देव जोडतो व जीव मुक्त होतो (३१). [द० ६, स० १]

आतां सायुज्यता देणारा कोणता उपदेश सत्संगांत होतो तो पाहूं. नानामतें पाहणें (प्रेक्षणें, पेखणें) उपयोगाचें नाहीं. कणांवाचून भूंस तसा ब्रह्मज्ञानावांचून इतर उपदेश व्यर्थ होय. काबाड किंवा पेंढा बडविणें, ताक घुसळणें, धुवण पिणें, साली खाणें, चोइट्या चोखीत राहणें, खोबरें टाकून नरोट्या जमा करणें जसें व्यर्थ होय, त्याप्रमाणें ब्रह्मज्ञान सोडून इतर विषयज्ञानांच्या मागें लागणें व्यर्थ होय, कोणी शहाणा मनुष्य तसा लागणार नाहीं (१–५). आतां निर्गुण ब्रह्माचा विचार सांगतों. सृष्टि पंचभूतात्मक व अशाश्वत आहे, व ब्रह्म शाश्वत व गुणातीत आहे. मनुष्याला 'तूं' भूत आहेस म्हटलें तर राग येतो, मग परमात्म्याला भुतांची उपमा कशी यावी ? पृथ्वी आप, तेज, वायु व आकाश हीं पांचही

॥ ११ ॥ पृथ्वी आप तेज वायो आकाश । यां सबाह्यांतरीं जगदीश । पंचभूतांसी आहे नाश । आत्मा अविनाशरूपी ॥ १२ ॥ जें जें रूप आणि नाम । तो तो अवघाचि भ्रम । नामरूपातीत वर्म । अनुभवें जाणावें ॥ १३ ॥ पंचभूतें आणि त्रिगुण । ऐसी अष्टधा प्रकृति जाण । अष्टधा प्रकृतीस नामाभिधान । दृश्य ऐसें ॥ १४ ॥ तें हें दृश्य नासिवंत । ऐसें वेदश्रुति बोलत । निर्गुण ब्रह्म शाश्वत । जाणती ज्ञानी ॥ १५ ॥ जें शस्त्रें तोडितां तुटेना । जें पावकें जाळितां जळेना । कालवितां कालवेना । आपेंकरूनी ॥ १६ ॥ जें वायोचेनि उडेना । जें पडेना ना झडेना । जें घडेना ना दडेना । परब्रह्म तें ॥ १७ ॥ ज्यासी वर्णचि नसे । जें सर्वांहूनि अनारिसें । परंतु असतचि असे । सर्वकाळ ॥ १८ ॥ दिसेना तरी काय जालें । परंतु तें सर्वत्र संचलें । सूक्ष्मचि कोंदाटलें । जेथें तेथें ॥ १९ ॥ दृष्टीस लागली सवे । जें दिसेल तेंचि पाहावें । परंतु गुज तें जाणावें । गोप्य आहे ॥ २० ॥ प्रगट तें जाणावें असार । आणी गुप्त तें जाणावें सार । गुरुमुखें हा विचार । उमजों लागे ॥ २१ ॥ जें उमजेना तें उमजावें । जें दिसेना तें पाहावें । जें कळेना तें जाणावें । विवेकबळें ॥ २२ ॥ गुप्त तेंचि प्रगटवावें । असाध्य तेंचि साधावें । कानडेंचि अभ्यासावें । सावकास ॥ २३ ॥ वेद विरंची आणि शेष । जेथें सिणले निशेष । तेचि साधावें विशेष । परब्रह्म तें ॥ २४ ॥ तरी तें कोणेपरी साधावें । तेंचि बोलिलें स्वभावें । अध्यात्मश्रवणें पावावें । परब्रह्म तें ॥ २५ ॥ पृथ्वी नव्हे आप नव्हे । तेज नव्हे वायु नव्हे । वर्णव्यक्त ऐसें नव्हे । अव्यक्त तें ॥ २६ ॥ तयास म्हणावें देव । वरकड लोकांचा स्वभाव । जितुके गांव तितुके देव । जनाकारणें ॥ २७ ॥ ऐसा देवाचा निश्चयो जाला । देव निर्गुण प्रत्यया आला । आतां आपणचि

भूतें नाशवंत आहेत व परब्रह्म त्याहून वेगळें आहे. भूतें नाम-रूपात्मक आहेत व ब्रह्म सकलनामरूपातीत आहे. पंचभूतें व त्रिगुण मिळून अष्टधा प्रकृति व तिलाच दृश्य म्हणतात. ब्रह्म दृश्याहून निराळें आहे. ब्रह्म निर्गुण व शाश्वत आहे असें श्रुति सांगते व असा ज्ञात्यांचा अनुभवही आहे. तें शस्त्रानें तुटत नाहीं, अग्नीनें जळत नाहीं, पाण्यानें भिजत नाहीं, वायूनें उडविलें जात नाहीं. तें पडत नाहीं, झडत (झिजत) नाहीं, घडत नाहीं, दडत नाहीं. त्याला वर्ण (रंग) नाहीं व व्यक्ति (आकार) नाहीं. कल्पना त्याला स्पर्शत नाहीं. मात्र तें सर्वोदित आहे, सूक्ष्म असून सर्वत्र संचलें आहे, दृष्टीला पाहण्याची संवय झाली आहे, पण ब्रह्म दृश्य नसल्यामुळें गुप्तसें वाटतें. तें गुप्त विवेकानेंच जाणावें. प्रगट आहे तें असार आहे व गुप्त आहे तें सार आहे हा विचार गुरुमुखानें ऐकावा. जें उमजत नाहीं तें उमजावें; दिसत नाहीं तें पाहावें, कळत नाहीं तें जाणावें. पण विवेकानें गुप्त आहे ते प्रगट करावें, असाध्य वाटतें तें साधावें, कानडें (जाणण्यास कठीण) वाटतें तें अभ्यासानें प्राप्त करून घ्यावें. वेद, ब्रह्मदेव व शेष ज्याचें वर्णन करितांना शिणले तें परब्रह्म साध्य करून घ्यावें. पृथिव्यादि तत्त्वें व्यक्त आहेत व तें अव्यक्त आहे. तें गुरुमुखानें अध्यात्मश्रवणानें साध्य करावें. सामान्य लोकांच्या नादीं लागाल तर जितके गांव तितके देव आहेत. ते सोडून हा निर्गुण, शाश्वत, अव्यक्त देव साधावा (६–२७). देव निर्गुण आहे हा निश्चय

आपला । शोध घ्यावा ॥२८॥ माझें शरीर ऐसें म्हणतो । तरी जाण देहावेगळाची तो । मन माझें ऐसें जाणतो । तरी तो मनहि नव्हे ॥ २९ ॥ पाहातां देहाचा विचार । अवघा तत्वांचा विस्तार । तत्वें तत्व झाडितां सार । आत्माच उरे ॥ ३० ॥ आपणासी ठावचि नाहीं । येथें पाहाणें नलगे कांहीं । तत्वें ठाईंचा ठाईं । विभागून गेलीं ॥ ३१ ॥ बांधली आहे तों गांठोडी । जो कोणी विचारें सोडी । विचार पाहातां ही गांठोडी । आढळेना ॥ ३२ ॥ तत्वांचे गांठाडें शरीर । याचा पाहातां विचार । येक आत्मा निरंतर । आपण नाहीं ॥ ३३ ॥ आपणासी ठावचि नाहीं । जन्ममृत्य कैंचें काई । पाहातां निर्गुणाच्या ठाईं । पापपुण्य नसे ॥ ३४ ॥ पापपुण्य यमयातना । हे निर्गुणीं तों घडेचिना । आपण तोचि तरी जन्ममरणा । ठाव कैंचा? ॥ ३५ ॥ देहेबुद्धीनें बांधला । तो विवेकें मोकळा केला । देहातीत होतां पावला । मोक्षपद ॥ ३६ ॥ जालें जन्माचें सार्थक । निर्गुण आत्मा आपण येक । परंतु हा विवेक । पाहिलाच पाहावा ॥ ३७ ॥ जागें होतां स्वप्न सरे । विवेक पाहातां दृश्य वोसरे । स्वरूपानुसंघानें तरे । प्राणिमात्र ॥ ३८ ॥ आपणास निवेदावें । आपण विवेकें नुरावें । आत्मनिवेदन जाणावें । याचें नांव ॥ ३९ ॥ आधीं अध्यात्मश्रवण । मग सद्गुरुपादसेवन । पुढें आत्मनिवेदन सद्गुरुप्रसादें ॥ ४० ॥ आत्मनिवेदना उपरी । निखळ वस्तु निरंतरी । 'अहमात्मा' हा अंतरीं । बोध जाला ॥४१॥ त्या ब्रह्मबोधें ब्रह्मचि जाला । संसारखेद तो उडाला । देहो प्रारब्धीं टाकिला । सावकास ॥ ४२ ॥ यासी म्हणिजे आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान । परब्रह्मीं अभिन्न । भक्तचि जाला ॥ ४३ ॥ आतां होणार तें होयेना कां । आणि जाणार तें जायेना कां । तुटली मनांतील आशंका । जन्ममृत्याची ॥ ४४ ॥ संसारीं पडावें चुकलें । देवां भक्तां ऐक्य जालें । मुख्य देवास

झाला, आतां आपण आपला शोध घ्यावा. माझें शरीर, माझें मन असें आपण म्हणतों ह्यांतच शरीर व मन ह्यांहून मी वेगळा आहे असें स्पष्ट होतें. देहाचा विचार केला तर देह हा तत्त्वांचें गाठोडें आहे व पिंडांतलीं तत्त्वें ब्रह्मांडाच्या तत्त्वांशीं मिळविलीं तर सकल तत्त्वांहून भिन्न असा सारभूत आत्माच उरतो. शरीर तत्त्वांचें गांठोडें आहे, तीं गांठोडीं जो कोणी विवेकानें सोडून पाहील त्याला तत्त्वांत तत्त्वें गेलीं आतां 'आपण' अगर 'मी' कोठेंच आढळत नाहीं, आत्मा एक, निरंतर, आहे; आपण नाहीं. 'आपण' नाहीं तेव्हां जन्म-मृत्यु, पाप-पुण्य, यमयातना हें कोठें राहिलें? देहबुद्धीनें बांधलेला विवेकानें मोकळा केला कीं मी आत्म्याहून भिन्न नाहीं हा बोध होतो. मोक्ष हाच. 'निर्गुण आत्मा आपण एक' हा विवेक नेहमीं जागृत ठेवावा. जागे होतांच स्वप्न जातें, विवेक पाहतां दृश्य वोसरतें व स्वस्वरूपानुसंधानानें (मी आत्मा आहें त्याहून भिन्न नाहीं ह्याच्या अखंड चिंतनानें) प्राणी उद्धरतो. ह्यालाच आत्मनिवेदन म्हणतात (२८–३९). आधीं अध्यात्मश्रवण, मग सद्गुरुपादसेवन, मग सद्गुरुप्रसादानें आत्मनिवेदन व मग त्या अखंड वस्तूचें अनुसंधान ह्याप्रमाणें ब्रह्मबोध होतो व हा ब्रह्मरूपच होऊन राहतो. समाधान देणारें ब्रह्मज्ञान तें हें होय. त्यानें हा परब्रह्मीं अभिन्न

वोळखिलें । सत्संगेंकरूनी ॥ ५५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ब्रह्मपावननाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ निर्गुण आत्मा तो निर्मळ । जैसें आकाश अंतराळ । घनदाट निर्मळ निश्चळ । सदोदित ॥ १ ॥ जें खंडलेंचि नाहीं अखंड । जें उदंडाहूनि उदंड । जें गगनाहूनि वाड । आणि सूक्ष्म ॥ २ ॥ जें दिसेना ना भासेना । जें उपजेना ना नासेना । जें येईना ना जाईना । परब्रह्म तें ॥ ३ ॥ जें चळेना ना ढळेना । जें तुटेना ना फुटेना । जें रचेना ना खचेना । परब्रह्म तें ॥ ४ ॥ जें सन्मुखचि सर्वकाळ । जें निःकळंक आणि निखळ । सर्वांतर आकाशपाताळ । व्यापूनि असे ॥ ५ ॥ अविनाश तें ब्रह्म निर्गुण । नासे ते माया सगुण । सगुण आणि निर्गुण । कालवलें ॥ ६ ॥ या कर्दमाचा विचार । करूं जाणती योगेश्वर । जैसें क्षीर आणि नीर । राजहंस निवडिती ॥ ७ ॥ जड सबळ पंचभूतिक । त्यामध्यें आत्मा व्यापक । तो नित्यानित्यविवेक । पाहतां कळे ॥ ८ ॥ उंसामध्यें घेईजे रस । येर तें सांडिजे बाकस । तैसा जगामध्यें जगदीश । विवेकें वोळखावा ॥ ९ ॥ रस नासिवंत पातळ । आत्मा शाश्वत निश्चळ । रस अपूर्ण आत्मा केवळ । परिपूर्ण जाणावा ॥ १० ॥ आत्म्यासारिखें येक असावें । मां तें दृष्टांतासि द्यावें । दृष्टांतमिसें समजावें । कैसें तरी ॥ ११ ॥ ऐसी आत्मस्थिति संचली । तेथें माया कैसी जाली । जैसि आकाशीं वाहिली । झुळुक वायूची ॥ १२ ॥ वायूपासूनि तेज जालें । तेजापासूनि आप निपजलें । आपापासूनि आकारलें । भूमंडळ ॥ १३ ॥ भूमंडळापासूनि उत्पत्ती । जीव

असा भक्त होतो. सत्संगानें देवभक्तांचें ऐक्य झालें, संसारार्णवांत बुडणें टळलें, जन्म-मृत्यूची कल्पना निमाली, आतां होणार तें खुशाल होवो व जाणार तें खुशाल जावो. ह्याप्रमाणें ह्या भक्ताचा देह प्रारब्धाधीन होतो व हा अभेदभावाचें स्वात्मसुख भोगतो (४०–४५). [द० ६, स० २]

निर्गुण आत्मा हा आकाशासारखा निर्मळ, निश्चळ व घनदाट (सर्वत्र संचलेला) आहे व आकाशाहूनही वाड (मोठा, बृहत् म्हणून ब्रह्म) व सूक्ष्म आहे, हें ब्रह्म (डोळ्यांस) दिसत नाहीं व (मनास) भासत नाहीं ; त्याला उपजणें मरणें नाहीं, ये जा नाहीं, चळणें ढळणें, किंवा तुटणें फुटणें नाहीं, तें रचत खचत नाहीं. तें सर्वकाळ सन्मुख, निष्कलंक व निखळ म्ह० पूर्ण असून सर्वांस व्यापून आहे. ब्रह्म अविनाश व निर्गुण आहे, आणि माया नाशवंत व सगुण आहे. दोघांचा कर्दम झाला आहे म्ह० एकमेकांत कालवलीं आहेत. तथापि दूध आणि पाणी राजहंस वेगळें करितात त्याप्रमाणें जड, सबळ म्ह० मिश्र व पंचभौतिक ह्या सर्वांत व्यापून असलेला आत्मा त्याहून वेगळा आहे हें नित्यानित्यविवेकानें ज्ञानी जाणतात. उंसांतून रस घेऊन चोयट्या (बांकस) टाकाव्या, तसा जगांतून जगदीश घेऊन पंचभौतिक व त्रिगुण टाकून द्यावे. आत्म्यासारखी दुसरी वस्तु नाहीं. त्यामुळें असेच अपूर्ण दृष्टांत द्यावे लागतात, नाहींतर रस कोठें व आत्मा कोठें ! कांहीं अधिक कळावें म्हणून दृष्टांत घेतला जातो (१–११). आत्मस्थिति संचली असतांना तेथें माया कशी झाली ? असा प्रश्न विचारतात त्यास उत्तर :– आकाशांत वायूची पहिली झुळुक जशी वाहिली तशी ! पुढें वायूपासून तेज, तेजापासून आप, आपापासून पृथ्वी, पृथ्वीपासून असंख्य जीव, ह्या क्रमानें निर्माण झाले. पण

जाले नेणों किती । परंतु ब्रह्म आदिअंतीं । व्यापूनि असे ॥ १४ ॥ जें जें कांहीं निर्माण जालें । तें तें अवघेंचि नासलें । परी मुळीं ब्रह्म तें संचलें । जैसें तैसें ॥ १५ ॥ घटापूर्वी आकाश असे । घटामध्यें आकाश भासे । घट फुटतां न नासे । आकाश जैसें ॥ १६ ॥ तैसें परब्रह्म केवळ । अचळ आणी अढळ । मध्यें होत जात सकळ । सचराचर ॥ १७ ॥ जें जें कांहीं निर्माण जालें । तें तें आधींच ब्रह्में व्यापिलें । सर्व नाशतां उरलें । अविनाश ब्रह्म ॥ १८ ॥ ऐसें ब्रह्म जें अविनाश । तेंचि सेविती ज्ञाते पुरुष । तत्वनिरसनें आपणास । आपण लाभे ॥ १९ ॥ तत्त्वें तत्त्व मेळविलें । त्यासी देह नाम ठेविलें । तें जाणते पुरुषीं शोधिलें । तत्त्वें तत्त्व ॥ २० ॥ तत्त्वझाडा निशेष होतां । तेथें निमाली देहअहंता । निर्गुण ब्रह्मीं ऐक्यता । विवेकें जाली ॥ २१ ॥ विवेकें देहाकडे पाहिलें । तों तत्त्वें तत्त्व वोसरलें । आपण कांहीं नाहीं आलें । प्रत्ययासी ॥ २२ ॥ आपला आपण शोध घेतां । आपली तों माईक वार्ता । तत्वांतीं उरलें तत्वता । निर्गुण ब्रह्म ॥ २३ ॥ आपणाविणें निर्गुण ब्रह्म । हेंचि निवेदनाचें वर्म । तत्वासरिसा गेला भ्रम । मीतूंपणाचा ॥ २४ ॥ मीपण पाहातां आडळेना । निर्गुण ब्रह्म तें चळेना । आपण तेंचि परी कळेना । सद्गुरुविण ॥ २५ ॥ सारासार अवघें शोधिलें । तों असार तें निघोन गेलें । पुढें सार तें उरलें । निर्गुण ब्रह्म ॥ २६ ॥ आधीं ब्रह्म निरोपिलें । तेंचि सकळांमध्यें व्यापलें । सकळ आवघेंचि नासलें । उरलें तें केवळ ब्रह्म ॥ २७ ॥ होतां विवेकें संव्हार । तेथें निवडे सारासार । आपला आपण विचार । ठाईं पडे ॥ २८ ॥ आपण कल्पिलें मीपण । मीपण शोधितां नुरे जाण । मीपण गेलियां निर्गुण । आत्माचि स्वयें ॥ २९ ॥ जालियां तत्वाचें निरसन । निर्गुण आत्मा तोचि आपण । कां दाखवावें मीपण । तत्वनिरसनाउपरी ॥ ३० ॥

ह्या सर्वांस आदि-अंतीं ब्रह्म व्यापून आहे हें विसरूं नये. जें-जें कांहीं निर्माण होतें तें-तें तेथेंच नाश पावतें परी ब्रह्म संचलेलें आहेच. उदाहरण, आकाश घटापूर्वी आहे ; घट झाल्यावर त्यांत आहे व फुटला तरी आकाश आहेच ; तसें चराचर जग झालें आणि गेलें तरी ब्रह्म अचळ आहे तसेंच आहे. प्रत्येक निर्मित पदार्थाच्या आधीं ब्रह्म त्याला व्यापून असतें ; त्यामुळें त्या पदार्थाचा किंबहुना सर्व पदार्थांचा नाश झाला तरी अविनाश ब्रह्म आहे तसेंच आहे (१२–१८). ज्ञाते पुरुष त्याचाच स्वीकार करितात. देह तत्त्वांचें गांठोडें व तत्त्वें तत्त्वांत मिळवून तत्त्वांचा झाडा करून ह्याप्रमाणें देहातीत होऊन ज्ञाते ब्रह्माशीं एकरूप होतात. आपला आपणासी लाभ म्ह० आत्मलाभ तो हाच. विवेकानें देहाकडे पाहतां व आपला शोध घेतां तत्त्वझाडा होतो, आपली तों मायिक वार्ता – आपण कांहींच नाहीं – निर्गुण ब्रह्म उरतें व त्याचा ते प्रत्यय घेतात. 'आपणावीण निर्गुण ब्रह्म' म्ह० आपलेपणा सोडून अभिन्न होणें, एकरस होणें हेंच आत्मनिवेदनाचें वर्म आहे. तत्त्वें उडालीं कीं त्यासवेंच मी-तूंपणाचा भ्रम उडून जातो. 'मी' कोठेंच आढळत नाहीं व ब्रह्म अचळ आहे व आपण तेंच पण सद्गुरुकृपेवांचून हा ब्रह्मलाभ होत नाहीं. असार निरसनाअंतीं सार उरलें तें निर्गुण ब्रह्म व तेंच आपण (१९–३०). तत्त्वांबरोबर 'मी'पण

तत्त्वांमध्यें मीपण गेलें । तरी निर्गुण सहजचि उरलें । सोहंभावें प्रत्यया आलें । आत्मनिवेदन ॥ ३१ ॥ आत्मनिवेदन होतां । देवाभक्तांसी ऐक्यता । साचार भक्त विभक्तता । सांडूनि जाला ॥ ३२ ॥ निर्गुणास नाहीं जन्ममरण । निर्गुणास नाहीं पापपुण्य । निर्गुणीं अनन्य होतां आपण । मुक्त जाला ॥३३॥ तत्त्वीं वेटाळून घेतला । प्राणी संशयीं बुडाला । आपणास आपण भुलला । कोहं म्हणे ॥ ३४ ॥ तत्त्वीं गुंतला म्हणे कोहं । विवेक पाहातां म्हणे सोहं । अनन्य होतां अहं सोहं । मावळलीं ॥ ३५ ॥ या उपरी उर्वरित । तेंचि स्वरूप संत । देहीं असोनि देहातीत । जाणिजे ऐसा ॥ ३६ ॥ संदेहवृत्ति ते न भंगे । म्हणोनि बोलिलेंचि बोलावें लागे । आम्हांस हें घडलें प्रसंगें । श्रोतीं क्षमा केलें पाहिजे ॥३७॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मायोद्भवनाम समास तृतीय ॥ ३ ॥

श्रीराम । कृतायुग सत्रा लक्ष अठाविस सहस्र । त्रेतायुग बारा लक्ष शाहाणौ सहस्र । द्वापार आठ लक्ष चौसष्टी सहस्र । आतां कलयुग ऐका ॥१॥ कलयुग च्यारि लक्ष बतीस सहस्र । चतुर्युगें त्रेचाळिस लक्ष वीस सहस्र । ऐसे चतुर्युग-सहस्र । तो ब्रह्मयाचा येक दिवस ॥ २ ॥ ऐसे ब्रह्मे सहस्र देखा । तेव्हां विष्णूची येक घटिका । विष्णू सहस्र होतां ऐका । पळ येक ईश्वराचें ॥ ३ ॥ ईश्वर जाय सहस्र वेळ । तें शक्तीचें अर्ध पळ । ऐसी संख्या बोलिली सकळ । शास्त्रांतरीं ॥४॥

चतुर्युगसहस्राणि दिनमेकं पितामहम् । पितामहसहस्राणि विष्णोर्घटिकमेव च ॥ १ ॥
विष्णोरेकसहस्राणि पलमेकं महेश्वरम् । महेश्वरसहस्राणि शक्तेरर्धं पलं भवेत् ॥ २ ॥

ऐशा अनंत शक्ती होती । अनंत रचना होति जाती । तरी अखंड खंडेना

गेलें, निर्गुण ब्रह्म सहजच उरलें व ' सः अहं ' तेंच मी ह्या विचारानें आत्मनिवेदन झालें ; देवभक्तांस ऐक्यता आली. विभक्तपणा (वेगळेपणा) सांडून भक्त झाला ; अशी अनन्यता हीच सायुज्यमुक्ति. तत्त्वांनीं गुंडाळला गेल्यामुळें प्राणी भ्रमांत पडून ' कोहं ' म्हणतो. तत्त्वांत गुंतला कीं म्हणतो ' कोऽहं ' म्ह० मी कोण ; विवेक पाहतां म्हणतो ' सोऽहं ' म्ह० निर्गुण ब्रह्म तेंच मी. निर्गुण ब्रह्माशीं अनन्यसमरस झाला कीं ' अहं सोहं '— तो मी — दोन्ही मावळतात. याउपर शाश्वत ब्रह्मच उरतें व त्याशीं अभिन्न असा हा देही असून देहातीत आहे असा जनांस प्रत्यय येतो. श्रोत्यांस पुनः पुन्हां मी कोण, ब्रह्म कोण, व त्याशीं अभिन्न व्हावयाचें कसें असा संदेह पडतो, म्हणूनच सांगितलेलेंच पुन्हां सांगावें लागतें (३१–३७). [द० ६, स० ३]

कलियुगाचीं ४३२००० वर्षें, ह्याच्या दुप्पट वर्षें द्वापारयुगाचीं, तिप्पट वर्षें त्रेतायुगाचीं व चौपट वर्षें कृत (सत्य) युगाचीं. चारी युगें मिळून ४३२०००० त्रेचाळीस लक्ष २० हजार वर्षें होतात. ह्याच्या हजारपट केली म्हणजे जितकीं वर्षें होतात तो ब्रह्मदेवाचा एक दिवस. असे ब्रह्मे हजार झाले म्हणजे विष्णूची एक घटका भरते. विष्णु सहस्र झाले म्हणजे महेश्वराचें एक पळ होतें, व महेश्वर हजार वेळ गेला कीं आदिमायेचें अर्धपळ होतें अशी कालगणना शास्त्रांत सांगितली आहे. अशा आदिशक्तीही अनंत होतात व अनंत ब्रह्मांडें होतात व जातात. अनंत काळपर्यंत ह्या घडामोडी होत राहिल्या

स्थिती । परब्रह्माची ॥५॥ परब्रह्मास कैंची स्थिती । परी हे बोलावयाची रिती । वेदश्रुती नेति नेति । परब्रह्मीं ॥ ६ ॥ चारि सहस्र सातसें साठीं । इतुकी कलयुगाची राहाटी । उरल्या कलयुगाची गोष्टी । ऐसी असे ॥ ७ ॥ चारि लक्ष सत्ताविस सहस्र । दोनसें चाळीस सवंत्सर । पुढें अन्योन्य वर्णसंकर । होणार आहे ॥ ८ ॥ ऐसें रचलें सचराचर । येथें येकाहूनि येक थोर । पाहातां येथीचा विचार । अंत न लगे ॥ ९ ॥ येक म्हणती विष्णू थोर । येक म्हणती रुद्र थोर । येक म्हणती शक्ति थोर । सकळांमध्यें ॥ १० ॥ ऐसें आपुलालेपरी बोलती । परंतु अवघेंचि नासेल कल्पांतीं । यद्दृष्टं तन्नष्टं हे श्रुती । बोलतसे ॥ ११ ॥ आपुलाली उपासना । अभिमान लागला जना । याचा निश्चयो निवडेना । साधुविण ॥ १२ ॥ साधु निश्चय करिती येक । आत्मा सर्वत्र व्यापक । येर हें अवघेंचि माइक । सचराचर ॥ १३ ॥ चित्रीं लिहिली सेना । त्यांत कोण थोर कोण साना । हें तुम्ही विचाराना । आपुले ठाईं ॥ १४ ॥ स्वप्नीं उदंड देखिलें । लहानथोरही कल्पिलें । परंतु जागा जालिया जालें । कैसें पाहा ॥ १५ ॥ पाहतां जागृतीचा विचार । कोण लहान कोण थोर । जाला अवघाचि विस्तार । स्वप्नरचनेचा ॥ १६ ॥ अवघाचि माइक विचार । कैंचें लहान कैंचें थोर । लहानथोराचा निर्धार । जाणती ज्ञानी ॥ १७ ॥ जो जन्मास येऊन गेला । तो मी थोर म्हणतांच मेला । परि याचा विचार पाहिला । पाहिजे श्रेष्ठीं ॥ १८ ॥ जयासि जालें आत्मज्ञान । तेचि थोर महाजन । वेदशास्त्रेंपुराणें । साधुजन बोलताती ॥ १९ ॥ एवं सकळांमध्यें थोर । तो येकची परमेश्वर । तयामध्यें हरिहर । होती जाति ॥ २० ॥ तो निर्गुण निराकार । तेथें नाहीं उत्पत्ती संहार । स्थानमानाचा विचार । ऐलिकडे

तरी परब्रह्माची स्थिति खंड पावत नाहीं. त्याला ' स्थिति ' कसली म्हणा, पण शब्दांनीं कांहीं बोलावयाचें म्हणून बोललों. वेदश्रुति परमात्मस्वरूप आकलत नाहीं (नेति नेति) म्हणूनच सांगत आहेत. (परमात्मस्वरूपाला कालपरिच्छेद तसाच दिक्परिच्छेद नाहीं म्हणूनच त्याला ' दिक्कालाद्यनवच्छिन्न ' असें भर्तृहरीनें म्हटलें आहे). आतांशीं कलियुगाचीं ४७६० वर्षें झालीं आहेत (गतकलि ४७६० म्हणजे शके १५८१. द. ६, स. ४ पर्यंतची दासबोधरचना शके १५८१ पर्यंत झाली होती हें ह्यावरून स्पष्ट होतें) किती तरी वर्षें अजून उरलीं आहेत. आतांच वर्णसंकर होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत ! ह्या चराचर सृष्टींत एकापेक्षां एक थोर आहेत. कोणी विष्णु थोर म्हणतात, कोणी रुद्र म्हणतात, कोणी शक्ति थोर म्हणतात. लोक आपल्या उपासनेच्या अभिमानानें असें म्हणत असतात; पण ' यद्दृष्टं तन्नष्टम् ' ह्या श्रुतिवचनाप्रमाणें जेवढें दृश्यांत आलें तेवढें नाशिवंत आहे, व हें सारें चराचर मायिक आहे, एक आत्मा मात्र सर्वव्यापी व अविनाशी आहे असा साधूंचा निश्चय असतो. चित्रांत लिहिलेल्या सेनेंत मोठा कोण व लहान कोण ? स्वप्नांत पाहिलेल्या माणसांतला राजा व रंक जागृतींत आल्यावर सारखेच मिथ्या आहेत. हें अज्ञान्यांस कळत नसलें तरी ज्ञात्यांस कळतें. जो जन्मास येतो तो मी थोर म्हणतच मरतो ! ज्यांना आत्मज्ञान झालें तेच थोर, खरा थोर एक परमात्मा. त्यांत हरिहरादि येऊन जातात. तो परमात्मा निर्गुण व निराकार आहे. तेथें उत्पत्ति-स्थिति-लयाचा प्रश्नच नाहीं. स्थान-मानाचा विचार (कालगणनेच्या विचारा-

॥ २१ ॥ नांवरूप स्थानमान । हा तों अवघाचि अनुमान । तथापी होईल निदान । ब्रह्मप्रळई ॥ २२ ॥ ब्रह्म प्रळयावेगळें । ब्रह्म नामरूपानिराळें । ब्रह्म कोणी येका काळें । जैसें तैसें ॥ २३ ॥ करिती ब्रह्मनिरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण । तेचि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद ॥ २४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ब्रह्मनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ श्रोतेन पुसिलें ऐसें । माया ब्रह्म तें कैसें । श्रोतयावक्तयांच्या मिसें । निरूपण ऐका ॥ १ ॥ ब्रह्म निर्गुण निराकार । माया सगुण साकार । ब्रह्मास नाहीं पारावार । मायेस आहे ॥ २ ॥ ब्रह्म निर्गुण निश्चळ । माया चंचळ चपळ । ब्रह्म निरुपाधी केवळ । माया उपाधिरूपी ॥ ३ ॥ माया दिसे ब्रह्म दिसेना । माया भासे ब्रह्म भासेना । माया नासे ब्रह्म नासेना । कल्पांतकाळीं ॥ ४ ॥ माया रचे ब्रह्म रचेना । माया खचे ब्रह्म खचेना । माया रुचे ब्रह्म रुचेना । अज्ञानासी ॥ ५ ॥ माया उपजे ब्रह्म उपजेना । माया मरे ब्रह्म मरेना । माया धरे ब्रह्म धरेना । धारणेसी ॥ ६ ॥ माया फुटे ब्रह्म फुटेना । माया तुटे ब्रह्म तुटेना । माया विटे ब्रह्म विटेना । अविनाश तें ॥ ७ ॥ माया विकारी ब्रह्म निर्विकारी । माया सर्व करी ब्रह्म कांहींच न करी । माया नाना रूपें धरी । ब्रह्म तें अरूप ॥ ८ ॥ माया पंचभूतिक अनेक । ब्रह्म तें शाश्वत येक । माया ब्रह्माचा विवेक । विवेकी जाणती ॥ ९ ॥ माया लहान ब्रह्म थोर । माया असार ब्रह्म सार । माया अर्ति पार । ब्रह्मासी नाहीं ॥ १० ॥ सकळ माया विस्तारली । ब्रह्मस्थिति आच्छादली । परी ते निवडूनि घेतली । साधुजनीं ॥ ११ ॥ गोंडाळ सांडून नीर घेइजे । नीर सांडून क्षीर

प्रमाणें अलीकडचा आहे.), नांव-रूप, स्थान-मान (स्थानविचार व मानविचार – दिशा किंवा स्थान ठरवणें, व लांबी-रुंदी-उंचीचें माप घेणें) हें सर्व अनुमानाचें आहे. तथापि सर्व विचारांचा अंत ब्रह्मप्रळयीं होईल. ब्रह्मप्रलय म्ह० ब्रह्मसाक्षात्कार-समयीं जो अशेष कल्पनांचा लय होतो तो. ब्रह्माला नांव-रूप नाहीं, तसा प्रळयाचा धोकाही नाहीं. ब्रह्म सर्वकाळीं आहे तसें एकरसात्मकच आहे. जे ह्या ब्रह्माचें स्वरूप जाणतात व ब्रह्माचें (लोकोद्धारार्थ) निरूपण करितात तेच ब्रह्मवेत्ते ब्राह्मण होत (१–२४). [द. ६, स. ४]

माया कशी व ब्रह्म कसें तो विचार ऐका. जें-जें ब्रह्माविषयीं म्हणावें त्याच्या उलट मायेविषयीं म्हणावें लागतें. ब्रह्म निर्गुण तर माया सगुण, ब्रह्म अनंत तर माया सांत, ब्रह्म निर्मळ निश्चल निरुपाधिक तर माया चंचळ, चपळ व उपाधिरूप माया दिसे भासे नासे, ब्रह्म ह्यांतलें कांहीं नाहीं. माया उपजे मरे विकारी, ब्रह्म सदोदित निर्विकारी. माया सर्व करी, ब्रह्म कांहींच न करी. धारणाशक्तीस माया आकळतां येते, ब्रह्म येत नाहीं. मायेला नाम-रूप आहे, ब्रह्मास नाहीं. माया पांचभौतिक व अनेक, ब्रह्म शाश्वत व एक. माया लहान व असार, ब्रह्म थोर व सार. माया अलीकडची, ब्रह्मास पार नाहीं (१–१०). असा दोहोंत भेद असून मायेनें ब्रह्मस्थिति आच्छादून टाकली आहे तरी साधु-संत ती ओळखून घेतात.

सेविजे । माया सांडून अनुभविजे । ब्रह्म तैसें ॥ १२ ॥ ब्रह्म आकाशाऐसें निवळ । माया वसुंधरा डहुळ । ब्रह्म सूक्ष्म माया केवळ । स्थूळ रूपीं ॥ १३ ॥ ब्रह्म तें अप्रत्यक्ष असे । माया ते प्रत्यक्ष दिसे । ब्रह्म ते समचि असे । माया ते विषमरूपी ॥ १४ ॥ माया लक्ष ब्रह्म अलक्ष । माया साक्ष ब्रह्म असाक्ष । मायेमध्यें दोनि पक्ष । ब्रह्मीं पक्षचि नाहीं ॥ १५ ॥ माया पूर्वपक्ष ब्रह्म सिद्धांत । माया असंत ब्रह्म संत । ब्रह्मासि नाहीं करणें हेत । मायेसि आहे ॥ १६ ॥ ब्रह्म अखंड घन दाट । माया पंचभूतिक पोंचट । ब्रह्म तें निरंतर निघोट । माया ते जुनी जर्जरी ॥ १७ ॥ माया घडे ब्रह्म घडेना । माया पडे ब्रह्म पडेना । माया विघडे ब्रह्म विघडेना । जैसें तैसें ॥१८॥ ब्रह्म असतचि असे । माया निरसितांच निरसे । ब्रह्मास कल्पांत नसे । मायेस आहे ॥१९॥ माया कठिण ब्रह्म कोमळ । माया अल्प ब्रह्म विशाळ । माया नासे सर्वकाळ । ब्रह्मचि असे ॥ २० ॥ वस्तु नव्हे बोलिजे ऐसी । माया जैसी बोलिजे तैसी । काळ पावेना वस्तुसी । मायेस झडपी ॥ २१ ॥ नाना रूप नाना रंग । तितुका मायेचा प्रसंग । माया भंगे ब्रह्म अभंग । जैसें तैसें ॥ २२ ॥ आतां असो हा विस्तार । चालत जातें सचराचर । तितुकी माया परमेश्वर । सबाह्यअभ्यंतरीं ॥ २३ ॥ सकळ उपाधींवेगळा । तो परमात्मा निराळा । जळीं असोनि नातळे जळा । आकाश जैसें ॥ २४ ॥ मायाब्रह्माचें विवरण । करितां चुके जन्ममरण । संतांस गेलिया शरण । मोक्ष लाभे ॥ २५ ॥ अरे या संतांचा महिमा । बोलावया नाहीं सीमा । जयांचेनि जगदात्मा । अंतरचि होइजे ॥ २६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मायाब्रह्मनिरूपणनाम समास पंचम ॥ ५ ॥

शेवाळ (गोंडाळ) दूर करून-करून स्वच्छोदक घ्यावें, पाणी टाकून दूध घ्यावें त्याप्रमाणें मायेचा पडदा दूर सारून ब्रह्म घ्यावें (११–१२). ब्रह्म आकाशासारखें निर्मळ व माया पृथ्वीसारखी डहूळ ; ब्रह्म सूक्ष्म व माया स्थूळ ; ब्रह्म अप्रत्यक्ष म्ह० नेत्रादि इंद्रियांस न गवसणारें, माया प्रत्यक्ष म्ह० इंद्रियगोचर ; ब्रह्म सदा सम, माया विषमरूपी म्ह० नानात्व पावणारी, ब्रह्म अलक्ष्य व माया लक्ष्य, ब्रह्म असाक्षी व माया साक्षी (पाहणारी). मायेंत दोन पक्ष (जीव-शिव, बंध-मोक्ष, पाप-पुण्य ; प्रवृत्ति-निवृत्ति, इ०) व ब्रह्मांत पक्षच नाहीं. माया पूर्वपक्ष (खंडण-मंडणांतील), ब्रह्म सिद्धांत (खंडणांतलें नाहीं व मंडणांतलेंही नाहीं). ब्रह्म निरंतर निघोट (परिपूर्ण) व माया जुनी गोधडी. 'ब्रह्म असताचि असे व माया निरसितांचि निरसे'. ब्रह्माविषयीं अबोलणें (मौनच) उचित, मायेविषयीं बोलाल तितकें थोडेंच आहे! नाना रूपें, नाना रंग, नाना कल्पना साऱ्या मायेच्या. माया भंगते, ब्रह्म अभंग (१३–२२). तात्पर्य, चराचरांस होतें जातें तें सारें मायेंतलें, ब्रह्म सर्वांच्या अंतर्बाह्य आहे. जळांत असून आकाशाला जसा जळाचा स्पर्श नाहीं, तसें सकल उपाधींत असून परमात्मा तीवेगळा आहे. माया-ब्रह्माचें विवरण करितां जन्म-मरणांतून सुटावयाचा उपाय सांपडतो, व संतशरणागतीनें मोक्ष होतो. ह्या संतांचा महिमा वाचेनें काय सांगावा ? त्यांच्या कृपेनें परमात्माच अंतरीं येतो. जीवच ब्रह्म होतो (२३–२६). [द० ६, स० ५]

॥ श्रीराम ॥ सृष्टीपूर्वीं ब्रह्म असे । तेथें सृष्टि मुळींच नसे । आतां सृष्टि दिसत असे । ते सत्य किं मिथ्या ? ॥ १ ॥ तुम्ही सर्वज्ञ गोसांवी । माझी आशंका फेडावी । ऐसा श्रोता विनवी । वक्तयासी ॥ २ ॥ आतां ऐका प्रत्युत्तर । कथेसी व्हावें तत्पर । वक्ता सर्वज्ञ उदार । बोलता जाला ॥ ३ ॥ 'जीवभूतः सनातन' । ऐसें गीतेचें वचन । येणें वाक्यें सत्यपण । सृष्टीस आलें ॥ ४ ॥ 'यद्दृष्टं तन्नष्टं' येणें । वाक्यें सृष्टी मिथ्यापणें । सत्य मिथ्या ऐसें कोणें । निवडावें ॥ ५ ॥ सत्य म्हणों तरी नासे । मिथ्या म्हणों तरी दिसे । आतां जैसें आहे तैसें । बोलिजेल ॥ ६ ॥ सृष्टीमध्यें बहु जन । अज्ञान आणि सज्ञान । म्हणोनियां समाधान । होत नाहीं ॥ ७ ॥ ऐका अज्ञानाचें मत । सृष्टि आहे ते शाश्वत । देव धर्म तीर्थ व्रत । सत्यचि आहे ॥ ८ ॥ बोले सर्वज्ञाचा राजा । मूर्खस्य प्रतिमापूजा । ब्रह्मप्रळयाच्या पैजा । घालूं पाहे ॥ ९ ॥ तंव बोले तो अज्ञान । तरी कां करिसी संध्यास्नान । गुरुभजन तीर्थाटन । कासया फिरावें ॥ १० ॥

॥ श्लोक ॥ तीर्थे तीर्थे निर्मलं ब्रह्मवृंदं । वृंदे वृंदे तत्त्वचिंतानुवादः ।
वादे वादे जायते तत्त्वबोधः । बोधे बोधे भासते चंद्रचूडः ॥

चंद्रचुडाचें वचन । सद्गुरूचें उपासन । गुरुगीतानिरूपण । बोलिलें हरें ॥ ११ ॥ गुरूसी कैसें भजावें । आधीं तयास वोळखावें । त्याचें समाधान घ्यावें । विवेकें स्वयें ॥ १२ ॥

॥ श्लोक ॥ ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं । द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यं ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षिभूतं । भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ १ ॥

गुरुगीतेचें वचन । ऐसें सद्गुरूचें ध्यान । तेथें सृष्टिमिथ्याभान । उरलें कैंचें ॥ १३ ॥ ऐसा सज्ञान बोलिला । सद्गुरु तो वोळखिला । सृष्टि मिथ्या ऐसा

(१) प्रश्न १–सृष्टिपूर्वीं ब्रह्म आहे व तेथें सृष्टि मुळींच नाहीं, पण सृष्टि आम्हांला प्रत्यक्ष दिसते ती 'सत्य आहे कीं मिथ्या आहे ?' उत्तर :–'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः' ह्या वाक्यावरून सृष्टीस सत्यपण येतें, पण 'यद्दृष्टं तन्नष्टं' ह्यावरून मिथ्यापण येतें. दोन्हीं वाक्यें प्रमाण असल्यामुळें सृष्टि सत्य कीं मिथ्या (म्ह० माया सत् कीं असत्) ह्याचा निवाडा कोणीं करावा ? 'सत्य म्हणों तरी नासे ! मिथ्या म्हणों तरी दिसे.' तात्पर्य काय कीं सृष्टि सत्यही म्हणतां येत नाहीं, व मिथ्याही म्हणतां येत नाहीं, तर ब्रह्माप्रमाणेंच अनिर्वचनीय आहे. आतां ह्याला अगदींच उत्तर नाहीं असें नाहीं. सृष्टींत अज्ञानी व ज्ञानी असे दोन वर्ग आहेत. त्यांपैकीं अज्ञानी जे आहेत ते सृष्टि सत्य-शाश्वत म्हणूनच सर्व व्यवहार करितात. त्यांच्या मतें देव, धर्म, तीर्थ, व्रत सर्व कांहीं सत्य आहे. ह्याच्या उलट ज्ञानी पुरुष सृष्टि मिथ्या जाणून शाश्वत ब्रह्माचा अंगीकार करितात. ज्ञानी म्हणतो 'प्रतिमापूजा मूर्ख म्ह० अज्ञानी जीवांना आवडली तरी ब्रह्मप्रळयाच्या प्रसंगीं कीं ज्या वेळीं सर्व विश्वाचा लय होतो त्या वेळीं पैजेनें टिकणार नाहीं. देवच राहणार नाहींत मग त्याच्या प्रतिमा कोठच्या राहणार ? (१–१०). ज्याला स्वहित पाहिजे त्यानें ज्ञान्यांच्या, संत-सद्गुरूंच्या वचनाप्रमाणें चालावें, हें उत्तम.' प्रतिप्रश्न :–पण सृष्टि मिथ्या म्हटल्यावर तीर्थाटन व गुरुसेवाही मिथ्याच कीं ! मग गुरूच्या तरी वचनाचें सत्यत्व कां म्हणून मानावें ? प्रत्युत्तर :–तुझ्या कल्पनेनें गुरु म्हणजे नुसता हाडा-मांसाचा

केला । निश्चितार्थ ॥ १४ ॥ श्रोता ऐसें न मनी कदा । आणीक उठिला वेवादा । म्हणे कैसा रे गोविंदा । अज्ञान म्हणतोसि ॥ १५ ॥ जीवभूतः सनातनः । ऐसे गीतेचें वचन । तयासि तूं अज्ञान । म्हणतोसि कैसा ॥१६॥ ऐसा श्रोता आक्षेप करी । विषाद मानिला अंतरीं । याचें प्रत्युत्तर चतुरीं । सावध परिसावें ॥ १७ ॥ गीतेंस बोलिला गोविंद । त्याचा न कळे तुज भेद । म्हणोनियां व्यर्थ खेद । वाहतोसी ॥ १८ ॥

॥ श्लोक ॥ अश्वत्थः सर्ववृक्षाणां ॥

माझी विभूति पिंपळ । म्हणोनी बोलिला गोपाळ । वृक्ष तोडितां तत्काळ । तुटत आहे ॥ १९ ॥

॥ श्लोक ॥ नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः । न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥ १ ॥

शस्त्रांचेन तुटेना । अग्निचेन जळेना । उदकामध्यें कालवेना । स्वरूप माझें ॥ २० ॥ पिंपळ तुटे शस्त्रानें । पिंपळ जळे पावकानें । पिंपळ कालवे उदकानें । नाशिवंत ॥ २१ ॥ तुटे जळे बुडे वुडे । आतां ऐक्य कैसें घडे । म्हणोनि हें उजेडे । सद्गुरुमुखें ॥ २२ ॥ इंद्रियाणां मनश्चास्मि । कृष्ण म्हणे मन तो मी । तरी कां आवरावी उर्मी । चंचळ मनाची ॥२३॥ ऐसें कृष्ण कां बोलिला । साधनमार्ग दाखविला । खडे मांडूनि सिकविला । वोनामा जेवी ॥ २४ ॥ ऐसा आहे वाक्यभेद । सर्व जाणे तो गोविंद । देहबुद्धीचा वेवाद । कामा नये ॥ २५ ॥ वेद शास्त्र श्रुति स्मृती । तेथें वाक्यभेद पडती । ते सर्वही निवडती । सद्गुरुवचनें ॥ २६ ॥ वेदशास्त्रांचें भांडण । शस्त्रें तोडी ऐसा कोण । हें निवडेना साधुविण । कदा कल्पांतीं ॥ २७ ॥ पूर्वपक्ष आणि सिद्धांत ।

सांपळा होय, पण गुरूचें खरें स्वरूप ‘ब्रह्मानंदं परमसुखदं’ ह्या श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें द्वंद्वातीत, तत्त्वमस्यादिलक्ष्य, एक, नित्य, अचल असें आहे. ह्या गुरूच्या शुद्धस्वरूपाचें ध्यान करशील तर सृष्टिमिथ्याभानच तुला उरणार नाहीं व तूं तरून जाशील. तात्पर्य काय कीं सृष्टि मिथ्या हाच निश्चितार्थ आहे. **प्रतिप्रश्न २ :—** मघांशीं आपण ‘जीवभूतः सनातनः’ ह्या भगवंताच्या वचनावरून सृष्टि आहे हें ठरतें असें म्हणालांत, मग देवाचें वचन काय खोटें म्हणतां? **प्रत्युत्तर २ :—** गीतेंत देव ज्या अर्थानें बोलले आहेत तें मर्म तुला समजलें नाहीं. देवांनीं ‘अश्वत्थः सर्ववृक्षाणां’ म्ह० सर्व वृक्षांत मी अश्वत्थ आहे असें म्हटलें आहे. बरें देवाचें रूप ‘नैनं छिन्दन्ति शस्त्राणि’ असें देवच बोलले आहेत म्हणून तूं अश्वत्थावर कुऱ्हाड चालवूं लागलास तर अश्वत्थ तुटल्याशिवाय राहील काय ? मग ह्या दोन्ही विरुद्ध भासणाऱ्या वचनांचा मेळ कसा घालशील ? बाबा रे ! ह्याच साठीं सद्गुरु लागतात बरें ! त्यांच्याच मुखानें ह्या वचनांचें खरें मर्म कळून विरोधाभास उडून जातो. दुसरें उदाहरण देतों. ‘इंद्रियाणां मनश्चास्मि’ व ‘चंचल हि मनः कृष्ण’ हीं दोन्हीं वचनें गीतेंतच असून चंचल मनाचा देवांनीं निग्रह करावयाला सांगितला आहे. मन जर देवाची विभूति आहे तर मनाचा निग्रह कोणीं कसा करावयाचा? बाबा रे, देव ढीग बोलले आहेत पण ह्या वाक्यभेदांचा निर्णय गुरुमुखानेंच ऐकिला पाहिजे. साधनमार्ग दाखविण्यासाठीं, चंचळ मनाची ऊर्मि आवरण्यासाठीं देव तसें बोलले आहेत. देवांच्या भाषणाचें मर्म देहबुद्धि कायम ठेवून उकलणार नाहीं, शास्त्राचा निश्चितार्थ संतमुखानेंच ऐकिला पाहिजे. विरुद्ध वचनें घेऊन वादच काढीत बसलास तर वेदशास्त्रांत अशीं शेकडों परस्परविरुद्ध वचनें सांपडतील, म्हणून वादबुद्धि सोडून संवाद करावयाला शीक म्हणजे संतगुरुकृपेनें स्वानुभव येऊन सर्व वाद मिटतील व तूं

शास्त्रीं बोलिला संकेत । याचा होय निश्चितार्थ । साधुमुखें ॥ २८ ॥ येरवीं वादाचीं उत्तरें । येकाहूनि येक थोरें । बोलों जातां अपारें । वेदशास्त्रीं ॥ २९ ॥ म्हणोनि वादवेवाद । सांडून कीजे संवाद । तेणें होये ब्रह्मानंद । स्वानुभवें ॥ ३० ॥ येके कल्पनेचे पोटीं । होति जाती अनंत सृष्टी । तया सृष्टीची गोष्टी । साच केंवी ॥ ३१ ॥ कल्पनेचा केला देव । तेथें दृढ जाला भाव । देवालागीं येतां खेव । भक्त दुःखें दुखवला ॥ ३२ ॥ पाषाणाचा देव केला । येके दिवशीं भंगोन गेला । तेणें भक्त दुखवला । रडे पडे आक्रंदे ॥ ३३ ॥ येक देव हारपला घरीं । येक देव नेला चोरीं । येक देव दुराचारीं । फोडिला बळें ॥ ३४ ॥ येक देव जापाणिला । येक देव उदकीं टाकिला । येक देव नेऊन घातला । पायातळीं ॥ ३५ ॥ काय सांगों तीर्थमहिमा । मोडूनि गेला दुरात्मा । थोर सत्व होतें तें मां । काय जालें कळेचिना ॥ ३६ ॥ देव घडिला सोनारीं । देव वोतिला वोतारीं । येक देव घडिला पाथरीं । पाषाणाचा ॥ ३७ ॥ नर्मदागंडिकातीरीं । देव पडिले लक्षवरी । त्यांची संख्या कोण करी । असंख्यात गोटे ॥ ३८ ॥ चक्रतीर्थीं चक्रांकित । देव असती असंख्यात । नाहीं मनीं निश्चितार्थ । येक देव ॥ ३९ ॥ बाण तांदळे तांब्रनाणें । स्फटिक देव्हारां पूजणें । ऐसे देव कोण जाणे । खरे कीं खोटे ॥ ४० ॥ देव रेसिमाचा केला । तोहि तुटोनियां गेला । आतां नवा नेम धरिला । मृत्तिकेचा ॥ ४१ ॥ आमचा देव बहु सत्य । आम्हां आकांतीं पावत । पूर्ण करी मनोरथ । सर्वकाळ ॥ ४२ ॥ आतां याचें सत्व गेलें । प्राप्त होतें तें जालें । प्राप्त न वचे पालटिलें । ईश्वराचेनी ॥ ४३ ॥ धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ठ देखा । तेथें देव कैंचा मूर्खा । भ्रांति पडिली ॥ ४४ ॥ हे आपुली कल्पना । प्राप्तऐसीं

ब्रह्मानंदाला पात्र होशील. बाबा रे ! एका कल्पनेच्या पोटांत अनंत सृष्टि होतात आणि जातात त्या सर्व सत्य मानतां येत नाहींत. म्हणून सृष्टि मिथ्या आहे हाच निश्चितार्थ समज (११–३०). कल्पनेनें देव उभा केला, दृढ भाव ठेविला, देवाला कांहीं अपाय (भंग इ०) झाला कीं भक्त रडत बसला. एक देव घरच्या घरीं हरवला, एक चोरांनीं नेला, एक पाखांड्यांनीं फोडिला, एक देव भ्रष्ट केला (जापाणिला), एक पाण्यांत बुडविला, इ० प्रकार पाहून भक्त दुःख पावतो. असा कांहीं प्रकार पाहिला कीं देवांचें व तीर्थांचें सत्त्व गेलें म्हणून हा उलट पुन्हां शोकांत पडतो. नर्मदा-गंडिकातीरीं असंख्यात गोटे पडले आहेत त्यांतलेच चार-दोन पाहून हा देव म्हणून त्यांना पूजतो. बाण, तांदळे, रेशमाचे वगैरे देव कोण जाणे खरें कीं खोटे ! ‘ आमचा देव आम्हांला आकांतीं पावून सारे मनोरथ पुरवीत होता ’ असें म्हणावयाला वेळ नाहीं व उलट प्रकार झाले कीं ‘देवाचें सत्त्व गेलें’ म्हणून रडावयालाही वेळ नाहीं. धातु, पाषाण, मृत्तिका, चित्रलेप, काष्ठ ह्या ठिकाणीं मूर्खा देव कसला घेऊन बसलास ? ह्या साऱ्या कल्पना आहेत.

फळें जाणा। परी त्या देवाचिया खुणा। वेगळ्याची ॥ ४५ ॥ म्हणोनि हें मायाभ्रमणें। सृष्टि मिथ्या कोटिगुणें। वेदशास्त्रें पुराणें। ऐसें बोलती ॥ ४६ ॥ साधु संत महानुभाव। त्यांचा हा ऐसा अनुभव । पंचभूतातीत देव। सृष्टि मिथ्या ॥ ४७ ॥ सृष्टिपूर्वीं सृष्टि चालतां। सृष्टि अवघी संव्हारतां। शाश्वत देव तत्वता। आदिअंतीं ॥ ४८ ॥ ऐसा सर्वांचा निश्चयो। येद्र्थीं नाहीं संशयो। व्यतिरेक आणि अन्वयो। कल्पनारूप ॥ ४९ ॥ येके कल्पनेचे पोटीं। बोलजेती अष्ट सृष्टि। तया सृष्टींची गोष्टी। सावध ऐका ॥ ५० ॥ येकी कल्पनेची सृष्टी। दुजी शाब्दिक सृष्टी। तिजी प्रत्यक्ष सृष्टी। जाणती सर्व ॥ ५१ ॥ चौथी चित्रलेपसृष्टी। पांचवी स्वप्नसृष्टी। साहावी गंधर्वसृष्टी। ज्वरसृष्टी सातवी ॥ ५२ ॥ आठवी दृष्टिबंधन। ऐशा अष्ट सृष्टी जाण। यामधें श्रेष्ठ कोण। सत्य मानावी ॥५३॥ म्हणोनि सृष्टी नासिवंत। जाणती संत महंत। सगुणीं भजावें निश्चित। निश्चयाकारणें ॥ ५४ ॥ सगुणाचेनि आधारें। निर्गुण पाविजे निर्धारें। सारासारविचारें। संतसंगें ॥ ५५ ॥ आतां असो हें बहुत। संतसंगें कळे नेमस्त। येऱ्हवीं चित्त दुश्चित। संशईं पडे ॥ ५६ ॥ तंव शिष्यें आक्षेपिलें। सृष्टी मिथ्या ऐसें कळलें। परी हें अवघें नाथिलें। तरी दिसतें कां ॥ ५७ ॥ दृश्य प्रत्यक्ष दिसतें। म्हणोन सत्यचि वाटतें। यासि काय करावें तें। सांगा स्वामी ॥ ५८ ॥ याचें प्रत्योत्तर भलें। पुढिले समासीं बोलिलें। श्रोतां श्रवण केलें। पाहिजे पुढें ॥ ५९ ॥ एवं सृष्टी मिथ्या जाण। जाणोनि रक्षावें सगुण। ऐसी हे अनुभवाची खूण। अनुभवी जाणती ॥ ६० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सृष्टिकथननाम समास षष्ठ ॥ ६ ॥

देव पंचभूतातीत आहे व सृष्टि मिथ्या हाच सिद्धांत खरा आहे. सृष्टि चालतां, सृष्टिसंहार झाल्यावरही शाश्वत देव आहे तो खरा (३१–४९). प्रतिप्रश्न ३ :– एका कल्पनेच्या पोटांत अनेक सृष्टि होतात म्हणून म्हणालांत त्या कोणत्या? (५०). प्रत्युत्तर ३ :– एक कल्पनेची सृष्टि, दुसरी शब्दसृष्टि, तिसरी प्रत्यक्ष सृष्टि, चौथी चित्रलेपसृष्टि, पांचवी स्वप्नसृष्टि, साहवी गंधर्वसृष्टि, सातवी ज्वरसृष्टि, आठवी दृष्टिबंधनसृष्टि, अशा आठ सृष्टि आहेत. आतां ह्या आठ सृष्टींतली सत्य कोणती? कोणती सृष्टि श्रेष्ठ व कां ? तात्पर्य हें आहे कीं सृष्टि नाशिवंत आहे हाच सिद्धांत आहे व संत महंत असेंच जाणून असतात, संतसंग न घडल्यामुळें चित्त दुश्चित होऊन तूं संशयांत पडला आहेस. म्हणून संशय सोडून सृष्टि मिथ्या आहे हें संतांपाशीं राहून शीक. सगुणाची निंदा केली असें समजूं नकोस. निश्चय दृढ होण्यासाठीं सगुणांस अवश्य भजावें. सगुणाच्या आधारें सारासार विचाराच्या बळानें सत्संगतींत शाश्वत ब्रह्म ओळखावें व तद्रूप व्हावें (५१–६०). [द० ६, स० ६]

॥ श्रीराम ॥ ज्ञानें दृश्य मिथ्या जालें । कां पाहिजे भजन केलें । तेणें काय प्राप्त जालें । मज निरोपावें ॥ १ ॥ ज्ञानाहूनि श्रेष्ठ असेना । तरी कां पाहिजे उपासना । उपासनेनें जना । काय प्राप्त ॥ २ ॥ मुख्य सार तें निर्गुण । तेथें दिसेचिना सगुण । भजन केलियाचा गुण । मज निरोपावा ॥ ३ ॥ जें समस्त नासिवंत । त्यास भजावें किंनिमित्य । सत्य सांडून असत्य । कोणें भजावें ॥ ४ ॥ असत्याचा प्रत्ययो आला । तरी मग नेम कां लागला । सत्य सांडून गल्बला । कासया करावा ॥ ५ ॥ निर्गुणानें मोक्ष होतो । प्रत्यक्ष प्रत्यया येतो । सगुण काये देऊं पाहातो । सांगा स्वामी ॥ ६ ॥ सगुण नासिवंत ऐसें सांगतां । पुन्हा भजन करावें म्हणतां । तरी कशासाठीं आतां । भजन करूं ॥ ७ ॥ स्वामीचे भिडेनें बोलवेना । येन्हवीं हें कांहींच मानेना । साध्य जालिया साधना । कां प्रवर्तावें ॥ ८ ॥ ऐसें श्रोतयाचें बोलणें । शब्द बोले निर्बुजलेपणें । याचें उत्तर ऐकणें । म्हणे वक्ता ॥ ९ ॥ गुरूचें वचनप्रतिपाळण । हें मुख्य परमार्थाचें लक्षण । वचनभंग करितां विलक्षण । सहजेंचि जालें ॥ १० ॥ म्हणोनी आज्ञेसी वंदावें । सगुणभजन मानावें । श्रोता म्हणे हें देवें । कां प्रयोजिलें ॥ ११ ॥ काय मानिला उपकार । कोण जाला साक्षात्कार । किंवा प्रारब्धाचें अक्षर । पुसिलें देवें ॥ १२ ॥ होणार हें तों पालटेना । भजनें काय करावें जना । हें तों पाहतां अनुमाना । कांहींच नये ॥ १३ ॥ स्वामींची आज्ञा प्रमाण । कोण करील अप्रमाण । परंतु याचा काय गुण । मज निरोपावा ॥ १४ ॥ वक्ता म्हणे सावधपणें । सांग ज्ञानाचीं लक्षणें । तुज कांहीं लागे करणें । किंवा नाहीं ॥ १५ ॥ करणें लागे भोजन । करणें लागे उदकप्राशन । मळमूत्रत्याग लक्षण । तेंहि सुटेना

प्रश्न २ :—निर्गुण ब्रह्म तेवढें सत्य व संपूर्ण सृष्टि मिथ्या असें आपलें म्हणणें आहे तर सगुणही सृष्टींत आल्यामुळें मिथ्याच झालें, तर मग स्नान-संध्या, भजन-पूजन, गुरुसेवा, इत्यादि सगुणोपासना करावयाला नको, असाच निश्चितार्थ निघतो कीं नाहीं ? सगुण जर नाशिवंत झाला, तर बरेंच झालें कीं ! भजन-पूजनाचा खटाटोप करावयाला नको, उपासनेची व नित्य-नेमाची भानगड नको, आपलें निर्गुण ब्रह्म बरें कीं मी बरा ! निर्गुणानें मोक्ष होतो, मग सगुण कशाला पाहिजे ? उत्तर २ :—गुरुवचनाप्रमाणें वागावें हें परमार्थाचें मुख्य लक्षण आहे आणि गुरूची आज्ञा सगुणोपासना करण्याविषयीं आहे म्हणून तुला ती केली पाहिजे (१—१०). प्रतिप्रश्न १ :—स्वामीची आज्ञा प्रमाण मानावी हें ठीक आहे, पण स्वामींनीं तरी असें कां सांगावें ? सगुण मिथ्या म्हणून सांगावयाचें आणि पुन्हां सगुणाचेंच भजन-पूजन करीत बैस म्हणून सांगावयाचें हें आपल्याला नाहीं योग्य वाटत ! सगुण जर मिथ्याच तर त्याच्या भजनानें काय होणार ? प्रारब्धीं होणार तें सुखें होईल ; तें जर सगुणभजनानें पालटणार नाहीं तर मग हे कष्ट करावे कशाला ? प्रत्युत्तर १ :—ज्ञान म्हटल्याबरोबर ज्ञानाचीं लक्षणें अंगीं आलीं असें का तुला वाटतें ? सगुण मिथ्या म्हटल्याबरोबर तूं निर्गुणपदारूढ झालास व तुझे इतर व्यवहार सुटले काय ? सुटले असतील तर प्रश्न निराळा. तुला देहाचे अन्य व्यापार करावेच लागतात ना ? अन्न-पाणी

॥ १६ ॥ जनाचें समाधान राहावें । आपुलें पारिखें वोळखावें । आणि भजनचि मोडावें । हें कोण ज्ञान ॥ १७ ॥ ज्ञान विवेकें मिथ्या जालें । परंतु अवघें नाहीं टाकिलें । तरी मग भजनेंचि काय केलें । सांग बापा ॥ १८ ॥ साहेबास लोटांगणीं जावें । नीचासारिखें व्हावें । आणि देवास न मनावें । हें कोण ज्ञान ॥ १९ ॥ हरिहरब्रह्मादिक । हे जयाचे आज्ञाधारक । तूं येक मानवी रंग । भजेसिना तरी काय गेलें ॥ २० ॥ आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ । जो समर्थाचाहि समर्थ । देवां सोडविता ॥ २१ ॥ त्याचे आम्ही सेवकजन । सेवेकरितां जालें ज्ञान । तेथें अभाव धरितां पतन । पाविजेल कीं ॥ २२ ॥ गुरु सांगती सारासार । त्यास कैसें म्हणावें असार । तुज काय सांगणें विचार । शाहाणे जाणती ॥ २३ ॥ समर्थाचे मनीचें तुटे । तेंचि जाणावें अदृष्ट खोटें । राज्यपदापासून करंटें । चेवलें जैसें ॥ २४ ॥ मी थोर वाटे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी । विचार पाहतां देहाभिमानी । प्रत्यक्ष दिसे ॥ २५ ॥ वस्तुभजन करीना । न करीं ऐसेंही म्हणेना । तरी हे जाणावी कल्पना । दडोन राहिली ॥ २६ ॥ ना तें ज्ञान ना तें भजन । उगाचि आला देहाभिमान । येथें नाहीं कीं अनुमान । प्रत्यय तुझा ॥ २७ ॥ तरी आतां ऐसें न करावें । रघुनाथभजनीं लागावें । तेणेंचि ज्ञान बोलावें । चळेना ऐसें ॥ २८ ॥ करी दुर्जनाचा संहार । भक्तजनासी आधार । ऐसा हा तों चमत्कार । रोकडा चाले ॥ २९ ॥ मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोन जातें । कृपा केलिया रघुनाथें । प्रचीत येते ॥ ३० ॥

घ्यावयाचें सुटलें नाहीं, मळमूत्रत्याग बंद झाला नाहीं. स्वजन व परजन हे तूं ओळखत आहेस, लोकांची लोभास्तव मनधरणी करणें बंद झालें नाहीं, आणि भजन मात्र सोडावयाला तयार झालास काय ? ज्ञान विवेकानें अवघेंच मिथ्या झालें आहे. तूं आपमतलबीपणानें भजन तेवढें मिथ्या म्हणून सोडूं म्हणतोस, आणि बाकीचे व्यवहार काय सत्य म्हणून सांभाळतोस ? तेही मिथ्या नाहींत काय ? वरिष्ठांच्या पायां पडून नीचसेवा पोटासाठीं करावयाचें सोडीत नाहींस आणि भजन मात्र सोडतोस हें काय ज्ञान ? परमज्ञानी असे हरि-हर-ब्रह्मादिकही भजन सोडीत नाहींत, आणि तूं एक यःकश्चित मनुष्य ! तूं देवाधिदेवाचें भजन केलें नाहींस म्हणून काय झालें ? दुसरें असें कीं आम्ही रामाचे दास आहों, रामाची उपासना केल्यामुळेंच आम्हांला हें ज्ञान झालें आहे, अर्थात् उपासनेच्या योगानें आत्मज्ञानाचा लाभ होतो हा आमचा अनुभव आहे. बापा ! समर्थाच्या मनींचें तुटणें हें करंटेपण आहे. गुरु सारासार विचार करून जो निश्चय सांगतात त्याविषयीं कुतर्क लढवीत बसणें हें अनुचित आहे. आणखी ‘ मी थोर वाटे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी ।’ तुझें अहंभावाचें बोलणें देहबुद्धीचें आहे. परमात्म्याचें भजन करीत नाहीं व करीत नाहीं असेंही म्हणत नाहीं ह्या संशयग्रस्त मनाला काय म्हणावें ? हें ज्ञान नव्हे, हें भजन नव्हे, हा केवळ देहाभिमान आहे. म्हणून असें न करितां रामभजनीं लागावें व निःसंदेह असें ज्ञान मग सांगावें. आपण (महाराष्ट्रीय लोक) रामाची भक्ति करूं लागलों तों लगेच श्रीरामानें (शिवाजीप्रभृतींना उठवून) दुर्जनांचा संहार चालविला ही गोष्ट प्रत्यक्ष डोळ्यांसमोर घडतांना तूं पाहत आहेस कीं नाहीं ? आम्हीं जें-जें मनांत धरिलें तें-तें सर्व विघ्नें दूर होऊन घडत आहे हें पाहत आहेस ना?

रघुनाथभजनें ज्ञान जालें। रघुनाथभजनें महत्त्व वाढलें। म्हणोनियां तुवां केलें। पाहिजे आधीं ॥ ३१ ॥ हें तों आहे सप्रचित। आणी तुज वाटेना प्रचित। साक्षात्कारें नेमस्त। प्रत्ययो करावा ॥ ३२ ॥ रघुनाथ स्मरोन कार्य करावें। तें तत्काळचि सिद्धी पावे। कर्ता राम हें असावें। अभ्यंतरीं ॥ ३३ ॥ कर्ता राम मी नव्हे आपण। ऐसें सगुणनिवेदन। निर्गुणीं तें अनन्य। निर्गुणचि होइजे ॥ ३४ ॥ मी कर्ता ऐसें म्हणतां। कांहींच घडेना सवथा। प्रचित पाहासी तरी आतां। सीघ्रचि पाहे ॥ ३५ ॥ मी कर्ता ऐसें म्हणसी। तेणें तूं कष्टी होसी। राम कर्ता म्हणतां पावसी। यश कीर्ति प्रताप ॥ ३६ ॥ येके भावनेसाठीं। देवासीं पडे तुटी। कां ते होय कृपादृष्टी। राम कर्ता भावितां ॥ ३७ ॥ आपण आहे दों दिसांचा। आणी देव तो बहुतां काळांचा। आपण थोडे वोळखीचा। देवासि त्रैलोक्य जाणे ॥ ३८ ॥ याकारणें रघुनाथभजन। त्यासि मानिती बहुत जन। ब्रह्मादिक आदिकरून। रामभजनीं तत्पर ॥ ३९ ॥ ज्ञानबळें उपासना। आम्ही भक्त जरी मानूं ना। तरी या दोषाच्या पतना। पावों अभक्तपणें ॥ ४० ॥ देव उपेक्षी थोरपणें। तरी त्याचें तोचि जाणे। अप्रमाण तें श्लाघ्यवाणें। नव्हे कीं श्रेष्ठा ॥ ४१ ॥ देहास लागली उपासना। आपण विवेकें उरेना। ऐसी हे स्थिति सज्जना-। अंतरींची ॥ ४२ ॥ सकळ मिथ्या होऊन जातें। हें रामभजनें कळों येतें। हें दृश्य ज्ञानियांचेनि मतें। स्वप्न जैसें ॥ ४३ ॥ मिथ्या स्वप्नविवंचना। तैसी सृष्टीची रचना। दृश्य मिथ्या साधुजना। कळों आलें ॥ ४४ ॥ आक्षेप जाला श्रोतयांसी। मिथ्या तरी

मग अजून रामभक्तीनें केवढालीं कार्यें होतात ह्याविषयीं तूं साशंक कां? 'हें तों आह सप्रचित' आम्ही अनुमानानें बोलत नाहीं, हें प्रत्यक्ष अनुभवाचें बोलणें आहे. ब्रह्मज्ञान झालें व महत्त्व वाढून मोठ-मोठाले लोकसमुदाय वश होऊन महत्त्वाचीं कार्यें आमच्या हातून घडत आहेत हा सारा श्रीरामाच्या उपासनेचा प्रताप आहे! म्हणून तुला रामाची भक्तीच आधीं केली पाहिजे. हें आम्ही प्रचीतीनें सांगतों. तुला पटत नसेल तर तूं प्रचीत घेऊन पाहा. रामाचें स्मरण करून जें-जें कार्य हातीं घ्यावें तें-तें सिद्धीस जातें. 'कर्ता राम, मी नव्हे' हें सगुणभक्ताचें निवेदन होय, निर्गुणज्ञानी निर्गुणाच्या ठिकाणीं अनन्य होतो. दोन्ही प्रकारें अहंकार उरत नाहीं. 'मी कर्ता' ह्या अभिमानानें काय करूं पाहशील तर कष्ट पावशील व 'राम कर्ता' म्हणून कार्य करशील तर तुझा यशकीर्तिप्रताप वाढेल. एका भावनेसाठीं देव कां सोडावा? आपण दोन दिवसांचे व दव अनादि, आपल्या ओळखी चार लोकांच्या व देवाला त्रैलोक्य ओळखतें. अशा रामाचे भक्त होण्यानें जनांचीं मनही रामाकडे व आपल्या सत्कार्याकडे ओढलीं जातात. अहंभावानें सर्व हानीच आहे, ज्ञानाहंकारानें आम्ही भक्त जर उपासना मानणार नाहीं तर अभक्त होऊन पतन पावूं. आपण थोरपणा घेतला कीं देव आपली उपेक्षा करितो, व मग काय फळें भोगावीं लागतात हें त्याचें तोच जाणे. संतसज्जनांची परंपरा पाहिली तर ते देहाला उपासना लावून देतात व आपण विवकानें अहंशून्य (राममय) होतात अशीच आहे. सृष्टि मिथ्या हें शब्दानें कळत नाहीं, हें रामभजनांत तन्मय झाल्यानें खरें-खरें बिंबतें. दृश्य स्वप्नवत् आहे हें ज्ञानी भक्तांच्याच प्रत्ययास येतें. इतर लोक बोलोत,

कां दिसते आम्हांसी । याचें उत्तर पुढिले समासीं । बोलिलें असे ॥ ४५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सगुणभजननाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ मागां श्रोतीं पुसिलें होतें । दृश्य मिथ्या तरी कां दिसतें । याचें उत्तर बोलिजेल तें । सावध ऐका ॥ १ ॥ देखिलें तें सत्यचि मानावें । हें ज्ञात्याचें देखणें नव्हे । जड मूढ अज्ञान जीवें । हें सत्य मानिजे ॥ २ ॥ येक्या देखिल्यासाठीं । लटिक्या कराव्या ग्रंथकोटी । संतामहंतांच्या गोष्टी । त्याही मिथ्या मानाव्या ॥ ३ ॥ माझें दिसतें हेंचि खरें । येथें चालेना दुसरें । ऐशा संशयाच्या भरें । भरोंचि नये ॥ ४ ॥ मृगें देखिलें मृगजळ । तेथें धांवतें बरळ । जळ नव्हे मिथ्या सकळ । त्या पशूस कोणें म्हणावें ॥ ५ ॥ रात्रौ स्वप्न देखिलें । बहुत द्रव्य सांपडलें । बहुत जनांसी वेव्हारिलें । तें खरें कैसेंनि मानावें ॥ ६ ॥ कुशळ चितारी विचित्र । तेणें निर्माण केलें चित्र । देखतां उठे प्रीती मात्र । परंतु तेथें मृत्तिका ॥ ७ ॥ नाना वनिता हस्ति घोडे । रात्रौ देखतां मन बुडे । दिवसा पाहातां कातडें । कंटाळवाणें ॥ ८ ॥ काष्ठीं पाषाणी पुतळ्या । नाना ठकारें निर्मिल्या । परम सुंदर वाटल्या । परंतु तेथें पाषाण ॥ ९ ॥ नाना गोपुरीं पुतळ्या असती । वक्रांगें वक्रदृष्टी पाहती । लाघव देखतां भरे वृत्ती । परंतु तेथें त्रिभाग ॥ १० ॥ खेळतां नेटके दशावतारी । तेथें येती सुंदर नारी । नेत्र मोडिती कळाकुंसरी । परी ते अवघे धटिंगण ॥ ११ ॥ सृष्टी बहुरंगी असत्य । बहुरूपाचें हें कृत्य ।

पण दृश्य सृष्टि मिथ्या आहे हें ज्ञानी भक्त जे आहेत त्यांनाच यथार्थ कळतें (११–४४). ह्यावरही आणखी शंका आहेत त्यांचा विचार पुढें (४५). [द० ६, स० ७]

प्रश्न ३ :–सृष्टि मिथ्या तर दिसते कां ? ' उत्तर ३ :– ' देखिलें तें सत्यचि मानावें, हें ज्ञात्याचें देखणें नव्हे ! जड मूढ अज्ञान जीवांनीं जें दिसेल तें सत्य मानावें हें साहजिक असेल पण खरें नाहीं. कोट्यवधि ग्रंथ व संत-महंत सृष्टि मिथ्या आहे असें सांगत असतांना माझ्या दृष्टीला ती दिसते म्हणून खरी अशा संशयांत पडणें योग्य नाहीं. केवळ दिसते एवढ्यानें कोणतीही वस्तु खरी मानणें किती चुकीचें आहे तें पाहा (१–४). मृग मृगजळ पाहतांच तें सत्य मानून त्याच्या मागें बरळ (वेडें) होऊन धांवतें ! काय तेथें खरोखर जळ आहे ? पण हें ' त्या पशूस कोणें म्हणावें ? ' रात्रीं स्वप्न पाहिलें, पुष्कळ द्रव्य सांपडलें आणि मोठा व्यवहार केला पण त्या स्वप्नदृष्ट द्रव्यांतील फुटकी कवडी तरी जागृतीच्या व्यवहारास उपयोगीं पडेल काय ? कुशल चितार्‍यानें सुंदर स्त्रीचें चित्र काढिलें व तें पाहून एखादा कामुक पुरुष त्या स्त्रीला आलिंगावयास धांवला तर त्याच्या हातीं मातीशिवाय काय लागेल ? काष्ठ-पाषाणाच्या नयनमनोहर (ठकारें) पुतळ्या किंवा गोपुरावरच्या (देवळाच्या दरवाज्यावरील मजल्यावरच्या) पुतळ्या चांगल्या वक्रदृष्टीनें पाहत असल्या तरी काय उपयोग ? तेथें पाषाण नाहींतर त्रिभाग (चुना, वाळू व ताग ह्यांचा गोळा) सांपडणार. दशावतारांच्या नाटकांतलीं स्त्रीपात्रें डोळे मोडीत हावभाव करीत येतात, ' परी ते अवघे धटिंगण. ' (५–११). सृष्टि बहुरंगी असत्य आहे; बहुरूप्यानें ही

तुज वाटे दृश्य सत्य । परि हे अविद्या ॥ १२ ॥ मिथ्या साचासारिखें देखिलें । परि तें पाहिजे विचारिलें । दृष्टि तरळतां भासलें । तें साच कैसें मानावें ॥१३॥ वरी पाहातां पालथें आकाश । उदकीं पाहतां उताणें आकाश । मध्यें चांदिण्याहि प्रकाश । परि ते अवघें मिथ्या ॥१४॥ नृपतीनें चितारी आणिले । ज्याचे त्याऐसे पुतळे केले । पाहातां तेचि ऐसे गमले । परी अवघे माइक ॥ १५ ॥ नेत्रीं कांहीं बाहुली नसे । जेव्हां जें पाहावें तेव्हां तें दिसे । डोळां प्रतिबिंब भासे । तें साच कैसेनी ॥ १६ ॥ जितुके बुडबुडे उठती । तितुक्यांमध्यें रूपें दिसती । क्षणामध्यें फुटोन जाती । रूपें मिथ्या ॥ १७ ॥ लघुदर्पणें दोनि चारी हातीं । तितुकीं मुखें प्रतिबिंबती । परी ते मिथ्या आदिअंतीं । येकचि मुख ॥ १८ ॥ नदीतीरें भार जातां । दुसरा भार दिसे पालथा । कां पडसादाचा अवचिता । गजर उठे ॥ १९ ॥ वापीसरोवराचें तीर । तेथें पशु पक्षी नर वानर । नाना पात्रें वृक्षविस्तार । दिसे दोहि सवा ॥ २० ॥ येक शस्त्र झाडूं जातां । दोनि दिसती तत्वता । नाना तंतु टणत्कारितां । द्विधा भासती ॥ २१ ॥ कां ते दर्पणाचिये मंदिरीं । बैसली सभा दिसे दुसरी । बहुत दीपाचिये हारीं । बहुत छाया दिसती ॥ २२ ॥ ऐसें हें बहुविध असे । साचासारिखें दिसे । परी हें सत्य म्हणोनि कैसें । विश्वासावें ॥ २३ ॥ माया मिथ्या बाजीगरी । दिसे साचाचिये परी । परी हे जाणत्यानें खरी । मानूंचि नये कीं ॥ २४ ॥ लटिकें साचाऐसें भावावें । तरी पारखी कासया असावें । येवं ये अविद्येचे यावे । ऐसेचि असती ॥ २५ ॥ मनुष्यांची बाजीगरी । बहुत जनास वाटे खरी । सेवट पाहातां निर्धारीं । मिथ्या होय ॥ २६ ॥ तैसीच माव राक्षेसांची । देवांसही वाटे साची । पंचवटिकेस मृगाची । पाठी घेतली रामें ॥ २७ ॥ पूर्वकाया पालटिती । येकाचेचि

घडविलेली आहे. ही दिसली तरी अविद्याकृत आहे म्हणून मिथ्या असून सत्यशी वाटते. ज्ञात्याच्या दृष्टीला ती दिसत नाहीं व अज्ञान्याची दृष्टि तरळली (चंचळ झाली) म्हणजे तिला मात्र भासते. पाण्यांत उताणें आकाश व त्यांतील चांदण्या दिसतात त्या काय खऱ्या आहेत ? राजा मोठ-मोठ्या व्यक्तींचे पुतळे उभे करवितो ते पाहतां मूळ व्यक्तींसारखेच हुबेहुब असतात, पण काय त्या व्यक्ति भेटतात ? नेत्रांत बाहुली नसून पाहाव्या त्या-त्या वस्तूंचीं प्रतिबिंबें दिसतात. बुडबुड्यांत नानारूपें दिसतात, पण बुडबुडे फुटून जातात अर्थात् रूपें मिथ्याच होत. आरसेमहालांत एकच मुख असून अनेक मुखें दिसतात किंवा एक सभा भरली असतां दोन सभा दिसतात, एक शस्त्र परजलें कीं दोन दिसतात, वाद्यतंतु टणत्कारला म्हणजे दोन तंतु दिसतात; असे अनेक दृष्टांत देण्यासारखे आहेत. गाभाऱ्यांतून एका ध्वनीचे कितीतरी प्रतिध्वनि निघतात. खऱ्यासारखे दिसणारे हे प्रकार काय खरे आहेत ? सृष्टि बहुरंगी असत्य आहे हेंच खरें. माया ही मोठी गारुडी विद्या (बाजीगिरी) आहे. मनुष्यांची गारुड विद्या, राक्षसांची वोडंबरी तशीच भगवंताची माया लाघवी आहे. पारखी असतात ते तिघींनाही फसत नाहींत. राक्षसाची कपटविद्या खोटी म्हणूनच राम सुवर्णमृगाच्या मागें धांवले कीं नाहीं ? रूपें पालटणें,

बहुत होती । रक्तबिंदींच जन्मती । रजनीचर ॥ २८ ॥ नाना पदार्थ फळें जाले । द्वारकेमध्यें प्रवेशले । कृष्णें दैत्य किती वधिले । कपटरूपी ॥ २९ ॥ कैसें कपट रावणाचें । शीर केलें मावेचें । काळनेमीच्या आश्रमाचें । अपूर्व कैसें ॥ ३० ॥ नाना दैत्य कपटमती । जे देवांसहि नाटोपती । मग निर्माण होऊन शक्ती । संव्हार केला ॥ ३१ ॥ ऐसी राक्षेसांची माव । जाणों न सकती देव । कपटविद्येचें लाघव । अघटित ज्यांचें ॥ ३२ ॥ मनुष्यांची 'बाजीगरी' । राक्षसांची 'वोडंबरी' । भगवंताची नानापरी । विचित्र 'माया' ॥ ३३ ॥ हे साचासारिखीच दिसे । विचारितां साच नसे । मिथ्याचि परी भासे । निरंतर पाहतां ॥ ३४ ॥ साच म्हणावी तरी हे नासे । मिथ्या म्हणावी तरी हे दिसे । दोहीं पदार्थी अविश्वासे । सांगतां मन ॥ ३५ ॥ परंतु हें नव्हे साचार । मायेचा मिथ्या विचार । दिसतें हें स्वप्नाकार । जाण बापा ॥ ३६ ॥ तथापी असो तुजला । भासचि सत्य वाटला । तरी येथें चुका पडिला । ऐक बापा ॥ ३७ ॥ दृश्यभास अविद्यात्मक । तुझाही देहो तदात्मक । म्हणोनि हा अविवेक । तेथें संचरला ॥ ३८ ॥ दृष्टीनें दृश्य देखिलें । मन भासावरी बैसलें । तरी तें लिंगदेह जालें । अविद्यात्मक ॥ ३९ ॥ अविद्येनें अविद्या देखिली । म्हणोनी गोष्टी विश्वासली । तुझी काया अवघी संचली । अविद्येची ॥ ४० ॥ तेचि काया मी आपण । हें देहबुद्धीचें लक्षण । येणें करितां जालें प्रमाण । दृश्य आवघें ॥ ४१ ॥ इकडे सत्य मानिला देहो । तिकडे दृश्य सत्य हा निर्वाहो । दोहींमध्यें संदेहो । पैसावला बळें ॥ ४२ ॥ देहबुद्धि केली बळकट । आणी ब्रह्म पाहों गेला धीट । तों दृश्यानें रुधिली वाट । परब्रह्माची ॥ ४३ ॥ तेथें साच मानिलें दृश्याला । निश्चयोचि बाणोनि गेला । पाहा हो केवढा चुका पडिला । अकस्मात ॥ ४४ ॥ आतां असो हें बोलणें । ब्रह्म न पविजे मीपणें ।

रक्तबिंदूंत जन्म घेणें, रावणाला रामाचें कपटशीर दाखवितां येणें, दैत्यांना फळादिकांचीं रूपें घेतां येऊन बाजार भरवणें (वत्सलाहरणप्रसंगीं), असे कित्येक प्रकार पुराणांतून वर्णिले आहेत. श्रीकृष्णानें किती तरी दैत्य मारिले आहेत. राक्षसांच्या कपटविद्येला देवही फसलेले आहेत, शेवटीं देवांपुढें त्यांना हार खावी लागली हें निराळें (१२–३६). देवाधिदेवाची माया मिथ्या असून सत्यशी वाटते ह्यांत चूक कोठें आहे तेंही सांगतों. हा दृश्यभास अविद्येनें उभा केला असून तुझा देहही अविद्येचेंच कार्य आहे; दृष्टीला व मनाला मिथ्या दृश्याचीच संवय झाल्यानें – वासनात्मक लिंगदेहच अविद्येचा बनला आहे म्हणून – हा अविवेक तेथें संचरला आहे. असा मिथ्या देह मीच आहे अशी देहबुद्धि वाढल्यामुळें सारें दृश्य तुला सत्य वाटत आहे. देहबुद्धि दृढ करून तेथून परब्रह्माकडे पाहावयाला गेलास म्हणून मध्यें दृश्याची धोंड आड आली आहे. दृश्य सत्य वाटणें ही केवढी मोठी चूक आहे (३७–४४). हाडा-मांसाच्या सांपळ्यांत राहून चर्मचक्षूनें ब्रह्म पाहावयाला जाणें हें

देहबुद्धीचीं लक्षणें । दृश्य भाविती ॥ ४५ ॥ अस्थींचा देहीं मांसाचा डोळा । पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा । तो ज्ञाता नव्हे आंधळा । केवळ मूर्ख ॥ ४६ ॥ दृष्टीस दिसे मनास भासे । तितुकें काळांतरीं नासे । म्हणोनि दृश्यातीत असे । परब्रह्म तें ॥ ४७ ॥ परब्रह्म तें शाश्वत । माया तेचि अशाश्वत । ऐसा बोलिला निश्चितार्थ । नाना शास्त्रीं ॥ ४८ ॥ आतां पुढें निरूपण । देहबुद्धीचें लक्षण । चुका पडिला तो मी कोण । बोलिलें असे ॥ ४९ ॥ मी कोण हें जाणावें । मीपण त्यागूनि अनन्य व्हावें । मग समाधान तें स्वभावें । आंगीं बाणे ॥ ५० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दृश्य-निरसननाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ गुप्त आहे उदंड धन । काय जाणती सेवकजन । तयांस आहे तें ज्ञान । बाह्यात्काराचें ॥ १ ॥ गुप्त ठेविलें उदंड अर्थ । आणि प्रगट दिसती पदार्थ । शाहणे शोधिती स्वार्थ । अंतरीं असे ॥ २ ॥ तैसें दृश्य हें मायिक । पाहात असती सकळ लोक । परी जयांस ठाउका विवेक । ते तदंतर जाणती ॥ ३ ॥ द्रव्य ठेऊन जळ सोडिलें । लोक म्हणती सरोवर भरलें । तयाचें अभ्यंतर कळलें । समर्थ जनासी ॥ ४ ॥ तैसे ज्ञाते समर्थ । तेहीं वोळखिला परमार्थ । इतर ते करिती स्वार्थ । दृश्य पदार्थाचा ॥ ५ ॥ काबाडी वाहती काबाड । श्रेष्ठ भोगिती रत्नें जाड । हें जयाचें तयासीच गोड । कर्मयोगें ॥ ६ ॥ येक काष्ठस्वार्थ करिती । येक शुभा येकवटिती । तैसे नव्हेत कीं नृपति । सारभोक्ते ॥ ७ ॥ जयांस आहे विचार । ते सुखासनीं जाले स्वार । इतर ते जवळील भार । वाहतचि मेले ॥ ८ ॥ येक दिव्यान्नें भक्षिती । येक विष्ठा सावडिती । आपण वर्तल्याचा घेती । साभिमान ॥ ९ ॥

ज्ञात्याचें लक्षण नव्हे, हें मूर्खाचें, आंधळेपणाचें लक्षण आहे. दृष्टीला दिसतें व मनाला भासतें हें सर्व कालवश होणारें आहे व ब्रह्म त्याहून वेगळें म्ह० दृश्यातीत आहे, शाश्वत आहे. देहबुद्धीची (मीपणाची) चूक कशी दुरुस्त करावी हें सत्संगतींत कळून अनन्यतेनें ब्रह्मरूपता प्राप्त होते (४५–५०). [द० ६, स० ८]

प्रश्न ४—साधूंनाच ब्रह्मप्राप्तीचा उपाय कां पुसावा ? उत्तर ४—ह्या सृष्टींत ज्ञानी आणि अज्ञानी, सभाग्य आणि अभागी, उत्तम आणि हीन असे दोन कोटींचे जीव आहेत (हें दुसऱ्या दशकांत सविस्तर सांगितलेंच आहे.) श्रीमंताच्या तळघरांत असंख्य अमूल्य जडजवाहीर असतें, पण त्याची सेवकांना कोठें ओळख असते ? सरोवरांत अगणित द्रव्य ठेवून त्यावर मोटांनीं पाणी सोडलें तर लोकांना सरोवर दिसेल. पण समर्थांना तळांतलें द्रव्य दिसेल. काबाड्यांनीं काबाडकष्ट करावे आणि धनिकांनीं सुखविलास भोगावे. ज्यापाशीं विचाराचें भांडवल आहे ते सुखासनावर आरूढ होतात व अज्ञानी जीव भार वाहतच आयुष्य कंठितात. एक दिव्यान्नें भक्षितात व एक (भंगी) विष्ठा सावडितात व त्यांतच अभिमान

सार सेविजे श्रेष्ठीं । असार घेयिजे वृथापुष्टीं । साराऽसाराच्या गोष्टी । सज्ञान जाणती ॥ १० ॥ गुप्त परीस चिंतामणी । प्रगट खडे कांचमणी । गुप्त हेमरत्नखाणी । प्रगट पाषाण मृत्तिका ॥ ११ ॥ अव्हाशंख अव्हावेल । गुप्त वनस्पति अमोल । येरंड धोत्रे बहुसाल । प्रगट सिंपी ॥ १२ ॥ कोठें दिसेना कल्पतरु । उदंड सेरांचा विस्तारु । पाहातां नाहीं मैलागरु । बोरी बाभळी उदंड ॥ १३ ॥ कामधेनु जाणिजे इंद्रें । सृष्टींत उदंड खिल्लारें । महद्भाग्य भोगिजे नृपवरें । इतर कर्मानुसार ॥ १४ ॥ नाना व्यापार करिती जन । आवघेचि म्हणती सकांचन । परंतु कुबेराचें महिमान । कोणासीच न ये ॥१५॥ तैसा ज्ञानी योगेश्वर । गुप्तार्थलाभाचा ईश्वर । इतर ते पोटाचे किंकर । नाना मतें धुंडिती ॥ १६ ॥ तस्मात सार तें दिसेना । आणी असार तें दिसे जना । सारासारविवंचना । साधु जाणती ॥ १७ ॥ इतरांस काय सांगणें । खरें खोटें कोण जाणे । साधुसंतांचिये खुणे । साधुसंत जाणती ॥ १८ ॥ दिसेना जें गुप्त धन । तयास करणें लागे अंजन । गुप्त परमात्मा सज्जन-। संगतीं शोधावा ॥ १९ ॥ रायाचे सन्निध होतां । सहजचि लाभे श्रीमंतता । तैसा हा सत्संग धरितां । सद्वस्तु लाभे ॥ २० ॥ सद्वस्तूसी लाभे सद्वस्तु । अव्यावेस्तास अव्यावेस्तु । प्रशास्तासी प्रशास्तु । विचार लाभे ॥ २१ ॥ म्हणोनि हें दृश्यजात । अवघेंचि आहे अशाश्वत । परमात्मा अच्युत अनंत । तो या दृश्यावेगळा ॥ २२ ॥ दृश्यावेगळा दृश्याअंतरीं । सर्वात्मा तो सचराचरीं । विचार पाहातां अंतरीं । निश्चयो बाणे ॥ २३ ॥ संसारत्याग न करितां । प्रपंचउपाधी न सांडितां । जन्मामधें सार्थकता । विचारेंचि होय ॥ २४ ॥

वागवितात. श्रेष्ठ सार घेतात व धटिंगण असार घेवात. सार वस्तु गुप्त व दुर्लभ असतात व असार उघड व विपुल असतात. परीस व चिंतामणि हे गुप्त असतात, खडे व कांचमणि प्रगट दिसतात. सोन्या-रत्नांच्या खाणी शोधाव्या लागतात, पाषाण-माती लागेल तेथें उघड दिसते. उत्तम वनस्पति गुप्त व एरंड-धोत्रे विपुल. कल्पतरु, चंदन व कामधेनु हे दुर्लभ; शेरे, बाभळी व जनावरें वाटेल तितकीं. सगळेच आपणांस श्रीमंत म्हणवितात पण कुबेर एकच. त्याप्रमाणेंच नाना मतें धुंडणारे पोटबाबु पुष्कळ आढळतात, पण गुप्त परमात्म्याचा लाभ करून घेणारे ज्ञानयोगी दुर्लभ आहेत. सार ब्रह्मवस्तु गुप्त व दुर्लभ आहे, असार माया प्रगट व विपुल आहे. ज्ञानी संतांच्या खुणा तत्तुल्य असतात तेच जाणतात (१–१८). गुप्त द्रव्य डोळ्यांस दिसत नाहीं, पण तें पाहिजे तर डोळ्यांत अंजन घालावें लागतें, त्याप्रमाणें गुप्त परमात्म्याचा लाभ पाहिजे तर संतसंगतींत ज्ञानांजनच डोळ्यांत पडलें पाहिजे. राजाच्या संगतींत राजविलास अनायासें भोगावयाला सांपडतात, त्याप्रमाणें साधुसंगतींत सद्वस्तूंचा लाभ होतो. सद्वस्तूस सद्वस्तु लाभते म्ह० जो अंगानें ब्रह्म होईल त्यासच ब्रह्मलाभ होतो. ‘ ब्रह्माहमस्मि ’ ह्या ध्यानानेंच ब्रह्मरूपता येते; अव्यवस्तास अव्यवस्तु म्ह० पदार्थमय चित्तास पदार्थच दिसतात, मन विशाळ (प्रशस्त) करील त्यासच प्रशस्त परब्रह्म वस्तूचा लाभ होतो (१९–२१). तात्पर्य, हें दृश्य अशाश्वत, ब्रह्म शाश्वत आहे, दृश्यावेगळी असून दृश्यांत आहे, सबाह्याभ्यंतर आहे, व तीच मी आहें असा विवेक करील त्याला तद्रूपतेचा निश्चय बाणेल. त्यासाठीं संसार किंवा प्रपंचोपाधि सोडावी लागत नाहीं, विचारानें जन्मसाफल्य होतें. हें प्रचीतीचें बोलणें आहे, अनुमानाचें नव्हे. प्रचीत आणि

हें प्रचीतीचें बोलणें। विवेकें प्रचीत पाहाणें। प्रचीत पाहे ते शाहणे। अन्यथा नव्हे ॥ २५ ॥ सप्रचीत आणी अनुमान। उधार आणी रोकडें धन। मानसपूजा प्रत्यक्षदर्शन। यांसी महदंतर ॥ २६ ॥ पुढें जन्मांतरीं होणार। हा तों अवघाच उधार। तैसा नव्हे सारासार। तत्काळचि लाभ ॥ २७ ॥ तत्काळचि लाभ होतो। प्राणी संसारीं सुटतो। संशयो अवघाचि तुटतो। जन्ममरणाचा ॥२८॥ येचि जन्में येचि काळें। संसारीं होईजे निराळें। मोक्ष पाविजे निश्चळें। स्वरूपाकारें ॥ २९ ॥ ये गोष्टीस करी अनुमान। तो सिद्धचि पावेल पतन। मिथ्या वदे त्यास आण। उपासनेचि ॥ ३० ॥ हें येथार्थचि आहे बोलणें। विवेकेंचि सीघ्र मुक्त होणें। असोनी कांहींच नसणें। जनामध्यें ॥ ३१ ॥ देवपद आहे निर्गुण। देवपदीं अनन्यपण। हाचि अर्थ पाहातां पूर्ण। समाधान बाणे ॥ ३२ ॥ देहींच विदेह होणें। करून कांहींच न करणें। जीवन्मुक्तांचीं लक्षणें। जीवन्मुक्त जाणे ॥ ३३ ॥ येरवीं हें खरें न वाटे। अनुमानेंचि संदेह दाटे। संदेहाचें मूळ तुटे। सद्गुरुवचनें ॥ ३४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सारशोधननाम समास नवम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥ समाधान पुसतां कांहीं। म्हणती बोलिजे ऐसें नाहीं। तरी तें कैसें आहे सर्वही। निरोपावें ॥ १ ॥ मुक्यानें गूळ खादला। गोडी नये सांगायाला। याचा अभिप्राव मजला। निरोपण कीजे ॥ २ ॥ अनुभवही पुसों जातां। म्हणती नये कीं सांगतां। कोणापासीं पुसों आतां। समाधान ॥ ३ ॥ जे ते अगम्य सांगती। नये माझिये प्रचीति। विचार बैसे माझे चित्तीं। ऐसें करावें ॥ ४ ॥ ऐसें श्रोत्याचें उत्तर। याचें कैसें प्रत्युत्तर। निरोपिलें तत्पर। होऊन ऐका ॥ ५ ॥ जें समाधानाचें स्थळ। कीं तो अनुभवचि केवळ। तें स्वरूप

अनुमान यांत रोकडा धनलाभ व उधारी किंवा मानसपूजा व प्रत्यक्ष दर्शन यासारखें महदंतर आहे. पुढें जन्मांतरीं मोक्ष मिळेल असें वायद्याचें हें बोलणें नाहीं. स्वस्वरूपानुसंधान ठेवल्यानें 'येचि जन्में येचि काळें' मोक्षलाभ होतो. ह्याविषयीं कोणी संशय बाळगील तर तो सिद्ध असला तरी पतन पावेल, व वक्ता मिथ्या बोलेल तर त्यास त्याच्या उपासनेची शपथ आहे. जनांत असून कांहींच नसणें म्ह. बाह्यात्काराप्रमाणें वागून अंतरीं निर्गुण स्वरूप होणें, निर्गुण देवाशीं अनन्य होणें व हाच विचार दृढ करणें ह्यांतच समाधान आहे. देहींच विदेहपण भोगणें, करून कांहींच न करणें हें जीवन्मुक्ताचें लक्षण आहे व हें जीवन्मुक्तच जाणतो. संशय असेल त्यानें सद्गुरुवचनास मानावें व निःसंदेह व्हावें (२३–३४). [द० ६, स० ९]

प्रश्न—समाधान अनिर्वाच्य आहे, बोलून दाखविण्यासारखें नाहीं, तेथील गोडी सांगूं जातां वाणी मौनावते, अनुभवही सांगतां येत नाहीं, तो अगम्य आहे असें सर्वजण सांगतात. तर 'समाधान अनिर्वाच्य' आहे असें कां म्हणतात तें सांगा (१–५). **उत्तर**—परब्रह्म स्वरूप हेंच समाधानाचें स्थळ होय. स्वरूप हाच अनुभव. समाधान अनिर्वाच्य आहे, तें

प्रांजळ । बोलोन दाऊं ॥ ६ ॥ जें बोलास आकळेना । बोलल्याविण कळेना । जयासि कल्पितां कल्पना । हिंपुटी होये ॥ ७ ॥ तें जाणावें परब्रह्म । जें वेदांचें गुह्य परम । धरितां संतसमागम । सर्वहि कळे ॥ ८ ॥ तेंचि आतां सांगिजेल । जें समाधान सखोल । ऐक अनुभवाचे बोल । अनिर्वाच्य वस्तु ॥ ९ ॥ सांगतां नये तें सांगणें । गोडी कळाया गूळ देणें । ऐसें हें सद्गुरुविणें । होणार नाहीं ॥ १० ॥ सद्गुरुकृपा कळे त्यासी । जो शोधील आपणासी । पुढें कळे अनुभवासी । आपेंआप वस्तु ॥ ११ ॥ दृढ करूनियां बुद्धी । आधीं घ्यावी आपशुद्धी । तेणें लागे समाधी । अकस्मात ॥ १२ ॥ आपलें मूळ बरें शोधितां । आपली तों माईक वार्ता । पुढें वस्तुचि तत्वता । समाधान ॥ १३ ॥ आत्मा आहे सर्वसाक्षी । हें बोलिजे पूर्वपक्षीं । जो कोणी सिद्धांत लक्षी । तोचि सिद्ध ॥ १४ ॥ सिद्धांतवस्तु लक्षूं जातां । सर्वसाक्षिणी ते अवस्था । आत्मा तीहून पर्ता । अवस्थातीत ॥ १५ ॥ पदार्थज्ञान जेव्हां सरे । द्रष्टा द्रष्टेपणें नुरे । ते समईं फुंज उतरे । मीपणाचा ॥ १६ ॥ जेथें मुरालें मीपण । तेचि अनुभवाची खूण । अनिर्वाच्य समाधान । या कारणें बोलिजे ॥ १७ ॥ अत्यंत विचाराचे बोल । तरी ते माईक फोल । शब्द सबाह्य सखोल । अर्थचि अवघा ॥ १८ ॥ शब्दाकरितां कळे अर्थ । अर्थ पाहातां शब्द व्यर्थ । शब्द सांगे तें यथार्थ । परी आपण मिथ्या ॥ १९ ॥ शब्दाकरितां वस्तु भासे । वस्तु पाहातां शब्द नासे । शब्द फोल अर्थ असे । घनवटपणें ॥ २० ॥ भुसाकरितां धान्य निपजे । धान्य घेऊन भूंस टाकिजे । तैसें शब्द भूंस जाणिजे । अर्थ धान्य ॥ २१ ॥ पोंचटामधें घनवट । घनवटीं

वाचेनें सांगणें म्हणजे गोडी कळायला हातावर गुळाचा खडा ठेवण्यासारखें आहे खरें. समाधान बोलास आकळत नाहीं तरी बोलल्यावांचून कळतही नाहीं. तथापि हें काम ब्रह्मस्वरूप संतसद्गुरूच करूं जाणतात. सद्गुरुकृपा तरी कोणाला कळते म्हणून विचारशील तर निवांत ठायीं ‘ जो शोधील आपणासी ’ जो आपला आपण शोध घेईल त्यालाच कळेल. बाह्य विषयेंद्रियांपासून मनाचा निरोध करून आपल्या ठिकाणींच आपला शोध घ्यावा, ‘ तेणें लागे समाधी । अकस्मात् ’ आपला शोध घेऊं जातां आपली वार्ता मायिक आहे हें कळून येतें व शुद्ध स्वरूपच उरतें. स्वरूप हेंच समाधान. तेथें साक्षित्वही नाहीं. आत्मा सर्वसाक्षी आहे असें म्हणतात पण हें पूर्वपक्षांतलें बोलणें आहे. सर्वसाक्षी ही अवस्था आहे व परमात्मवस्तु तर अवस्थातीत आहे म्हणून ‘ सर्वसाक्षी ’ किंवा असलें कोणतेंच लक्षण वस्तूला लागत नाहीं. सर्वसाक्षित्व, अनुभव, यथार्थज्ञान, त्रिपुटी, वाणी, मन कशाचाही तेथें हात पोंचत नाहीं. जाणीव आटून जाते, द्रष्टा द्रष्टेपणानें उरत नाहीं, तेव्हांच ‘ मी ’ नाहींसा होतो. मीपण निःशेष मुरणें ही अनुभवाची खूण आहे. तेथें अनुभव देणें, सांगणें हें खोटें आहे, म्हणून समाधान अनिर्वाच्य आहे असें म्हणतात (६–१७). समाधान अनिर्वाच्य आहे असें म्हणायचें आणखी एक कारण असें आहे कीं सांगणें हें शब्दाचें काम आहे. शब्दापासून अर्थ कळतो, किंवा वस्तु भासते हें खरें असलें तरी शब्द हा मायिक फोल असल्यामुळें त्याची पोंच अर्थापर्यंत (परमात्मस्वरूपापर्यंत) जात नाहीं. भुंसापासून धान्य निघतें पण धान्य घेऊन भूंस टाकून देतात त्याप्रमाणें शब्दापासून अर्थ मिळतो पण अर्थ घेऊन शब्द सोडतात, शब्द बोलून राहतो, पण अर्थ शब्दापूर्वींच आहे म्हणून ‘ पोंचट ’

उडे पोंचट । तैसा शब्द हा फलगट । परब्रह्मीं ॥ २२ ॥ शब्द बोलोनि राहे ।
अर्थ शब्दापूर्वीच आहे । या कारणें न साहे । उपमा तया अर्थासी ॥ २३ ॥
भूंस सांडून कण घ्यावा । तैसा वाच्यांश त्यजावा । कण लक्ष्यांश लक्षावा ।
शुद्ध स्वानुभवें ॥ २४ ॥ दृश्यावेगळें बोलिजे । त्यासी वाच्यांश म्हणिजे ।
त्याचा अर्थ तो जाणिजे । शुद्ध लक्ष्यांश ॥ २५ ॥ ऐसा जो शुद्ध लक्ष्यांश ।
तोचि जाणावा पूर्वपक्ष । स्वानुभव तो अलक्ष । लक्षिला न वचे
॥ २६ ॥ जेथें गाळून सांडिलें नभा । जो अनुभवाचा गाभा ।
ऐसा तोही उभा । कल्पित केला ॥ २७ ॥ मिथ्या कल्पनेपासूनि जाला ।
खरेंपण कैंचें असेल त्याला । म्हणोन तेथें अनुभवाला । ठावचि नाहीं ॥ २८ ॥
दुजेविण अनुभव । हें बोलणेंचि वाव । याकारणें नाहीं ठाव । अनुभवासी
॥ २९ ॥ अनुभवें त्रिपुटी उपजे । अद्वैतीं द्वैतचि लाजे । म्हणोनि बोलणें
साजे । अनिर्वाच्य ॥ ३० ॥ दिवसरजनीचें परमित्य । करावया मूळ आदित्य
। तो आदित्य गेलियां उर्वरित । त्यासी काय म्हणावें ॥ ३१ ॥ शब्दमौन्याचा
विचार । व्हावया मूळ वोंकार । तो वोंकार गेलिया उच्चार । कैसा करावा
॥ ३२ ॥ अनुभव आणि अनुभविता । सकळ ये मायेचि करितां । ते माया
मुळीं नसतां । त्यासी काय म्हणावें ॥ ३३ ॥ वस्तु येक आपण येक । ऐसी
असती वेगळिक । तरी अनुभवाचा विवेक । बोलों येता सुखें ॥ ३४ ॥
वेगळेपणाचि माता । ते लटिके वंधेची सुता । म्हणोनियां अभिन्नता । मुळींच
आहे ॥ ३५ ॥ अजन्मा होता निजेला । तेणें स्वप्नीं स्वप्न देखला । सद्गुरूस

शब्द व ‘ घनवट ’ अर्थ ह्यांची बरोबरी होणार नाहीं. अत्यंत विचाराचे बोल असले तरी ते ‘ ब्रह्म दृश्यावेगळें आहे ’ एवढा वाच्यांश सांगून थांबतील. अर्थ म्हणजे वस्तु लक्ष्यांत आहे. तो तरी अनुभवानें कळेल कीं नाहीं असें म्हणशील तर हा अनुभवही त्रिपुटींतला (पूर्वपक्षांतला) असल्यामुळें तोही स्वानुभव लक्षीत नाहीं. लक्ष्यांशही पूर्वपक्षांतला म्हणण्याचें कारण असें आहे कीं स्वरूपाच्या ठिकाणीं वाच्यांश व लक्ष्यांश दोन्ही नाहींत म्हणून समाधान अलक्ष्य (व अनिर्वाच्य) आहे असेंच म्हटलें पाहिजे (१८–२६). आकाश अतिसूक्ष्म आहे व ब्रह्माचा बोध होण्यासाठीं त्याला आकाशाची उपमा देतात. पण ज्याला आकाशांतूनही गाळून घेतलें आहे, असें अनुभवरूप तरी ब्रह्मकल्पनेनेंच उभें केलें आहे! कल्पना वाढवीत वाढवीत खूप वाढविली तरी ती कल्पनाच ना ? कल्पना मुळीं मिथ्या मग कल्पनेनें उभा केलेला अनुभव खरा कोठून असणार ? अनुभव म्हटलें कीं द्वैत आलें ; अनुभव म्हटलें कीं अनुभविता, अनुभाव्य व अनुभव ही त्रिपुटी आली. हें द्वैत शुद्ध स्वरूपाच्या ठिकाणीं साजत नाहीं, अनुभव खालींच राहतो म्हणून स्वरूप अनिर्वाच्य आहे असें म्हणतात. दिवस व रात्र ही मर्यादा सूर्यामुळें करितां येते. पण सूर्य गेल्यावर बाकी काय उरतें ? शब्द व मौन हा विचार ओंकारामुळें झाला, पण ओंकार गेल्यावर उच्चार कसा होणार ? तात्पर्य, अनुभव – त्रिपुटींतला असल्यामुळें – मायेंतलाच आहे पण स्वरूपीं माया नसतां तो कोठें सांपडणार ? वस्तु व आपण ह्यांत जर वेगळीकच नाहीं तर समाधान बोलायचें कसें ? वेगळीक, भेद, द्वैतभाव मायेच्या पोटीं उत्पन्न झाला, ती माया वंध्येच्या मुलीप्रमाणें खटकी आहे. वस्तु व आपण ह्यांत ‘ अभिन्नता मुळींच आहे ’ म्हणून स्वरूपसमाधान बोलण्यांत येऊं शकत नाहीं. अत एव तें अनिर्वाच्य आहे (२७–३५).

शरण गेला। संसारदुःखें ॥ ३६ ॥ सद्गुरुकृपेस्तव। जाला संसार वाव। ज्ञान जालिया ठाव। पुसे अज्ञानाचा ॥ ३७ ॥ आहे तितुकें नाहीं जालें। नाहीं नाहींपणें निमालें। आहे नाहीं जाऊन उरलें। नसोन कांहीं ॥ ३८ ॥ शून्यत्वातीत शुद्धज्ञान। तेणें जालें समाधान। ऐक्यरूपें अभिन्न। सहजस्थिती ॥ ३९ ॥ अद्वैतनिरूपण होतां। निमाली द्वैताची वार्ता। ज्ञानचर्चा बोलों जातां। जागृती आली ॥ ४० ॥ श्रोतीं व्हावें सावधान। अर्थीं घालावें मन। खुणे पावतां समाधान। अंतरीं कळे ॥ ४१ ॥ तेणें जितुकें ज्ञान कथिलें। तितुकें स्वप्नावारीं गेलें। अनिर्वाच्य सुख उरलें। शब्दातीत ॥ ४२ ॥ तेथें शब्देंविण ऐक्यता। अनुभव ना अनुभविता। ऐसा निवांत तो मागुता। जागृती आला। ॥ ४३ ॥ तेणें स्वप्नीं स्वप्न देखिला। जागा होऊनि जागृती आला। तेथें शब्द कुंठित जाला। अंत नलगे ॥ ४४ ॥ या निरूपणाचें मूळ। केलेंचि करूं प्रांजळ। तेणें अंतरीं निवळ। समाधान कळे ॥ ४५ ॥ तंव शिष्यें विनविलें। जी हें आतां निरोपिलें। तें पाहिजे बोलिलें। मागुतें स्वामी ॥ ४६ ॥ मज कळाया कारण। केलेंचि करावें निरूपण। येथील जे कां निजखूण। ते मज निरोपावी ॥ ४७ ॥ अजन्मा तो सांग कवण। तेणें देखिला कैसा स्वप्न। तेथें कैसें निरूपण। बोलिलें आहे ॥ ४८ ॥ जाणोनी शिष्याचा आदर। स्वामी देती प्रत्युत्तर। तेचि आतां अतितत्पर। श्रोतीं येथें परिसावें

आतां स्वरूपाच्या ठिकाणीं जन्म, बंध, मोक्ष इ० कांहीं एक नाहीं, स्वरूप स्वयमेय समाधानरूप आहे हें एका कहाणीच्या रूपानें सांगतात. स्वरूप हें सहज अभिन्नत्वाचें आहेच आहे, त्याला सृष्टिसंसाराची दादही नाहीं. कोणी एक होता अजन्मा (कधींच जन्मास न आलेला). त्याला स्वप्नांत स्वप्न पडलें (संसाराला मी आलों हें पहिलें स्वप्न) संसाराला त्रासून गुरूला शरण गेलों व त्यांच्या बोधामुळें मुक्त झालों असें वाटलें (हें स्वप्नांतलें स्वप्न). तो बरळूं काय लागला कीं " मी संसारदुःखानें तप्त होऊन सद्गुरूला शरण गेलों, त्यांच्या उपदेशानें संसार वाव होऊन माझें अज्ञान गेलें, मी ज्ञानसंपन्न झालों. ' आहे तितुकें नाहीं जालें। नाहीं नाहींपणें निमालें। आहे नाहीं जाऊन उरलें। नसोन कांहीं ' जें पंचभौतिक दृश्य तें विवेकानें उडालें, जें नाहीं म्ह० शून्य-जेथून सर्व दृश्य उभारलें—तें नाहींपणानें नाहींसें झालें, ह्याप्रमाणें ' आहे ' आणि ' नाहीं ' हीं दोन्ही जाऊन जें उरलें तें शुद्ध स्वरूप, पण तें ' नसोन कांहीं ' म्ह० विशेषत्वानें कोठेंच नाहीं. अर्थात् तें अमुक प्रकारचें आहे किंवा अमुक प्रकारचें नाहीं असें वर्णव्यक्तिरूपानें त्याबद्दल कांहींच बोलतां येत नाहीं. तात्पर्य, तें आहे पण अनिर्वाच्य आहे. असें शून्याच्या पलीकडचें जें शुद्ध ज्ञान तें मला झालें, त्यामुळें समाधान झालें व ' ऐक्यरूपें अभिन्न सहजस्थितीला मी पावलों. ह्याप्रमाणें द्वैताची निद्रा जाऊन मी स्वरूपीं जागृत झालों (३६–४०). सूचना देतात कीं " बाबांनो ! समाधानाची काय जात आहे ती खुणेनें ओळखा. तो अजन्मा जितकें ज्ञान बोलला तितकें स्वप्नावारी गेलें ! तो अजन्मा ज्ञानजागृति, ऐक्यरूप, शून्यत्वातीत शुद्ध ज्ञान इ० अनुभवाचे बोल जरी बोलला तरी त्याची ही बडबड म्ह० स्वप्नांतलें स्वप्न होय. शब्दातीत अनिर्वाच्य सुख तें अजून वेगळेंच आहे ! तो अजन्मा वस्तुतः ' शब्दावीण ऐक्यता ' ' अनुभव ना अनुभविता ' असा अद्वैतस्वरूप असतांना त्यानें मी जागा झालों इ० जी कहाणी सांगितली ती फोल होय " (४१–४६). आतां ह्या समर्थांच्या बोलण्यांतलें जें वर्म ' जी निजखूण। ते मज अनुभवावी ' असें शिष्यानें विचारल्यावरून समर्थ विषयाचा उपसंहार करून ती कहाणी त्यालाच लावून दाखवितात. ' तूंच अजन्मा आहेस, बंधमोक्षातीत सहज

॥ ४९ ॥ ऐक शिष्या सावधान । अजन्मा तो तूंचि जाण । तुवां देखिला स्वप्नीं स्वप्न । तोही आतां सांगतों ॥ ५० ॥ स्वप्नीं स्वप्नाचा विचार । तो तूं जाण हा संसार । येथें तुवां सारासार । विचार केला ॥ ५१ ॥ रिघोनि सद्गुरूस शरण । काढून शुद्ध निरूपण । याची करिसी ऊणखूण । प्रत्यक्ष आतां ॥ ५२ ॥ याचाचि घेतां अनुभव । बोलणें तितुकें होतें वाव । निवांत विश्रांतीचा ठाव । ते तूं जाण जागृती ॥ ५३ ॥ ज्ञानगोष्टीचा गल्बला । सरोन अर्थ प्रगटला । याचा विचार पाहतां आला । पुन्हां जागृती ॥ ५४ ॥ तुज वाटे हे जागृती । मज जाली अनुभवप्राप्ती । या नांव केवळ भ्रांती । फिटलीच नाहीं ॥ ५५ ॥ अनुभव अनुभवीं विराला । अनुभवेंविण अनुभव आला । हाही स्वप्नींचा चेईला । नाहींस बापा ॥ ५६ ॥ जागा जालियां स्वप्नउर्मी । स्वप्नीं म्हणे अजन्मा तो मी । जागेपणें स्वप्नउर्मी । गेलीच नाहीं ॥ ५७ ॥ स्वप्नीं वाटे जागेपण । तैसी अनुभवाची खूण । आली परी तें सत्य स्वप्न । भ्रमरूप ॥ ५८ ॥ जागृती यापैलीकडे । तें सांगणें केंवि घडे । जेथें धारणाचि मोडे । विवेकाची ॥ ५९ ॥ म्हणोनि तें समाधान । बोलतांचि नये ऐसें जाण । निशब्दाची ऐसी खूण । वोळखावी ॥ ६० ॥ ऐसें आहे समाधान । बोलतांच नये जाण । इतुकेन बाणली खूण । निशब्दाची ॥ ६१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अनिर्वाच्यनाम समास दशम ॥ १० ॥

स्वरूप आहेस. आतां कहाणी सांगितली ती तुझीच आहे ! प्राण्याला तहान लागावी त्याप्रमाणें तुला संसाराचें स्वप्न पडलें आहे व गुरूला शरण जात आहेस, शुद्ध निरूपणाची प्रत्यक्ष चर्चा करीत आहेस, निवांत विश्रांतीचा ठाव मिळाला, मी जागृत झालों असें बोलत आहेस ! तुला वाटते ही जागृति ! पण अजून ही भ्रांतिच आहे, अजून चेइला नाहींस बापा ! ' जोंपर्यंत तूं अनुभवाची खूण सांगतोस, मला जागृति आली असें म्हणतोस, तोंपर्यंत तूं स्वप्नांत आहेस, तुझी भ्रांति गेली नाहीं असेंच आम्ही म्हणणार ! तुझी ही जागृति भ्रमरूप स्वप्नांतली आहे. ' मी मौनी आहें ' असें कोणी म्हणत आहे तोंवर तो खरा ' मौनी ' नव्हे, तसा ' मी अनुभवरूप आहें, मी जागृत आहें ' असें तूं म्हणत आहेस तोंपर्यंत तूं जागृत नाहींस. ' जागृती या पैलीकडे । तें सांगणें केंवि घडे ? । जेथें धारणाचि मोडे । विवेकाची. ' निःशब्दाची ही खूण दाखविली. समाधान बोलतांच येत नाहीं, तें अनिर्वाच्य आहे (४७-६१). [द० ६, स० १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ दशक सातवा चतुर्दश ब्रह्म नाम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ विद्यावंतांचा पूर्वजु । मत्ताननु येकद्विजु । त्रिनयेन चतुर्भुजु। फरशपाणी ॥ १ ॥ कुबेरापासूनि अर्थ । वेदापासून परमार्थ । लक्ष्मीपासून समर्थ । भाग्यासि आले ॥ २ ॥ तैशा मंगळमूर्ती आद्या-। पासूनि जाल्या सकळ विद्या । तेणें कवी लाघव गद्या । सत्पात्र जाले ॥ ३ ॥ जैसीं समर्थाचीं लेंकुरें । नाना आळंकारीं सुंदरें । मूळपुरुषाचेनि द्वारें । तैसे कवी ॥ ४ ॥ नमूं ऐसिया गणेंद्रा । विद्याप्रकाशें पूर्णचंद्रा । जयाचेनि बोधसमुद्रा । भरितें दाटे बळें ॥ ५ ॥ जो कर्तृत्वास आरंभ । मूळपुरुष मुळारंभ । जो परात्पर स्वयंभ । आदिअंतीं ॥ ६ ॥ तयापासून प्रमदा । इच्छाकुमारी शारदा । आदित्यापासून गोदा । मृगजळ वाहे ॥ ७ ॥ जे मिथ्या म्हणतांच गोवी । माईकपणें लाघवी । वक्तयास वेढा लावी । वेगळेपणें ॥ ८ ॥ जे द्वैताची जननी । किं ते अद्वैताची खाणी । मूळमाया गवसणी । अनंत ब्रह्मांडांची ॥ ९ ॥ कीं ते औदंबरी वल्ली । अनंत ब्रह्मांडीं

गणेश विद्यावंतांचा (ज्ञात्यांचा) पूर्वज (आद्यज्ञाता, ज्ञानस्वरूप) आहे. तो गजमुख, एकदंत, चतुर्भुज व परशुपाणि आहे. कुबेरापासून धन, वेदांपासून परमार्थ, लक्ष्मीपासून धनिक त्याप्रमाणें मूळपुरुष जो गणेश त्यापासून सकल विद्या प्रसृत झाल्या, गद्यपद्यकौशल्य जनांत प्रगट झालें. श्रीमंत पितरांच्या उदरीं जन्म घेतल्यानें लेकरांच्या अंगांवर उत्कृष्ट अलंकार पडतात, त्याप्रमाणें ह्या मूळपुरुषाच्या कृपेनें प्रासादिक कवींच्या वाणींत प्रतिभा–प्रेम–प्रसादादि गुण प्रगट होतात. विद्येचा प्रकाश विश्वावर पाडणारा पूर्णचंद्र गणेशच होय. त्याच्या उदयाबरोबर बोधसमुद्राला भरती येते. हा मूळपुरुष सकल कर्तृत्वाचा आरंभ होय. (तेथून विश्वघटनेचें कार्य सुरू झालें). हा सर्वांच्या पलीकडचा स्वयंभु आहे. अशा गणेशाला वंदन असो (१–६). त्याला इच्छा (स्फूर्ति) झाली तिलाच कुमारी शारदा हें नांव मिळालें. सूर्यापासून मृगजळाची नदी वाहते, तशी ती ब्रह्मापासून झाली (सत्यस्वरूप सूर्याच्या योगानें मिथ्या मृगजळ दिसतें त्याप्रमाणें ब्रह्माच्या अधिष्ठानावरून गणेशशारदारूप मूळ माया मिथ्याच आहे). तिला मिथ्या म्हणतांच ती पाशांत गोवते, ती मायिक असून मोठी लाघवी आहे. कोणी ब्रह्मनिरूपण करूं लागला कीं ती त्याला वेगळा पाडून गोवते. ती द्वैत उभें करिते आणि तिच्याच योगानें द्वैतनिरसन होऊन अद्वैतलाभ होतो. अशी ही मूळमाया अनंत ब्रह्मांडांना आपल्या उदरांत घेते. तिच्या पवित्रपणास्तव तिला औदुंबरी वल्ली म्हणावेंसें वाटतें. ह्या विशाळ वल्लीला अनंत ब्रह्मांडांचीं फळें लगटलीं आहेत. ती ‘ मूळपुरुषाची माउली । दुहितारूपें ’ आहे (मूळमाया ही निश्चळ ब्रह्माला पुरुषरूप देते म्हणून त्याची माउली आहे व ब्रह्मापासून स्फूर्तिरूपानें ती प्रगटते म्हणून त्याची दुहिता आहे. ती पुरुषाची आई आहे व कन्याही आहे. तिच्यामुळें ब्रह्म पुरुषनामाला (गणेश) आलें म्हणून ती त्याची आई व ब्रह्माची ती स्फूर्ति म्हणून कन्या.) इतकें असून मूळपुरुषाची ती भार्याही (सत्ता, शक्ति)

लगडली । मूळपुरुषाची माउली । दुहितारूपें ॥ १० ॥ ऐसी वंदूं वेदमाता । आदिपुरुषाची जे सत्ता । आतां आठवीन समर्था । सद्गुरूसी ॥ ११ ॥ जयाचेनि कृपादृष्टी । होये आनंदाची वृष्टि । तेणें सुखें सर्व सृष्टि । आनंदमय ॥ १२ ॥ कीं तो आनंदाचा जनक । सायुज्यमुक्तीचा नायक । कैवल्यपददायक । अनाथबंधु ॥ १३ ॥ मुमुक्षुचातकीं सुस्वर । करुणा पाहिजे अंबर । वोळे कृपेचा जळधर । साधकांवरी ॥ १४ ॥ कीं तें भवार्णवींचें तारूं । बोधें पाववी पैलपारू । महाआवर्ती आधारु । भाविकांसी होय ॥ १५ ॥ कीं तो काळाचा नियंता । नातरी संकटीं सोडविता । कीं ते भाविकांची माता । परम स्नेहाळु ॥ १६ ॥ कीं जो परत्रींचा आधार । कीं ते विश्रांतीची थार । नांतरी सुखाचें माहेर । सुखस्वरूप ॥ १७ ॥ ऐसा सद्गुरु पूर्णपणीं । तुटे भेदाची कडसणी । देहाविण लोटांगणी । तया प्रभूसी ॥ १८ ॥ साधु संत आणी सज्जन । वंदूनियां श्रोतेजन । आतां कथानुसंधान । सावध ऐका ॥ १९ ॥ संसार हाचि दीर्घ स्वप्न । लोभें वोसणती जन । माझी कांता माझें धन । कन्यापुत्र माझे ॥ २० ॥ ज्ञानसूर्य मावळला । तेणें प्रकाश लोपला । अंधकारें पूर्ण जाला । ब्रह्मगोळ अवघा ॥ २१ ॥ नाहीं सत्वाचें चांदणें । कांहीं मार्ग दिसे जेणें । सर्व भ्रांतीचेनि गुणें । आपेंआप न दिसे ॥ २२ ॥ देहबुद्धिअहंकारें । निजेले घोरति घोरें । दुःखें आक्रंदती थोरें । विषयसुखाकारणें ॥ २३ ॥ निजेले असतांच मेले । पुन्हां उपजतांच निजेले । ऐसे आले आणी गेले । बहुत लोक ॥ २४ ॥ निद्सुरेपणेंचि सैरा । बहुतीं केल्या येरझारा । नेणोनियां परमेश्वरा । भोगिले कष्ट ॥ २५ ॥ तया कष्टाचें निरसन । व्हावया पाहिजे

आहे ! त्याच्यावांचून ती नाहीं व तिच्यावांचून तो नाहीं. असे उभयतां अन्योन्याश्रयी पण अभिन्न आहेत (७–११). आतां स्वस्वरूपभूत सद्गुरूला वंदन करितों. त्याच्या कृपेनें सर्व सृष्टि आनंदमय व सुखी आहे. आनंदाचा जनक, सायुज्य-मुक्तीचा नायक, कैवल्यपदाचा दाता व अनाथांचा बंधु श्रीगुरु आहे. मुमुक्षुचातकानें दोन सुस्वर शब्दांनीं आळविलें असतां करुणामेघश्याम असे श्रीगुरु साधकांवर कृपेची वृष्टि करितात. श्रीगुरु हें भवसागरांतलें तारूं असून बोधानें पैलपार पाववितात, मोठमोठ्या भोंवऱ्यांत ते भाविकांना आधारभूत आहेत. काळाचें नियमन करणारे (मृत्युभय उडविणारे), संकटांत सोडविणारे श्रीगुरु ही भाविकांची परमदयाळु माता आहे. परलोकचा आधार व विश्रांतीचें स्थान असे सद्गुरु सुखाचें सुखस्वरूप माहेर आहेत. सद्गुरुकृपेनें भेदभाव मावळतो. त्या श्रीसद्गुरूंच्या चरणीं देहावीण (देहबुद्धि, भेदभावना) सोडून लोटांगण घालतों (१२–१८). साधुसंत व श्रोते ह्यांना वंदन करितों (१९). संसाररूप दीर्घस्वप्नांत जडजीव ' माझी कांता, माझें धन, माझे पुत्र ' इ० प्रकारें बरळत असतात. ज्ञानरवि अस्तास गेला असतां प्रकाश जाऊन व अंधकारानें ब्रह्मांड व्यापलें जाऊन कांहीं मार्ग दाखविणारें सत्त्वगुणांचें चांदणेंही दिसत नाहीं व ह्या भ्रांतीमुळें आपलें स्वरूप आपणांसच दिसेनासें झालें आहे. देहात्मबुद्धीच्या अहंकारानें घोरत पडलेले जीव दुःखानें विषयसुखासाठीं ओरडत आहेत. मायानिद्रेंत असतांच ते मरतात, पुन्हा जन्मतांच निजतात, सारा प्रपंच मायेच्या निद्रेंतच करितात. याप्रमाणें निद्रेंतच बहुत जन्म घेतात व परमेश्वराला न जाणल्यामुळें कष्ट भोगतात. त्या कष्टांचें निरसन होण्यास आत्मज्ञान पाहिजे, व त्यासाठींच हा अध्यात्मग्रंथ

आत्मज्ञान । म्हणोनि हें निरूपण । अध्यात्मग्रंथ ॥ २६ ॥ सकळ विद्येमध्यें सार । अध्यात्मविद्येचा विचार । दशमोध्यायीं सारंगधर । भगवद्गीतेंसि बोलिला ॥ २७ ॥

॥ श्लोक ॥ अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ॥

याकारणें अद्वैतग्रंथ । आत्मविद्येचा परमार्थ । पाहावया तोचि समर्थ । जो सर्वांगें श्रोता ॥ २८ ॥ जयाचें चंचळ हृदय । तेणें ग्रंथ सोडूंचि नये । सोडितां अलभ्य होय । अर्थ येथीचा ॥ २९ ॥ जयास जोडला परमार्थ । तेणें पाहावा हा ग्रंथ । अर्थ शोधितां परमार्थ । निश्चयें बाणे ॥ ३० ॥ जयासि नाहीं परमार्थ । तयासि न कळे येथींचा अर्थ । नेत्रेंविण निधानस्वार्थ । अंधासी कळेना ॥ ३१ ॥ येक म्हणती मऱ्हाटें काये । हें तों भल्यांसि ऐकों नये । तीं मूर्खें नेणती सोये । अर्थान्वयाची ॥ ३२ ॥ लोहाची मांदुस केली । नाना रत्नें साठविलीं । ते अभाग्यानें त्यागिलीं । लोखंड म्हणोनी ॥ ३३ ॥ तैसी भाषा प्राकृत । अर्थ वेदांत आणि सिद्धांत । नेणोनि त्यागी भ्रांत । मंद-बुद्धिस्तव ॥ ३४ ॥ आहाच सांपडतां धन । त्याग करणें मूर्खपण । द्रव्य घ्यावें सांठवण । पाहोंचि नये ॥ ३५ ॥ परिस देखिला आंगणीं । मार्गीं पडिला चिंतामणी । आव्हावेल महागुणी । कूपांमध्यें ॥ ३६ ॥ तैसें प्राकृतीं अद्वैत । सुगम आणी सप्रचित । अध्यात्म लाभे अकस्मात । तरी अवश्य घ्यावें ॥ ३७ ॥ न करितां व्युत्पत्तीचा श्रम । सकळ शास्त्रार्थ होये सुगम । सत्समागमाचें वर्म । तें हें ऐसें असे ॥ ३८ ॥ जें व्युत्पत्तीनें न कळे । तें सत्समागमें कळे । सकळ शास्त्रार्थ आकळे । स्वानुभवासी ॥ ३९ ॥ म्हणोनि कारण सत्समागम । तेथें

निरूपिला आहे (२०–२६). सर्व विद्यांत अध्यात्मविद्या सारभूत आहे असें भगवान् गीतेंत बोलले आहेत. अध्यात्म-विद्यारहस्य अध्यात्मग्रंथांत सांगितलेलें आकलण्यास तोच समर्थ आहे कीं जो सर्वांगांचे कान करून ऐकूं शकतो. ज्याचें चित्त चंचळ आहे त्यानें हा ग्रंथ वाचावयास उघडूंच नये, त्याला येथील रहस्य उमगणार नाहीं, ज्याला परमार्थ जोडला असेल त्यानें ' दृढतेकारणें ' हा ग्रंथ पहावा, तो ह्याचें मनन करील तर परमार्थ त्याच्या हृदयांत निश्चयानें बाणेल. ज्याला परमार्थाची आस्था नाहीं त्याला डोळ्यांवांचून आंधळ्यास जसें निधान सांपडत नाहीं, त्याप्रमाणें येथील रहस्य उमगणार नाहीं (२७–३१). कोणी हा ग्रंथ मराठीभाषेंत लिहिलेला ह्यास्तवच नाक मुरडतील, त्या मूर्खांना अर्थसंबंध कांहींच कळत नाहीं. लोखंडाची पेटी, तींत सुंदर रत्नें सांठविलेलीं असलीं तरी, करंट्यावांचून कोण टाकील? त्याप्रमाणें वेदांताचे अंतिम सिद्धांत ज्यांत स्पष्ट सांगितले आहेत असा अध्यात्मग्रंथ—तो केवळ प्राकृत आहे म्हणून—कोणी जडात्माच अव्हेरील. सहजासहजत्या (आहाच) धन मिळालें तर घ्यावें, सांठवण (ठेवावयाची पेटी वगैरे) कशाची आहे याचा विचार करूं नये. अंगणांत परीस सांपडला, किंवा वाटेंत चिंतामणि आढळला, अगर दक्षिणावर्ती वेल (आव्हावेल) कूपांत दिसला तर जसा अवश्य घ्यावा त्याप्रमाणें प्राकृत भाषेंत सुगम आणि सप्रचीत अध्यात्मविवरणाचा अद्वैत ग्रंथही अवश्य घ्यावा. व्युत्पत्तीचे श्रम न करितां सकल शास्त्ररहस्य जर अनायासें हातीं येत असेल तर सत्संगासारखाच त्याचा आदर करावा. जें व्युत्पत्तीनें कळत नाहीं तें सत्संगानें कळतें, ज्ञानरहस्य स्वानुभवास येतें. म्हणून साधनांचें मूळ सत्समागम आहे. जन्मसाफल्याचें वर्म सत्संगांतच

नलगे व्युत्पत्तीश्रम । जन्मसार्थकाचें वर्म । वेगळेंचि आहे ।। ४० ।।

।। श्लोक ।। भाषाभेदाश्च वर्तन्ते ह्यर्थ एको न संशयः । पात्रद्वये यथा खाद्यं स्वादभेदो न विद्यते ।। १ ।।

भाषापालटें कांहीं । अर्थ वायां जात नाहीं । कार्यसिद्धि ते सर्वही । अर्थाचपासीं ।। ४१ ।। तथापि प्राकृताकरितां । संस्कृताची सार्थकता । येऱ्हवीं त्या गुप्तार्था । कोण जाणे ।। ४२ ।। आतां असो हें बोलणें । भाषा त्यागूनि अर्थ घेणें । उत्तम घेऊनि त्याग करणें । साली टरफलांचा ।।४३।। अर्थ सार भाषा पोंचट । अभिमानें करावी खटपट । नाना अहंतेनें वाट । रुधली मोक्षाची ।। ४४ ।। शोध घेतां लक्ष्यांशाचा । तेथें आधीं वाच्यांश कैंचा । अगाध महिमा भगवंताचा । कळला पाहिजे ।। ४५ ।। मुकेपणाचें बोलणें । हें जयाचें तोचि जाणें । स्वानुभवाचिये खुणे । स्वानुभवी पाहिजे ।। ४६ ।। अर्थ जाणे अध्यात्माचा । ऐसा श्रोता मिळेल कैंचा । जयासी बोलतां वाचेचा । हव्यासचि पुरे ।। ४७ ।। परीक्षवंतांपुढें रत्न । ठेवितां होय समाधान । तैसें ज्ञानियांपुढें ज्ञान । बोलावें वाटे ।। ४८ ।। मायाजाळें दुश्चीत होये । तें निरूपणीं कामा न ये । संसारिकां कळे काय । अर्थ येथींचा ।। ४९ ।।

।। श्लोक ।। व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन । बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्ययसायिनाम् ।। १ ।।

वेवसाईं जों मळिण । त्यासी न कळे निरूपण । येथें पाहिजे सावधपण । अतिशयेंसीं ।। ५० ।। नाना रत्नें नाना नाणीं । दुश्चीतपणें घेतां हानी । परीक्षा नेणतां प्राणी । ठकला तेथें ।। ५१ ।। तैसें निरूपणीं जाणा । आहाच पाहातां कळेना । मऱ्हाटेंचि उमजेना । कांहीं केल्या ।। ५२ ।। जेथें निरूपणाचे बोल । आणी अनुभवाची वोल । तें संस्कृतापरीस खोल । अध्यात्मश्रवण ।।५३।। मायाब्रह्म वोळखावें । तयासी अध्यात्म म्हणावें । तरी तें मायेचें जाणावें ।

समजतें. हें वर्म भाषाभेद झाला तरी पालटत नाहीं. कार्यसिद्धी तर अर्थानेंच होते. प्राकृत आहे म्हणून संस्कृतभाषेची थोरवी, नाहीं तर त्या गुप्तार्थाकडे कोणीं पाहिलें असतें ? तात्पर्य, भाषेचा विचार गौण आहे, अर्थ मुख्य आहे, आंतला गीर घेऊन बाहेरचीं टरफलें टाकून द्यावींत. भाषा पोंचट. अर्थ सार. भाषेचा अभिमान मोक्षमार्गाच्या आड येणारा म्हणून सोडावा. अर्थाकडे जर जायचें आहे तर शब्दांकडे पाहून कर्तव्य काय ? भगवंताचा महिमा हा लक्ष्यार्थ आहे. मौनाची भाषा ज्याची त्यालाच कळते, स्वानुभवाची खूण स्वानुभवीच पावतो (३२–४६). अध्यात्मग्रंथाचें निरूपण ऐकून अर्थाला झोंबेल असा श्रोता दुर्मिळ आहे. असा कोणी भेटला तर वक्त्याची बोलण्याची हौस पुरी होते. रत्नपारख्यापुढें परीक्षणार्थ रत्न ठेवण्यांत जो आनंद आहे तसाच ज्ञात्यापुढें ज्ञान सांगण्यांत आहे. मायाजाळीं अडकून दुश्चित्त झालेल्या संसारिकांस येथील रहस्य काय कळणार ? ज्याची बुद्धि अव्यवसायी आहे, प्रपंचव्यवसायाच्या योगानें मलिन झाली आहे त्याला हें अध्यात्मनिरूपण कळायचें नाहीं, येथें तर अत्यंत सावधानता पाहिजे. सोन्यानाण्यांची परीक्षा करितांना प्राणी दुश्चित्त असेल तर फसेल, तसें निरूपण वरवर ऐकणाऱ्यास मराठींत सोपें करून सांगितलें तरी समजणार नाहीं. जेथें गहन विषय असून अनुभवाचें प्रचीतीचें बोलणें आहे तें समजणें संस्कृतभाषा समजण्यापेक्षांही कठीण आहे. त्याला श्रोता परमार्थी व सावचित्तच पाहिजे (४७–५३). मायाब्रह्म ओळखणें याचें नांव अध्यात्म. ब्रह्माची खूण पटण्यापूर्वीं मायेचें रूप कळलें

स्वरूप आधीं ॥५४॥ माया सगुण साकार । माया सर्वस्व विकार । माया जाणिजे विस्तार । पंचभूतांचा ॥ ५५ ॥ माया दृश्य दृष्टीस दिसे । मायाभास मनासि भासे । माया क्षणभंगुर नासे । विवेकें पाहातां ॥५६॥ माया अनेक विश्वरूप । माया विष्णूचें स्वरूप । मायेची सीमा अमूप । बोलिजे तितुकी थोडी ॥५७॥ माया बहुरूपी बहुरंग । माया ईश्वराचा संग । माया पाहातां अभंग । अज्ञानासी ॥ ५८ ॥ माया सृष्टीची रचना । माया आपुली कल्पना । माया तोडितां तुटेना । ज्ञानेंविण ॥ ५९ ॥ ऐसी माया निरोपिली । स्वल्प संकेतें बोलिली । पुढें वृत्ति सावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ ६० ॥ पुढें ब्रह्मनिरोपण । निरोपिलें ब्रह्मज्ञान । जेणें तुटे मायाभान । येकसरें ॥ ६२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मंगळाचरणनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ ब्रह्म निर्गुण निराकार । ब्रह्म निःसंग निर्विकार । ब्रह्मासि नाहीं पारावार । बोलती साधु ॥ १ ॥ ब्रह्म सर्वांसी व्यापक । ब्रह्म अनेकीं येक । ब्रह्म शाश्वत हा विवेक । बोलिला शास्त्रीं ॥ २ ॥ ब्रह्म अच्युत अनंत । ब्रह्म सदोदित संत । ब्रह्म कल्पनेरहित । निर्विकल्प ॥ ३ ॥ ब्रह्म या दृश्यावेगळें । ब्रह्म सुन्यत्वासी निराळें । ब्रह्म इंद्रियांच्या मेळें । चोजवेना ॥ ४ ॥ ब्रह्म दृष्टीस दिसेना । ब्रह्म मूर्खासी असेना । ब्रह्म साधुविण येना । अनुभवासी ॥ ५ ॥ ब्रह्म सकळांहूनि थोर । ब्रह्मा ऐसें नाहीं सार । ब्रह्म सूक्ष्म अगोचर । ब्रह्मादिकांसी ॥ ६ ॥ ब्रह्म शब्दीं ऐसें तैसें । बोलिजे त्याहूनि अनारिसें । परी तें श्रवणअभ्यासें । पाविजे ब्रह्म ॥ ७ ॥ ब्रह्मास नामें अनंत । परी तें ब्रह्म नामातीत । ब्रह्मास हेतदृष्टांत । देतां न शोभती ॥ ८ ॥

पाहिजे. माया सगुण, साकार, सविकार, पंचभौतिक. माया दृश्य–डोळ्यांस दिसते व मनास भासते. माया नश्वर असून विवेकदृष्टीनें पाहतां तिचा निरास होतो. माया अनेक म्ह. नानात्व पावणारी व विश्वरूप. 'माया विष्णूचें स्वरूप' व्यापक निस्सीम (मायोपाधीमुळें शुद्ध ब्रह्म सगुण होतें). माया बहुरूपी बहुगुणी 'माया ईश्वराचा संग,' माया दैवी-'मम माया'-मायेचा निरास होणें शक्यच नाहीं असें अज्ञ जीवांस वाटतें. माया सृष्टिरूपानें व्यक्त. माया म्हणजे आपुली कल्पना-स्वस्वरूपाच्या ठिकाणीं उठलेला संकल्प, आदिकल्पना. अशा या मायेचा निरास आत्मज्ञानाशिवाय होत नाहीं. हें मायेचें संक्षिप्त वर्णन झालें. ब्रह्मज्ञानानें मायाभान एकदम नाहींसें होतें, तें ब्रह्मनिरूपण पुढें करूं (५४–६१). [द० ७, स० १]

ब्रह्म कसें आहे ? ब्रह्म निर्गुण, निराकार, ब्रह्म निःसंग, निर्विकार, ब्रह्म व्यापक, ब्रह्म अनेकीं एक, ब्रह्म शाश्वत, अच्युत, अनंत निर्विकल्प 'ब्रह्म दृश्य प्रकृतीपलीकडचें आहे पण शून्य नव्हे.' इंद्रियांच्या द्वारें कळत नाहीं, ब्रह्म सूक्ष्म अगोचर ब्रह्मादिकांसी ! शब्दांनीं कोठवर सांगावें ! शब्दांनीं जितकें सांगावें त्याच्या तें पलीकडेच आहे. मग तें पावायचें कशानें? शब्दांनींच ! 'श्रवण अभ्यासें ! पाविजे ब्रह्म !' ब्रह्म मनाला व वाचेला अगोचर आहे. मन म्हणजे कल्पना व ब्रह्म

ब्रह्मासारिखें दुसरें । पाहातां काय आहे खरें । ब्रह्म दृष्टांत उत्तरें । कदा न साहे

॥ श्रुति ॥ यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ॥

॥ ९ ॥ जेथें वाचा निवर्तती । मनासी नाहीं ब्रह्मप्राप्ती । ऐसी बोलिली श्रुती । सिद्धांतवचन ॥ १० ॥ कल्पनारूप मन पाहीं । ब्रह्मीं कल्पनाचि नाहीं । म्हणोनि वाक्य कांहीं । अन्यथा नव्हे ॥ ११ ॥ आतां मनासि जें अप्राप्त । तें कैसें होईल प्राप्त । ऐसें म्हणाल तरी कृत्य । सद्गुरुविण नाहीं ॥ १२ ॥ भांडारगृहें भरलीं । परी असती आडकिलीं । हातास न येतां किली । सर्वही अप्राप्त ॥ १३ ॥ तरी ते किली ते कवण । मज करावी निरूपण । ऐसा श्रोता पुसे खूण । वक्तयासी ॥ १४ ॥ सद्गुरुकृपा तेचि किली । जेणें बुद्धि प्रकाशली । द्वैतकपाटें उघडलीं । येकसरीं ॥ १५ ॥ तेथें सुख असे वाड । नाहीं मनासी पवाड । मनेंविण कैवाड । साधनाचा ॥ १६ ॥ त्याची मनेंविण प्राप्ती । कीं वासनेविण तृप्ती । तेथें न चले व्युत्पत्ती । कल्पनेची ॥ १७ ॥ तें परेहूनि पर । मनबुद्धी अगोचर । संग सोडितां सत्वर । पाविजेतें ॥१८॥ संग सोडावा आपुला । मग पाहावें तयाला । अनुभवी तो या बोला । सुखावेल गा ॥ १९ ॥ आपण म्हणिजे मीपण । मीपण म्हणिजे जीवपण । जीवपण म्हणिजे अज्ञान । संग जडला ॥ २० ॥ सोडितां तया संगासी । ऐक्य होय निःसंगासी । कल्पनेविण प्राप्तीसी । अधिकार ऐसा ॥ २१ ॥ मी कोण ऐसें नेणिजे । तया नांव अज्ञान बोलिजे । अज्ञान गेलियां पाविजे । परब्रह्म तें ॥ २२ ॥ देहबुद्धीचें थोरपण । परब्रह्मीं न चले जाण । तेथें होतसे निर्वाण । अहंभावासी ॥ २३ ॥ उंच नीच नाहीं परी । राया रंका येकचि सरी । जाला पुरुष अथवा नारी । येकचि पद ॥ २४ ॥ ब्राह्मणाचें ब्रह्म तें सोंवळें । शूद्राचें ब्रह्म तें वोवळें । ऐसें वेगळें आगळें । तेथें असेचिना ॥ २५ ॥ उंच ब्रह्म तें रायासी । नीच ब्रह्म

निर्विकल्प. भांडारगृहाची किल्ली हातांत आली पाहिजे तरच त्याचा अनुभव होतो. ती किल्ली कोणती ? 'सद्गुरुकृपा तेचि किली' ती हस्तगत होतांच बुद्धि प्रकाशरूप होते व द्वैताचीं कपाटें खाडखाड उघडतात. ब्रह्मसुख अपार आहे, तेथें मनाचा प्रवेश नाहीं, तें साध्य व्हावयास जे प्रयास लागतात त्यांत मनाचा संबंध नाहीं. मनाच्या साह्यावांचून त्याची प्राप्ति होते, कोणतीच वासना नसून तेथें तृप्तीचें सुख आहे, कल्पनेच्या शाब्दज्ञानाची तेथें गति नाहीं. तें परावाणीच्या पलीकडे आहे, मनबुद्धींना तें आकळतां येत नाहीं, संग सोडतांच तात्काळ प्राप्त होतें (१–१८). ब्रह्मप्राप्तीच्या आड आला आहे मीपणाचा संग. मीपण म्ह. जीवपण म्ह. अज्ञान—त्याचा संग सोडावा. 'मी' सोडून त्याला पहावें. ज्याला अनुभव आहे तो हे बोल ऐकून डोलेल. मीपणाचा संग सोडला म्ह. निसंग वस्तूशीं ऐक्य होतें. देहबुद्धीच्या मोठेपणाची तेथें प्रतिष्ठा नाहीं (१९–२३). उंचनीच, रावरंक, स्त्रीपुरुष सकळांस मिळून एकच ब्रह्म आहे. ब्राह्मणाचें ब्रह्म सोवळें व शूद्राचें ब्रह्म ओवळें असा भेदभाव ब्रह्मीं नाहीं. राजाचें ब्रह्म उंच कोटीचें व त्याच्या नोकरचाकरांचें ब्रह्म नीच कोटीचें नाहीं. सर्वांचें

तें परिवारासी । ऐसा भेद तयापासीं । मुळिंच नाहीं ॥ २६ ॥ सकळांसी मिळोन ब्रह्म येक । तेथें नाहीं हे अनेक । रंक अथवा ब्रह्मादिक । तेथेंचि जाती ॥ २७ ॥ स्वर्ग मृत्यु आणि पाताळ । तिहीं लोकींचे ज्ञाते सकळ । सकळांसि मिळोन येकचि स्थळ । विश्रांतीचें ॥ २८ ॥ गुरुशिष्या येकचि पद । तेथें नाहीं भेदाभेद । परी या देहाचा समंध । तोडिला पाहिजे ॥ २९ ॥ देहबुद्धीचा अंतीं । सकळांसी येकचि प्राप्ती । येक ब्रह्म द्वितीयं नास्ति । हें श्रुतिवचन ॥ ३० ॥ साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपीं मिळाले । अवघे मिळोन येकचि जाले । देहातीत वस्तु ॥ ३१ ॥ ब्रह्म नाहीं नवें जुनें । ब्रह्म नाहीं अधिक उणें । उणें भाविल तें सुणें । देहबुद्धीचें ॥ ३२ ॥ देहबुद्धीचा संशयो । करी समाधानाचा क्षयो । चुके समाधानसमयो । देहबुद्धियोगें ॥३३॥ देहाचें जें थोरपण । तेंचि देहबुद्धीचें लक्षण । मिथ्या जाणोनि विचक्षण । निंदिती देहो ॥ ३४ ॥ देह पावे जंवरी मरण । तंवरी धरी देहाभिमान । पुन्हा दाखवी पुनरागमन । देहबुद्धि मागुती ॥ ३५ ॥ देहाचेनि थोरपणें । समाधानासी आलें उणें । देह पडेल कोण्या गुणें । हेंहि कळेना ॥ ३६ ॥ हित आहे देहातीत । म्हणोनि निरोपिती संत । देहबुद्धीनें अनहित । होंचि लागे ॥ ३७ ॥ सामर्थ्यबळें देहबुद्धी । योगीयांस तेही बाधी । देहबुद्धीची उपाधी । पैसावों लागे ॥ ३८ ॥ म्हणोनि देहबुद्धि हे झडे । तरीच परमार्थ घडे । देहबुद्धीनें विघडे । ऐक्यता ब्रह्मींची ॥ ३९ ॥ विवेक वस्तूकडे वोढी । देहबुद्धि तेथूनि पाडी । अहंता लाऊन निवडी । वेगळेपणें ॥ ४० ॥ विचक्षणें याकारणें । देहबुद्धि त्यजावी श्रवणें । सत्यब्रह्मीं साचारपणें । मिळोन जावें ॥ ४१ ॥ सत्यब्रह्म तें कवण । ऐसा श्रोता करी प्रश्न । प्रत्योत्तर दे आपण । वक्ता श्रोतयासी ॥४२॥

ब्रह्म एकच आहे. रंकापासून ब्रह्मदेवापर्यंत लहानथोरांचें व त्रैलोक्यांतील सर्व ज्ञात्यांच्या विश्रांतीचें स्थान एकच आहे गुरूचें ब्रह्म, तेंच शिष्याचें ब्रह्म, मात्र देहबुद्धीचा संबंध पार तोडला पाहिजे. देहबुद्धीचा संग सुटला कीं सर्वांना एकच महालाभ होतो. ब्रह्म एक आहे व अद्वितीय आहे (त्यावांचून दुसरें कांहीं नाहीं) असें श्रुतीचें वचन आहे. साधु वेगवेगळे दिसले तरी ते सर्व स्वरूपीं मिळाल्यामुळें सारेच देहातीत परब्रह्म आहेत. ब्रह्मांत नवेंजुनें अधिकउणें असा प्रकार नाहीं. भेद भावील तें देहबुद्धीचें श्वान होय (२४–३२). देहबुद्धीमुळें ब्रह्मांत कोणी भेद पाहील तर त्याचें समाधान (ऐक्याची समाधि) भंग पावेल. देहाच्या बाजूनें मोठेपणा मानणें हेंच देहबुद्धीचें लक्षण होय, देह मिथ्या, साधु तर देहाची निंदाच करितात. देह बुद्धीमुळें जीवंत आहे तोंवर देहाचा अभिमान बाळगणें व पुन्हा जन्म पावणें हें देहबुद्धीमुळेंच होतें; पण यामुळें समाधानसुख मिळत नाहीं व देहही टिकत नाहीं, हें ह्या वेड्याच्या ध्यानांत येत नाहीं. देहातीत होण्यांतच कल्याण आहे हें संत सांगतात. योग्यसामर्थ्य अंगीं जडलें तरी योग्यांनाही देहबुद्धि मागें खेंचते म्हणून देहबुद्धि निःशेष झडली तरच परमार्थ होतो, म्हणून शहाण्यांनीं ती सोडून सत्यब्रह्मीं मिळून जावें (३३–४१). सत्यब्रह्म हें नवीन कोठून आणलेंत म्हणून विचारशील तर तसें नाहीं, ब्रह्म एकच एक आहे, एक असून अनेक मतांमुळें नाना देहांत

म्हणे ब्रह्म येकचि असे । परी तें बहुविध भासे । अनुभव देहीं अनारिसें । नाना मतीं ॥ ४३ ॥ जें जें जया अनुभवलें । तेंचि तयास मानलें । तेथेंचि त्याचें विश्वासलें । अंतःकरण ॥ ४४ ॥ ब्रह्म नामरूपातीत । असोनि नामें बहुत । निर्मळ निश्चळ निवांत । निजानंद ॥ ४५ ॥ अरूप अलक्ष अगोचर । अच्युत अनंत अपरंपार । अदृश्य अतर्क्ये अपार । ऐसीं नामें ॥ ४६ ॥ नादरूप ज्योतिरूप । चैतन्यरूप सत्तारूप । साक्षरूप सस्वरूप । ऐसीं नामें ॥ ४७ ॥ शून्य आणि सनातन । सर्वेश्वर आणी सर्वज्ञ । सर्वात्मा जगजीवन । ऐसीं नामें ॥ ४८ ॥ सहज आणी सदोदित । शुद्ध बुद्ध सर्वातीत । शाश्वत आणी शब्दातीत । ऐसीं नामें ॥ ४९ ॥ विशाळ विस्तीर्ण विश्वंभर । विमळ वस्तु व्योमाकार । आत्मा परमात्मा परमेश्वर । ऐसीं नामें ॥ ५० ॥ परमात्मा ज्ञानघन । येकरूप पुरातन । चिद्रूप चिन्मात्र जाण । नामें अनाम्याचीं ॥ ५१ ॥ ऐसीं नामें असंख्यात । परी तो परेश नामातीत । त्याचा करावया निश्चितार्थ । ठेविलीं नामें ॥५२॥ तो विश्रांतीचा विश्राम । आदिपुरुष आत्माराम । तें येकचि परब्रह्म । दुसरें नाहीं ॥ ५३ ॥ तेंचि कळावयाकारणें । चौदा ब्रह्मांचीं लक्षणें । सांगिजेती तेणें श्रवणें । निश्चयो बाणे ॥ ५४ ॥ खोटें निवडितां येकसरें । उरलें तें जाणिजे खरें । चौदा ब्रह्में शास्त्राधारें । बोलिजेती ॥ ५५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ब्रह्मनिरूपणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ श्रोतीं व्हावें सावधान । आतां सांगों ब्रह्मज्ञान । जेणें होय समाधान । साधकाचें ॥ १ ॥ रत्न साधायाकारणें । मृत्तिका लागे येकवटणें । चौदा ब्रह्मांचीं लक्षणें । जाणिजे तैसीं ॥ २ ॥ पदार्थेंविण संकेत । द्वैतावेगळा दृष्टांत । पूर्वपक्षेंविण सिद्धांत । बोलतांचि नये ॥ ३ ॥ आधीं मिथ्या

अनुभव वेगळे होतात. ज्याच्या जें अनुभवाला आलें तेंच त्याला खरें वाटतें. ब्रह्म एक व नामरूपातीत असून त्याला अनेक नांवें दिलीं जातात. निर्मळ, निश्चळ, अरूप, अलक्ष्य, अगोचर, अच्युत, अनंत, अपार, अदृश्य, नादरूप, ज्योतिरूप, चैतन्यरूप, सत्तारूप, साक्षीरूप, स्वस्वरूप, शून्य, सनातन, सर्वेश्वर, शाश्वत, निःशब्द, विश्वंभर, आत्मा, परमात्मा, परमेश्वर इ. असंख्य नांवें त्याला देण्यांत आलीं आहेत (त्यांतच निरूपणाच्या ओघांत आम्ही त्याला सत्यब्रह्म म्हटलें); वस्तुतः ब्रह्म नामरूपातीत आहे, त्याचा निश्चय व्हावा यासाठीं नांवें दिलीं जातात. तो आदिपुरुष परमात्मा सर्वांच्या विश्रांतीचें स्थान आहे. परब्रह्म एकच, दुसरें नाहीं. हेंच सिद्ध करण्यासाठीं चौदा ब्रह्मांचीं लक्षणें शास्त्राधारें सांगून त्यांचें निराकारण करूं. खोटें तें खोटे म्हणून टाकून दिलें कीं खरें तेंच उरतें (४२–५५). [द० ७, स० २]

ब्रह्माचा बोध स्पष्ट व्हावा यासाठीं ब्रह्मासंबंधींच्या खोट्या समजुतीचें निराकारण करणें अवश्य आहे. रत्नें किंवा सोनें पाहिजे तर आधीं माती गोळा करावी लागते. त्यासारखाच हा चौदा ब्रह्मांचा प्रकार आहे. हीं चौदा ब्रह्में नव्हत तर

उभारावें । मग तें वोळखोन सांडावें । पुढें सत्य तें स्वभावें । अंतरीं बाणे ॥ ४ ॥ म्हणोन चौदा ब्रह्मांचा संकेत । बोलिला कळावया सिद्धांत । येथें श्रोतीं सावचित । क्षण येक असावें ॥ ५ ॥ पहिलें तें शब्दब्रह्म । दुजें मीतिकाक्षरब्रह्म । तिसरें खंब्रह्म । बोलिली श्रुती ॥ ६ ॥ चौथें जाण सर्वब्रह्म । पांचवें चैतन्यब्रह्म । साहावें सत्ताब्रह्म । साक्षब्रह्म सातवें ॥ ७ ॥ आठवें सगुणब्रह्म । नववें निर्गुणब्रह्म । दहावें वाच्यब्रह्म । जाणावें पैं ॥ ८ ॥ अनुभव तें अक्रावें । आनंदब्रह्म तें बारावें । तदाकार तेरावें । अनिर्वाच्य ॥ ९ ऐसीं हे चौदा ब्रह्में । यांचीं निरोपिलीं नामें । आतां स्वरूपाचीं वर्मे । संकेत दाऊं ॥ १० ॥ अनुभवेंविण जो भ्रम । त्या नांव शब्दब्रह्म । आतां मीतिकाक्षरब्रह्म । तें येकाक्षर ॥ ११ ॥ खंशब्दें आकाशब्रह्म । महदाकाश व्यापकधर्म । आतां बोलिलें सूक्ष्म । सर्वब्रह्म ॥ १२ ॥ पंचभूतांचें कुवाडें । जें जें तत्व दृष्टी पडे । तें तें ब्रह्मचि चोखडें । बोलिजेत आहे ॥ १३ ॥ या नांव सर्वब्रह्म । श्रुतिआश्रयाचें वर्म । आतां चैतन्यब्रह्म । बोलिजेल ॥ १४ ॥ पंचभूतादि मायेतें । चैतन्य चेतवितें । म्हणोनि त्या चैतन्यातें । चैतन्यब्रह्म बोलिजे ॥ १५ ॥ चैतन्यास ज्याची सत्ता । तें सत्ताब्रह्म तत्वता । तये सत्तेस जाणता । या नांव साक्षब्रह्म ॥ १६ ॥ साक्षत्व जयापासुनी । तोंहि आकळिलें गुणीं । सगुणब्रह्म हे वाणी । तयासि वदे ॥ १७ ॥ जेथें नाहीं गुणवार्ता । तें निर्गुणब्रह्म तत्वता । वाच्यब्रह्म तोंहि आतां । बोलिजेल ॥ १८ ॥ जें वाचे बोलतां आलें । तें वाच्यब्रह्म बोलिलें । अनुभवासि कथिलें । नवचे सर्वथा ॥ १९ ॥ या

हे चौदा भ्रम आहेत, व ते दूर केले पाहिजेत. खोटें आधीं उभारून मग तें मोडलें पाहिजे (१–५).

१ शब्दब्रह्म = ‘ अनुभवेंवीण भ्रम । या नांव शब्दब्रह्म. ’ ब्रह्माचें नुस्तें शब्दज्ञान झालें म्हणजे ब्रह्मज्ञान झालें असें नाहीं. अनुभवशून्य शब्दज्ञान काय कामाचें ?

२. ओमित्येकाक्षरब्रह्म = हें एकाक्षर ब्रह्म, पण ‘ जें क्षर ना अक्षर तेथें कैचें ओमित्येकाक्षर. ’ क्षर म्ह. नाशवंत व अक्षर म्ह. अविनाशी. ब्रह्म क्षर नाहीं व अक्षरही नाहीं. कां कीं जेथें नाश नाहीं तेथें तें अविनाशी आहे असें म्हणण्यांत तरी मतलब काय ?

३. खंब्रह्म = आकाश ब्रह्म. आकाश म्ह. शून्य. शून्याच्या ज्ञानाचा निरास होतो म्हणून तेथें शाश्वताचें अधिष्ठान नाहीं.

४. सर्वब्रह्म = ‘ सर्वं खल्विदं ब्रह्म. ’ या श्रुतिवचनाधारें पंचभौतिक सृष्टींत जें जें दिसेल त्याला कोणी ब्रह्म म्हणतात, पण तें ब्रह्म नव्हे. ब्रह्मप्रळयांत सर्व भूतांचाच नाश आहे.

५. चैतन्यब्रह्म = पंचभौतिकांस चेतविणारें चैतन्य तेंच ब्रह्म कोणी म्हणतात, पण ज्याला चेतवावें तें पंचभौतिक नाशवंत ठरल्यावर त्याला चेतविणाऱ्या चैतन्याला खरेपणा कोठून येणार ?

६. सत्ताब्रह्म = चैतन्यास ज्याची सत्ता तें सत्ताब्रह्म. ‘ परिवारेंविण सत्ता । ते सत्ताचि नव्हे तत्वता. ’ परिवारच नाहीं मग सत्ता कोणाची ?

नांव अनुभवब्रह्म । आनंद वृत्तीचा धर्म । परंतु याचेंही वर्म । बोलिजेल ॥ २० ॥ ऐसें हें ब्रह्म आनंद । तदाकार तें अभेद । अनिर्वाच्यीं संवाद । तुटोन गेला ॥ २१ ॥ ऐसीं हे चौदा ब्रह्में । निरोपिलीं अनुक्रमें । साधकें पाहातां भ्रमें । बाधिजेना ॥ २२ ॥ ब्रह्म जाणावें शाश्वत । माया तेचि अशाश्वत । चौदा ब्रह्मांचा सिद्धांत । होईल आतां ॥ २३ ॥ शब्दब्रह्म तें शाब्दिक । अनुभवेंविण माईक । शाश्वताचा विवेक । तेथें नाहीं ॥ २४ ॥ जें क्षर ना अक्षर । तेथें कैंचें मीतिकाक्षर । शाश्वताचा विचार । तेथें नाहीं ॥ २५ ॥ खंब्रह्म ऐसें वचन । तरी शून्यातें नासी ज्ञान । शाश्वताचें अधिष्ठान । तेथेंहि नसे ॥ २६ ॥ सर्वत्रांस आहे अंत । सर्वब्रह्म नासिवंत । प्रळयो बोलिला निश्चित । वेदांतशास्त्रीं ॥ २७ ॥ ब्रह्मप्रळय मांडेल जेथें । भूतान्वय कैंचा तेथें । म्हणोनियां सर्वब्रह्मातें । नाश आहे ॥ २८ ॥ अचळासि आणी चळण । निर्गुणास लावितां गुण । आकारास विचक्षण । मानीतना ॥ २९ ॥ जें निर्माण पंचभूत । तें प्रत्यक्ष नासिवंत । सर्वब्रह्म हे मात । घडे केंवी ॥ ३० ॥ असो आतां हें बहुत ॥ सर्वब्रह्म नासिवंत । वेगळेपणास अंत । पाहाणें कैंचें ॥ ३१ ॥ आतां जयास चेतवावें । तेंचि माईक स्वभावें । तेथें चैतन्याच्या नांवें । नास आला ॥ ३२ ॥ परिवारेंविण सत्ता । ते सत्ता नव्हे तत्वता । पदार्थेंविण साक्षता । तेहि मिथ्या ॥ ३३ ॥ सगुणास नाश आहे । प्रत्यक्षास प्रमाण काये । सगुणब्रह्म निश्चयें । नासिवंत ॥ ३४ ॥ निगुर्ण ऐसें जें नांव । त्या नांवास कैचा ठाव । गुणेंविण गौरव । येईल कैंचें ॥ ३५ ॥ माया जैसें मृगजळ । ऐसें बोलती सकळ । कां तें कल्पनेचें

---

७. साक्षीब्रह्म = पदार्थच नाहीं मग साक्षित्व कोणतें ?

८. सगुणब्रह्म = गुणांस नाश आहे म्हणून हें ब्रह्म नव्हे.

९. निर्गुणब्रह्म = जेथें नाहीं गुणवार्ता तें निर्गुण ब्रह्म. गुणच नाहीं मग निर्गुण कैचें ? ‘सत्ता चैतन्यता साक्षी । सर्वहीं गुणापाशीं । ठाईंचें निर्गुण त्यासी । गुण कैचें ?, असें जें गुणरहित ब्रह्म त्याला निर्गुण हें नांव तरी कशाला पाहिजे ?

१०. वाच्यब्रह्म = जें वाचेनें बोलतां आलें तें. यास नाश आहेच.

११. अनुभवब्रह्म = हें त्रिपुटींतलें असल्यामुळें शुद्धब्रह्म नाहीं.

१२. आनंदब्रह्म = ‘ आनंदाचा अनुभव । हाही वृत्तीचाच भाव. ’ आनंद ही मनाची वृत्ति आहे. शुद्ध ब्रह्म वृत्त्यतीत आहे.

१३. तदाकार ब्रह्म = ‘ तदाकारीं ठाव । वृत्तीस नाहीं. ’ तदाकार झाल्यावर त्याला अमुक नांव द्यायचें ही वृत्तिच उरत नाहीं म्हणजे तदाकार ब्रह्म सत्य नाहीं.

१४. अनिर्वाच्यब्रह्म = जेथें संवाद तुटोन जातो तें. ही उन्मनी स्थिति आहे, पण शुद्ध ब्रह्म सर्व अवस्थातीत आहे.

आभाळ । नाथिलेंचि ॥ ३६ ॥ 'ग्रामो नास्ति कुतः सीमा' । जन्मेंविण जीवात्मा । अद्वैतासी उपमा । द्वैताची ॥ ३७ ॥ मायेविरहित सत्ता । पदार्थेंविण जाणता । अविद्येंविण चैतन्यता । कोणास आली ॥ ३८ ॥ सत्ता चैतन्यता साक्षी । सर्वही गुणाचपासीं । ठाईचें निर्गुण त्यासी । गुण कैंचें ॥ ३९ ॥ ऐसें जें गुणरहित । तेथें नामाचा संकेत । तोचि जाणावा अशाश्वत । निश्चयेंसी ॥ ४० ॥ निर्गुणब्रह्मासि संकेतें । नामें ठेविलीं बहुतें । तें वाच्यब्रह्म त्यातें । नाश आहे ॥ ४१ ॥ आनंदाचा अनुभव । हाहि वृत्तीचाचि भाव । तदाकारीं ठाव । वृत्तीस नाहीं ॥ ४२ ॥ अनिर्वाच्य याकारणें । संकेत वृत्तीच्या गुणें । तया संकेतास उणें । निवृत्तीनें आणिलें ॥ ४२ ॥ अनिर्वाच्य ते निवृत्ती । तेचि उन्मनीची स्थिती । निरोपाधी विश्रांति । योगियांची ॥ ४४ ॥ वस्तु जे कां निरोपाधी । तेचि सहजसमाधी । जेणें तुटे आधीव्याधी । भवदुःखाची ॥ ४५ जो उपाधीचा अंत । तोचि जाणावा सिद्धांत । सिद्धांत आणी वेदांत । धादांत आत्मा ॥ ४६ ॥ असो ऐसें जें शाश्वत ब्रह्म । जेथें नाहीं माया भ्रम । अनुभवी जाणे वर्म । स्वानुभवें ॥ ४७ ॥ आपुलेन अनुभवें । कल्पनेसि मोडावें । मग सुकाळीं पडावें । अनुभवाचे ॥ ४८ ॥ निर्विकल्पास कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें । मग नसोनि असावें । कल्पकोटी ॥ ४९ ॥ कल्पनेचें येक बरें । जे मोहरितांच मोहरे । स्वरूपीं घालितां भरे । निर्विकल्पीं ॥ ५० ॥ निर्विकल्पासी कल्पितां । कल्पनेची नुरे वार्ता । निःसंगास भेटों जातां । निःसंगचि होइजे ॥ ५१ ॥ पदार्थाऐसें ब्रह्म नव्हे । मा तें हातीं धरून द्यावें । असो हें अनुभवावें । सद्गुरुमुखें ॥ ५२ ॥ पुढें कथेचा अन्वये । केलाचि करूं निश्चये । जेणें अनुभवासि ये । केवळब्रह्म ॥ ५३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्दशब्रह्मनिरूपणनाम समास तृतीय ॥ ३ ॥

याप्रमाणें १४ ब्रह्मांचा निरास करून (६–४४) समर्थ शुद्ध विमळ ब्रह्माची खूण सांगतात. तेथें सकळ उपाधींचा अंत होतो. 'वस्तु जे कां निरोपाधि । तेचि सहज समाधि.' स्वानुभवानें कल्पनेस मोडावें व महासुखाचे सुकाळीं पडावें, निर्विकल्पास कल्पावें, म्हणजे कल्पना मोडे स्वभावें व मग अनंतकाळ असून नसावें, कल्पना वाढतां वाढतां निर्विकल्प शुद्ध ब्रह्मस्वरूपापाशीं कल्पनाच नाहींशी होते. बरें, कल्पना पंचभौतिकाकडे न लावतां स्वरूपीं लावावी. कल्पनेची जिकडे मोहर फिरवावी तिकडे ती जाते हा कल्पनेचा मोठा गुण आहे. हा लक्ष्यांत घेऊन कल्पना स्वरूपाकडे लावावी. ती शुद्ध स्वरूपाजवळ नेऊन सोडते व आपण नाहींशी होते. निःसंगास भेटायचें तर निःसंगच झालें पाहिजे. ब्रह्म कांहीं पदार्थ नाहीं. कीं तो धरून हातांत देतां येईल. तें सद्गुरुमुखानेंच ऐकून अनुभवावें व तद्रूप व्हावें. चौदा ब्रह्मांचा निरास केला. आतां सत्य असें जें केवलब्रह्म (कैवल्य) त्याचें स्वरूप सांगूं (४५–५३). [द० ७, स० ३]

॥ श्रीराम ॥ ब्रह्म नभाहून निर्मळ । पाहतां तैसेंचि पोकळ । अरूप आणी विशाळ । मर्यादेवेगळें ॥ १ ॥ येकविस स्वर्गे सप्त पाताळ । मिळोन येक ब्रह्मगोळ । ऐसीं अनंत तें निर्मळ । व्यापून असे ॥ २ ॥ अनंत ब्रह्मांडांखालतें । अनंत ब्रह्मांडांवरुतें । तेणेंविण स्थळ रितें । अणुमात्र नाहीं ॥ ३ ॥ जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं । ऐसी वदे लोकवाणी । तेणेंविण रिता प्राणी । येकही नाहीं ॥ ४ ॥ जळचरांसी जैसें जळ । बाह्याभ्यंतरीं निखळ । तैसें ब्रह्म हें केवळ । जीवमात्रांसी ॥ ५ ॥ जळावेगळा ठाव आहे । ब्रह्माबाहेरी जातां नये । म्हणोनि उपमा न साहे । जळाची तया ॥ ६ ॥ आकाशाबाहेरी पळों जातां । पुढें आकाशचि तत्वतां । तैसा तया अनंता । अंतचि नाहीं ॥ ७ ॥ परी जें अखंड भेटलें । सर्वांगास लिगटलें । अति निकट परी चोरलें । सकळांसि जें ॥ ८ ॥ तयामध्येंचि असिजे । परी तयास नेणिजे । उमजे भास नुमजे । परब्रह्म तें ॥ ९ ॥ आकाशामध्यें आभाळ । तेणें आकाश वाटे डहुळ । परी तें मिथ्या निवळ । आकाशचि असे ॥ १० ॥ नेहार देतां आकाशीं । चक्रें दिसती डोळ्यांसी । तैसें दृश्य ज्ञानियांसी । मिथ्यारूप ॥ ११ ॥ मिथ्याचि परी आभासे । निद्रिस्तांस स्वप्न जैसें । जागा जालियां अपैसें । बुझों लागे ॥ १२ ॥ तैसें आपुलेन अनुभवें । ज्ञानें जागृतीसि यावें । मग माईक स्वभावें । कळों लागे ॥ १३ ॥ आतां असो हें कुवाडें । जें ब्रह्मांडापलीकडे । तेंचि आतां निवाडें । उमजोन दाऊं ॥ १४ ॥ ब्रह्म ब्रह्मांडीं कालवलें । पदार्थासी व्यापून ठेलें । सर्वांमध्यें विस्तारलें । संचलेपणें ॥ १५ । ब्रह्मामध्यें सृष्टी भासे । सृष्टीमध्यें ब्रह्म असे । अनुभव घेतां आभासे । अंशमात्रें ॥ १६ ॥ अंशमात्रें सृष्टीभीतरीं । बाहेरी मर्यादा

ब्रह्म आकाशासारखेंच पोकळ, अरूप व विशाळ असून त्यापेक्षां निर्मळ आहे. २१ स्वर्ग व ७ पाताळें मिळून एक ब्रह्मगोल. असे अनंत ब्रह्मगोल असून व त्या सर्वांना व्यापून ब्रह्म निर्मळ आहे. अनंत ब्रह्मांडें खालीं व अनंत ब्रह्मांडें वर आहेत पण ब्रह्मावांचून एक अणुभरही स्थळ नाहीं. जळचरांस जसें आंत बाहेर जळ तसें पंचभौतिक सृष्टीच्या व जीवमात्रांच्या अंतर्बाह्य एक व्यापक ब्रह्मच आहे. जळाबाहेर दुसरी जागा आहे, ब्रह्माबाहेर जातांच येत नाहीं म्हणून जळाची उपमा अपुरी आहे (१–६). तें आकाशासारखें सर्वव्यापी आहे. त्याची आपली भेट अखंड आहे, तें सर्वांगास लगटलें आहे, तें जवळ असून जनांस दूर वाटत आहे. चोरून राहिलें आहे. त्यांत असावें पण त्यास जाणूं नये ही जीवांची दशा आहे. तें उमजत नाहीं आणि भास (मिथ्या जग, दृश्य) उमजतो ! आकाशांत अभ्रें येतात त्यामुळें आकाश गढूळ वाटतें, पण तसें नाहीं, आकाश निर्मळच आहे. आकाशाकडे बारीक नजरेनें पाहूं लागलें म्हणजे चक्रें दिसतात, तसें ब्रह्मीं दृश्य दिसतें, पण तें ज्ञात्यांना मिथ्या म्हणून कळतें. जागा झाल्यावर निद्रेंत खरें वाटणारें स्वप्न मिथ्या म्हणून कळूं लागतें, तसें ब्रह्मानुभव घेऊन ज्ञानजागृतींत यावें, म्हणजे दृश्याचें मिथ्यात्व समजतें. असो. ब्रह्मांडापलीकडचें शुद्ध ब्रह्म कसें तें पाहूं (७–१४). ब्रह्म ब्रह्मांडांत कालवलें असून सर्व पदार्थांस अंशमात्रें व्यापून आहे, तीर्थगंडींत (अमृती)